**सभापतीस्थानी - माननीय सभापती**

**नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाबाबत ....**

**सभापती** : प्रश्नोत्तरे ...

श्री. नितीन गडकरी : माननीय सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास सुरू करण्यापूर्वी मला आपणास काही सांगावयाचे आहे. मी नियम 289 अन्वये विशेषत: विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रामधील ज्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा कापूस खरेदी केल्याबद्दल त्या शेतकऱ्यांना पैसे द्यावयाचे आहेत ते अद्याप सरकारने न दिल्याबद्दलची संपूर्ण माहिती काल आपल्यासमोर ठेवलेली आहे. या संदर्भात कोठल्याही प्रकारची सबसिडी देण्याचा प्रकार नाही. त्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी जो कापूस सरकारला विकला आहे त्याचे पैसे सरकारने त्यांना द्यावयाचे आहेत आणि सरकारने ते पैसे देण्याची जबाबदारी स्वीकारलेली आहे, पण अद्याप ती पूर्ण केलेली नाही. माननीय सभापती महोदय, पाचव्या वेतन आयोगाचे पैसे देताना सरकारी बजेटला कट लावून सरकारने कर्मचाऱ्यांना पैसे दिलेले आहेत. परंतु असे काहीही प्रयत्न सरकारने या कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे पैसे देण्याच्या संदर्भात केलेले नाहीत आणि त्यामुळे आज हा शेतकरी आत्महत्येला प्रवृत्त झालेला आहे. जवळपास 500 पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी त्यापायी आत्महत्या केलेल्या आहेत. या कापूस उत्पादक क्षेत्रामध्ये जवळपास 9676 गावे आहेत की जेथे दुष्काळ आहे, 50 पेक्षा कमी आणेवारी आहे. या बाबतीत माननीय पणन मंत्र्यांनी सांगूनही शेतकऱ्यांना पैसे देण्यात आलेले नाहीत, त्यामुळे शेतकऱ्यांपुढे आत्महत्येशिवाय अन्य पर्याय राहिलेला नाही. हा कापूस उत्पादक शेतकरी आता मंत्रालयासमोर येऊन आत्महत्या करू लागला आहे. इतके तातडीचे कारण यामध्ये आहे. थोडक्यात सांगावयाचे तर नियम 289 प्रमाणे ज्या काही घटना घडलेल्या आहेत त्यामध्ये पहिला निकष लावावयाचा तर या घटनांमध्ये सरकार हे खरेदीदार आहे असे असतानाही आज कापूस एकाधिकार चालू आहे किंवा नाही हेही शेतकऱ्याला समजू शकत नाही, आम्हालाही समजू शकत नाही. तेव्हा त्याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पष्टता करावी. कोण म्हणते हे चालू आहे, कोणी म्हणते हे चालू नाही. बाहेरच्या राज्यातील कापूस आला आहे असेही म्हटले जाते, पण ते चुकीचे आहे. कापूस या भावामध्ये आणणे परवडत नाही. तिसरी गोष्ट म्हणजे कापसाला 2700 रुपये क्विंटल या प्रमाणे भाव जाहीर केला पण त्याचे पैसेच दिलेले नाहीत. खरे तर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नियमानुसार ... माननीय सभापती महोदय, आपण देखील सहकार मंत्री म्हणून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गडकरी .....

काम केलेले आहे त्यामुळे आपणास याबाबत माहिती असेलच की, तेथे मालाची खरेदी केल्यानंतर त्याचे पैसे 24 तासामध्ये दिले गेले पाहिजेत. आता फेडरेशनने कापूस खरेदी करूनही त्या खरेदीचे पैसे 3-3 महिने झाले तरी शेतकऱ्यांना दिलेले नाहीत. मागील अधिवेशनामध्ये माननीय पणन मंत्र्यांनी सांगितले होते की, ताबडतोब 3 महिन्यामध्ये पैसे दिले जातील. पण अजूनही शेतकऱ्यांना पैसे मिळालेले नाहीत. आज ही थकबाकी जवळपास 3600 कोटी रुपयांच्या घरात पोहोचलेली आहे. हे पैसे न मिळाल्यामुळे शेतकरी आत्महत्या करू लागले आहेत. कर्जफेडीसाठी त्यांच्यावर जप्त्या सुरू झाल्या आहेत त्यामुळे त्यांना हे सारे सहन होत नाही म्हणून नाईलाजाचा मार्ग म्हणून शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त झाले आहेत. त्याला हे सरकारच सर्वस्वी जबाबदार आहे. तेव्हा नियम 289 खालील निकषांमध्ये या सर्व घटना लागू होत असल्यामुळे आपण या विषयावर चर्चा करण्यासाठी, किमान पक्षी सरकारकडून या बाबत निवेदन होण्यासाठी, सभागृहाचे आजचे कामकाज स्थगित करावे, आजच्या कार्यक्रम पत्रिकेवरील सर्व कार्यक्रम स्थगित करावा आणि तातडीने या बाबतीत सरकारने जबाबदारी स्वीकारून या विषयावर निवेदन करण्याचा आदेश सरकारला द्यावा. नियम 289 खाली ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या सर्व पूर्ण होत असल्यामुळेच तातडीने सरकारला निवेदन करण्याचे आदेश आपण द्यावेत. त्याशिवाय कापूस उत्पादक शेतकऱ्याला न्याय मिळणार नाही अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : काल 15 तारखेला सदनामध्ये आपण नियम 289 चा प्रस्ताव दिला आणि त्यावर आपणतसेच अन्य विरोधी पक्षातील गटनेत्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. तेव्हा मी या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांना विचारतो की, ...

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, या संबंधात आम्हालाही आमचे म्हणणे मांडण्यास आपण संधी द्यावी. ...

**सभापती** : या विषयासंबंधात मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा हा जो प्रश्न आहे.. यापूर्वी काही रक्कम त्यांना आपण दिलेली आहे आणि अद्याप काही रक्कम द्यावयाची आहे तर या बाबतीत शासनामार्फत निवेदन आपण करणार आहात काय ? ..

( यानंतर श्री. जागडे .... बी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितिन गडकरी : सभापती महोदय, आम्ही नियम 289 प्रमाणे चर्चेची मागणी केली आहे. आता जर मा. मंत्रिमहोदयांनी निवेदन केले तर आम्हाला आमची भावना व्यक्त करता येणार नाही. त्यामुळेच आम्ही नियम 289 प्रमाणे चर्चा घ्यावी, अशी मागणी केली आहे. आता या नियमानुसार मतदान होणार आहे, असे आपल्याला वाटत असेल तर आपण दुस-या नियमाचा आधार घेऊन ही चर्चा घ्यावी. हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. मा. मंत्रिमहोदयांनी निवेदन केल्यानंतर आम्हाला आमच्या भावना मांडता येणार नाही, त्या जनतेसमोर जाणार नाहीत. म्हणून या विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे. आपणाला नियम 289 प्रमाणे चर्चा घ्यावयाची नसेल तर आपण नियम 297 प्रमाणे चर्चा घ्यावी. या बाबतची चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. आम्ही आमचे विचार या ठिकाणी मांडल्यानंतर मा. मंत्रिमहोदयांना या बाबतचा निर्णय घेणे महत्वाचे ठरणार आहे. म्हणून आपण नियम 297 प्रमाणे चर्चा सुरु करावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही काल जो प्रस्ताव दिला आहे, त्यावर सदनातील सर्व सदस्यांच्या भावना व्यक्त होणे आवश्यक आहे. गेल्या महिना-दीड महिन्यापासून कापूस उत्पादक शेतकरी बेजार झाला आहे. शेतक-यांच्या हिताच्या दृष्टीने या विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे. परंतु समोरची माणसे शेतक-यांचा आवाज दबविण्याचा प्रयत्न करीत आहे. काल आम्ही हा प्रस्ताव मांडण्याचा प्रयत्न केला होता, त्यावेळी सभागृहाचे नेते आणि मा. उपमुख्यमंत्री सभागृहात हजर होते. पणनमंत्री सभागृहात हजर असताना मा. उपमुख्यमंत्री उभे राहिले. त्याप्रमाणे त्यांनी आपले मत मांडले. महाराष्ट्रातील शेतक-याला गेल्या दीड ते दोन महिन्यापासून जे सहन करावे लागेल आहे, ज्या यातना भोगाव्या लागल्या आहेत. कापूस योजनेत निर्माण झालेल्या भ्रष्टाचार आणि त्या बाबत ग्रामीण भागात निर्माण झालेली परिस्थिती, यामध्ये अनेक कापूस उत्पादक शेतकरी मृत्यूमुखी पडले आहेत. या बाबतचा विषय सभागृहासमोर होता. काल या विषयाबाबत आम्हाला चर्चा हवी होती, त्या अनुषंगाने सरकारने उत्तर द्यावे, अशी आमची मागणी होती. मा. सभापतींनी दिलेल्या परवानगीचा फायदा घेऊन मा. उपमुख्यमंत्र्यांनी राजकारण केले. आणि त्याबाबतचा निषेध नोंदवावयाला मी प्रामुख्यांने उभा आहे. आता पैसे देण्याचे श्रेय कोणाचे ? मला माहिती नाही. या बाबत आम्ही आपणाला विनंती केली होती की, या बाबतची चर्चा व्हावी आणि त्यानंतर शासनाने निवेदन करावे. शेतक-यांना पैसे कसे देणार, किती देणार आणि काय देणार, हे त्यांनी सांगावयाचे आहे. निवेदनामध्ये त्यांनी जो उल्लेख केला आहे, त्याबाबत मला सांगावयाचे आहे. त्यांनी असे सांगितले आहे की, हा पैसा देण्याबाबत आम्ही स्टेट बँकेबरोबर



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

बोलत आहोत, त्यांच्याशी चर्चा करीत आहोत. सभापती महोदय, काल आम्ही शेतक-यांचा विषय घेतला होता. शेतक-यांचे जे आंदोलन झाले होते, त्यामध्ये मी स्वत:ला पूर्णपणाने झोकून दिले होते. भ्रष्टाचार करणा-या बाजार समितीवर प्रथम मी निदर्शने केली. शेतक-यांच्या मैलभर रांगा लागल्या होत्या. थंडीवा-यात आमचा गरीब शेतकरी बसला होता. त्यांना मदत करण्यासाठी आम्ही सर्व केंद्रावर मदत केंद्रे काढली होती. आम्ही त्यावेळी सरकारबरोबर संघर्षाची भूमिका घेतली नाही. त्यावेळी मी मंत्रिमहोदयांना भेटलो होतो. त्यांना घेरावही घातला होता. त्यांना विनंतीही केली होती. या योजनेमध्ये होणारा भ्रष्टाचार, होत असलेला घोळ त्यांना सांगितला. बाजार समितीने शेतक-यांना जी मदत करावयाची होती ती केली नाही. ती आम्ही केली. शेतक-यांना औषधापचार केले. आम्हाला जे काही करता येणे शक्य होते, ते आम्ही केले. झुणका भाकर शेतक-यांना दिली. औषधपाणी देण्याचा प्रयत्न आम्ही केला. त्यावेळी मा. मुख्यमंत्र्यांनी अशी घोषणा केली होती की, आम्ही 31 तारखेला सर्व केंद्रे बंद करु. परंतु दुस-या दिवशी सांगितले की, पुन्हा आम्ही ही केंद्रे सुरु करु. परंतु त्यानंतर पणनमंत्र्यांनी असे सांगितले की, आम्ही 14 तारखेपासून खरेदी बंद करु. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात जाळपोळ झाली. आता या ठिकाणी मी सर्व गोष्टींचा उल्लेख करीत नाही. त्यावेळी मी संभाजीनगरातील आंदोलनात सहभागी झालो होतो. त्यावेळी दिल्लीहून स्टेट बँकेचे एम.डी. आले होते. त्यावेळी त्यांनी विचारले की, या लोकांना काय पाहिजे आहे ? त्यांनी माझ्याशी संपर्क साधला. मी त्यांना सांगितले की, शेतक-यांना त्यांचे पैसे पाहिजेत, परंतु शासनाकडे पैसे नाहीत. त्यांनी त्वरीत असे सांगितले की, तुमच्या सरकारने जर चेक दिले तर आमची बँक शेतक-यांना त्वरीत पैसे द्यावयाला तयार आहे. त्यावेळी मी ताबडतोब मा. हर्षवर्धन पाटील यांच्याशी संपर्क साधला. चार वेळी मी त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला.

( यानंतर श्री. सरफरे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

मी माननीय मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांचेशी चार वेळा संपर्क साधला. ते इंदापूर येथील साखर कारखान्याच्या कार्यक्रमासाठी गेले असल्याचे मला त्यांच्या स्वीय सहाय्यकाकडून सांगण्यात आले. ते मला म्हणाले की, साहेब मी तुमचा निरोप साहेबांना देतो. माननीय श्री. हर्षवर्धन पाटील यांचेशी माझी नंतर चर्चाही झाली. मी त्यांना सांगितले की, बँकेच्या एम.डी. बरोबर बैठक झाली पाहिजे, माननीय मुख्यमंत्र्यांना त्यांना भेटावयाचे आहे. त्यांची भेट घेण्यासाठी एम.डी. तीन दिवस त्याठिकाणी बसून होते. चौथ्या दिवशी मला फोन आल्यानंतर माननीय श्री. दिलीप वळसे पाटील यांना मी फोन केला. त्यांनी मला सांगितले की, माननीय मुख्यमंत्र्यांशी माझा संपर्क होत नाही. तेव्हा हा राज्याच्या हिताचा प्रश्न आहे. ते पैसे द्यायला तयार आहेत आपण फक्त त्यांच्याशी एकदा बैठक घ्या. या कामाचे श्रेय कोण घेणार आहे हा महत्वाचा प्रश्न नाही. शेतकऱ्यांची व्यथा पाहून स्टेट बँक 3 हजार कोटी रुपये द्यायला तयार असतांना प्रयत्न करुन सुध्दा मा. मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक होऊ शकली नाही. शेवटी माझ्या मित्राच्या माध्यमातून मा. मुख्यमंत्र्यांची बैठक घडविली. मा. मुख्यमंत्र्यांची त्या संदर्भात बैठक झाल्याबद्दल मा. मुख्यमंत्र्यांना मला धन्यवाद द्यावयाचे आहेत. विरोधी पक्ष केवळ आंदोलन करीत नाही तर शेतकऱ्यांसाठी सकारात्मक भूमिका घेतांना आम्ही कुठेही त्याचे राजकारण केले नाही. मी कुठेही याचे स्टेटमेंट केले नाही. शिवसेनेने शेतकऱ्यांसाठी आंदोलन छेडून पैसे देण्याची व्यवस्था केली असे जाहीर करुन त्याचे श्रेय घेतले नाही. मी पणन विभागाच्या सचिवांबरोबर चर्चा केली. मी त्यांना सांगितले की, याबाबत आपण मा. मुख्यमंत्र्यांपर्यंत त्यांना घेऊन जावे. ते पैसे द्यायला तयार आहेत. यामुळे राज्यावर आलेले संकट टळून जाईल. शेतकऱ्यांवरील संकट निघून जाईल. कसेही करुन त्यांना पैसे मिळाले पाहिजेत. ही भूमिका विरोधी पक्षात असतांनाही आम्ही घेतली. आम्ही याचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न केला नाही. असे सांगण्यात आले की, मा. मुख्यमंत्र्यांनी याबाबत पुढाकार घेतला हे मला समजले तेव्हा मला त्याचा खेद होतो. याबाबत पुढे काय झाले हे मला माहीत नाही, उद्या ते निवेदनामध्ये येईल. परंतु काल माननीय श्री. आर.आर. पाटील आम्हाला सांगत होते की, आम्ही स्टेट बँकेमार्फत पैसे देणार आहोत. आम्ही हे सर्व करीत होतो, बोलत होतो तर मग आम्ही याचे श्रेय कां घेऊ नये? फक्त यामध्ये राजकारण येऊ नये म्हणून ही भूमिका आम्ही मा. मुख्यमंत्र्यांकडे मांडीत होतो. आपल्याकडे पैसे उपलब्ध असतांना सुध्दा शेतकऱ्यांच्या दृष्टीने अशी भूमिका घेतली जात नाही याचे दु:ख होत आहे. म्हणून या विषयावर सभागृहात चर्चा झाली पाहिजे. शेतकऱ्यांना काय त्रास



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

भोगायला लागला तो आम्हाला याठिकाणी मांडता आला पाहिजे. म्हणून आपण आपल्या अधिकारामध्ये चर्चेची अनुंमती द्यावी व त्यावर शासनाकडून आम्हाला उत्तर मिळावे अशी अपेक्षा आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, काल या सभागृहामध्ये हा विषय मांडलेला होता की, मुख्यत्वेकरुन कोरडवाहू भागातील हे कास्तकार आहेत. त्यांनी कष्टाने व मेहनतीने पिकविलेल्या पिकाचे पैसे मिळत नाहीत ही त्यांची मुख्य तक्रार आहे. त्यामध्ये लहान मोठया अनेक तक्रारी आहेत. या विषयावर चर्चा करण्याचे हे ठिकाण आहे. त्याकरिता याठिकाणी नियम 289 अन्वये चर्चा करण्याची मागणी केली. नियम 289 ही व्होटेबल मोशन असते. आणि नियम 97 ची मोशन ही नॉन व्होटेबल असल्यामुळे या नियमाव्दारे चर्चा करण्याचे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रस्तावित केले आहे. या सर्व बाबींची चर्चा झाली पाहिजे. फक्त एकाच बाजूने शासनाकडून निवेदन आलेतर त्यावर चर्चा करता येणार नाही. या योजनेमध्ये अनेक दोष आहेत व त्यामुळे शेतकऱ्यांची स्थिती झाली आहे ती शासनासमोर येईल. शेतकऱ्यांचे काय म्हणणे आहे हेसुध्दा मूलभूतपणे समोर येण्याची आवश्यकता आहे. आणि म्हणून नियम 97 अन्वये या प्रस्तावावर चर्चा घेतली तर या प्रश्नाला न्याय मिळेल.

मेजर सुधीर सावंत : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या कापसाच्या प्रश्नावर दोन्ही बाजूच्या आम्हा सदस्यांच्या भावना तीव्र आहेत. शेतकऱ्यांना कापसाचे पैसे मिळाले पाहिजेत याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. मला या निमित्ताने एक हरकतीचा मुद्दा मांडून आपले लक्ष वेधावयाचे आहे की, या सभागृहामध्ये प्रश्नोत्तराचा तास हा अतिशय सिक्रेट असा तास आहे. असे असतांना माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडून वेळो वेळी प्रश्नोत्तराच्या तासाला हा मुद्दा उपस्थित करुन प्रश्नोत्तराच्या तासाचा भंग करणे बरोबर नाही...

(गोंधळ)

सभापती महोदय, मला बोलावयाचे आहे...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्यावर आरोप झालेले असल्यामुळे मला बोलावयाचे आहे, तुम्ही असे आरोप कसे करता? तुम्ही स्वत:ला काय समजता?

(गोंधळ)

मेजर सुधीर सावंत : तुम्ही स्वत:ला काय समजता?....



DGS/ MHM/ SBT/ 13:10

**सभापती** : माननीय सदस्य मेजर सुधीर सावंत आपण कृपया खाली बसावे...

(गोंधळ)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडण्याचा मला अधिकार आहे. असे असतांना या ठिकाणी माननीय सदस्यांचा संबंध काय आहे? कोणत्या वेळी कोणते विषय उपस्थित करावेत या संबंधी विधीमंडळाने नियम तयार केले आहेत. माननीय सदस्यांनी जरा नियमांचा अभ्यास केला पाहिजे. त्यांना जर नियम माहीत नसतील तर त्यांनी मध्ये मध्ये उभे राहून अशाप्रकारे हरकतीचे मुद्दे उपस्थित करु नयेत...

(गोंधळ)

**सभापती** : माननीय सदस्यांनी कृपया शांतता राखावी. मा. विरोधी पक्ष नेते आपणही शांतता राखावी...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्यावर आरोप झाले असल्यामुळे मला खुलासा केला पाहिजे. नियम 289 प्रमाणे मी प्रस्ताव मांडला, मी प्रश्नोत्तराचा तास वाया घालविण्यासाठी हा प्रस्ताव मांडलेला नाही. त्या नियमात अशी तरतूद आहे की, "एखाद्या तातडीच्या प्रश्नाकरिता सरकार जबाबदार असेल तर सभागृहाचे कामकाज स्थगित करुन अशा प्रकारचा प्रस्ताव मांडता येईल" अशारितीने प्रस्ताव मांडण्याचा नियम आहे. आणि त्या नियमाप्रमाणे मी प्रस्ताव मांडला. याचा अर्थ मी रोज उभा राहून सभागृहाचा वेळ वाया घालवितो, प्रश्नोत्तराचा तास होऊ देत नाही हा माझ्यावरील आरोप आपण काढून टाका. किंवा तो नियम तरी आपण काढून टाका. मी नियमाप्रमाणे काम करीत असतांना आपण माझ्यावर हेत्वारोप कां करता?

**सभापती** : आपण कृपया खाली बसा..

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य मेजर सुधीर सावंत यांनी मांडलेला मुद्दा सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावा.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/MHM/SBT पूर्वी श्री.सरफरे .. . . 13:15

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी सभागृहाचा वेळ घालवितो का ? सन्माननीय सदस्य असा आरोप कसा करतात ? सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. माझ्यावर जे आरोप करण्यात आले आहेत, ते रेकॉर्डवरुन काढून टाकावेत.

**सभापती** : पण मी त्याचा निर्णय घेणार आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.नितीन गडकरी : अगोदर नियमांचा अभ्यास करा आणि मग बोला. सभापती महोदय, माझ्यावर जे आरोप केलेले आहेत. ते रेकॉर्डवरुन काढून टाकावेत.

मेजर सुधीर सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे . . . .

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. प्लीज, सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. नियम 289 नुसार आत्यंतिक महत्वाच्या प्रश्नाच्या अनुषंगाने अन्य कोणतेही कामकाज स्थगित करावे किंवा कसे ? या अनुषंगाने काल राज्यातील कापूस शेतक-यांना द्यावयाच्या चुका-याच्या अनुषंगाने येथे चर्चा व्हावी असे एक मत होते. हा जो प्रश्न आहे किंवा ही जी स्थगिती आहे . . . .

(सन्माननीय सदस्य मेजर सुधीर सावंत काही बोलतात)

श्री.नितीन गडकरी : मग काल तुम्ही सभागृहात का आला नाहीत ?

मेजर सुधीर सावंत : काल कोणी गैरहजर नव्हते. तुम्ही ज्या नियमांचा आधार घेऊन बोलत आहात . . . .

श्री.नितीन गडकरी : तुम्हाला प्रश्नोत्तराचे एवढे प्रेम आहे तर काल तुम्ही सभागृहात का नव्हता ? तिकडे शेतकरी आत्महत्या करीत आहेत आणि आम्ही येथे वेळ घालवित आहोत असे तुम्ही कसे म्हणता ?

मेजर सुधीर सावंत : सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यात येऊ नये असे म्हणणे आहे . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

**सभापती** : आपण याठिकाणी नियम 289 अन्वये या विषयावर चर्चा करण्यासाठी

. . . .डी-2

**सभापती** . . . .

प्रश्नोत्तराचा तास स्थगित करावा याकरता आपली मागणी आहे. एका गंभीर विषयाच्या दृष्टीने व्यक्त केलेल्या या भावना किंवा ही टिप्पणी होती. अन्य वेळी प्रश्नोत्तराचा तास कितीही महत्वाचा असला तरी, जेव्हा राज्यातील शेतक-यांच्या प्रश्नाच्या संबंधात काहीवेळेला अशा पध्दतीने स्थगितीची मागणी केली जाते, तेव्हा ती गैर आहे असे म्हणता येणार नाही. या अनुषंगाने मी असे सांगेन की, अशा पध्दतीची मागणी करणे गैर होते असे कोणालाही म्हणता येणार नाही. सन्माननीय सदस्य मेजर सावंत, आपण जर काल येथे असता तर या मागच्या गंभीर भावना आपल्याही लक्षात आल्या असत्या. आपले हे म्हणणे बरोबर आहे की, आपण इतर वेळी प्रश्नोत्तराच्या तासाला प्राधान्य देतो. पण शेतक-यांच्या अत्यंत गंभीर प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी आपण नियम 289 चा वापर करीत असतो आणि तेही गैर नाही. म्हणून मला वाटते की, या सदनाचे नेते माननीय मुख्यमंत्री यांनी याबाबतीत आपले मत मांडावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्यांनी जे वक्तव्य केले आहे, ते त्यांना मागे घ्यावयास लावा. ते रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांचे वक्तव्य तपासून पाहतो आणि अयोग्य असेल तर ते काढून टाकतो.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सदनामध्ये जो प्रश्न उपस्थित केलेला आहे आणि त्या विषयाच्या संदर्भात त्यांच्या ज्या भावना आहेत, त्याच भावना या बाजूच्याही सन्माननीय सदस्यांच्या आहेत. कारण ज्या शेतक-यांनी केंद्रावर कापूस आणून टाकलेला आहे, त्याचे पैसे त्यांना वेळेवर दिले पाहिजेत ही या योजनेची जबाबदारी आहे आणि ती जबाबदारी आम्ही टाळू इच्छित नाही. पण यावर्षी अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली. एका बाजूला मार्केटमध्ये कापसाचे भाव घसरले, आंतरराष्ट्रीय मार्केटमध्येही कापसाचे भाव घसरले आणि त्यामुळे सर्व केंद्रावर जबरदस्त ताण आला आणि सर्वच शेतक-यांचा कापूस खरेदी करावा या भावनेतून प्रयत्न केला गेला. यामध्ये गोंधळ झाला, वेळ लागला, शेतक-यांना यातना झाल्या, त्रास झाला हे मी नाकारत नाही. पण या योजनेची व्याप्ती अचानकपणे एवढी वाढली की, आपल्याला जास्त कापूस खरेदी करावा लागला. त्यामुळे पैसे देण्यास विलंब झालेला आहे हे देखील मी नाकारीत नाही. पण याबाबतीत तातडीने योजना आखलेली आहे आणि त्याचे निवेदन माझ्याकडे तयार आहे. आपण परवानगी दिली तर मी आता निवेदन करण्यास . . . .



APR/MHM/SBT 13:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे. त्यांचे सर्व म्हणणे आम्ही ऐकून घेऊ. जर आपल्याला नियम 289 अन्वये चर्चा मान्य नसेल तर आपण ही चर्चा नियम 97 अन्वये कन्व्हर्ट करावी.

यानंतर कु.थोरात . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ प्रथम सौ. रणदिवे... 13:20

श्री. नितीन गडकरी...

प्रश्नोत्तराचा तासानंतर या चर्चेला सुरुवात करावी. त्या चर्चेमध्ये आमचे म्हणणे आम्ही अत्यंत खोलात जाऊन मांडू. त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांना यासंबंधात जे म्हणणे मांडावयाचे आहे ते त्यांनी मांडावे.

श्री. विलासराव देशमुख : हा विषय शेतक-यांचा जिव्हाळयाचा आहे. त्यामुळे त्यासंबंधीच्या चर्चेला आमची कधीही हरकत नाही. त्यावर चर्चा झाली पाहिजे. त्या चचर्चेतून मार्ग निघाला पाहिजे, हीच सरकारची भूमिका आहे. परंतु प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन चर्चा करण्याऐवजी विरोधी पक्ष नेत्यांनी दिलेली सूचना नियम 97 खाली कनव्हर्ट करावी आणि त्याप्रमाणे सभापती महोदय, आपण जो वेळ सुचवाल त्या वेळी चर्चा करण्याची आमची तयारी आहे. दुसरी गोष्ट अशी की, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेचा आज पहिला दिवस आहे. तोही विषय अतिशय महत्वाचा आहे. तेव्हा शेतक-यांच्या प्रश्नासंबंधीची चर्चा कधी, केव्हा आणि कशी ठेवावयाची यासंबंधीचा निर्णय आपण करावा, या चर्चेला आमची तयारी आहे. यासंबंधीची चर्चा आम्ही करु आणि सरकारने यासंबंधात जी उपाययोजना तयार केली आहे त्यासंबंधीचे निवेदन चर्चेच्या उत्तराच्या भाषणात आम्ही करु.

**सभापती** : सन्माननीय मुख्यमंत्री आणि माननीय विरोधी पक्ष नेता, तसेच अन्य सर्व गटनेत्यांनी या ठिकाणी ज्या भावना मांडल्या आहेत, त्या अनुषंगाने राज्य शासनामार्फत सन्माननीय मुख्यमंत्री निवेदन करण्यास तयार आहेत. त्याचबरोबर आपल्या सगळयांच्या भावना विचारात घेऊन या विषयावर सर्वंकष चर्चा होण्याच्या अनुषंगाने नियम 97 खाली चर्चा घेतली तर याबाबतीतील आपापल्या भावना याठिकाणी आपल्याला मांडता येतील, या मुद्दाशी मी स्वत:सुध्दा सहमत आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी एक मुद्दा या ठिकाणी मांडला की, आज माननीय राज्यपालांच्या अभिषाणावरील चर्चेचा पहिला दिवस आहे. त्यामुळे ती चर्चा देखील आज सुरु केली पाहिजे. नियम 97 खाली घ्यावयाची चर्चा आजच पूर्ण केली तर एकंदरीत आपल्या आजच्या कामकाजाची वेळ आहे ती दीड ते दोन तासाने वाढवावी लागेल. अशा त-हेने सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढवून लक्षवेधी सूचनेनंतर ही चर्चा घ्यावी.

..2..

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, जेव्हा असे तातडीचे विषय येतात तेव्हा आजपर्यंतची प्रथा अशी आहे की, प्रश्नोत्तराचा तास झाल्या नंतर अशा अत्यंत महत्वाच्या व तातडीच्या प्रस्तावावर नियम 97 खाली चर्चा घेण्यात येते. माननीय मुख्यमंत्री म्हणतात त्याप्रमाणे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेचा पहिला दिसव आहे त्यामुळे ती चर्चा आपण आज करु. श्रध्दांजलीचा विषय आजच घ्यावयाचा असेल तर तोही विषय आपण आज घेऊ. थोडासा बिजनेस वाढेल. त्यासाठी रात्री थोडे उशिरापर्यत बसावे लागेल किंवा उद्या सकाळी थोडे लवकर बसावे लागेले तर त्याला आम्ही सहकार्य करु. मी माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी 500 शेतक-यांच्या आत्महत्तेची ग्रॅव्हिटी लक्षात घेऊन तसेच प्रश्नोत्तराचा तास महत्वाचा आहे म्हणून प्रश्नोत्तराचा तास पूर्ण केल्या नंतर नियम क्रमांक 97 खाली ही चर्चा करु. या चर्चेसाठी दोन तासांचा वेळ असतो. कदाचित जमले तर त्यापेक्षा कमी वेळेत आम्ही आमच्या भावना व्यक्त करु. पण आमच्या भावना माननीय मुख्यमंत्र्यांनी ऐकून घ्याव्यात. कारण शेतक-यांचा हा तीव्र प्रश्न आहे. अधिवेशनात आम्ही हा प्रश्न मांडू शकतो. मला वाटते कामकाजाचा हा प्रश्न आहे. कुठे तरी सभागृहाचा वेळ घ्यावा, राजकारण करावे असा या चर्चेमागील आमचा उद्देश नाही. प्रश्नोत्तराच्या तासानंतर ही चर्चा घ्यावी, एवढीच माझी विनंती आहे.

सभापती : प्रश्नोत्तराच्या तासानंतर शोक प्रस्ताव आहे, तो पूर्ण करुन त्यानंतर कागदपत्रे सभागृहाला सादर करावयाची आहेत, ती सादर झाल्या नंतर नियम 97 खालील चर्चेला सुरुवात करु.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, नियम 289 च्या चर्चेची ग्रॅव्हिटी आहे. विधिमंडळाने नियम केलेले आहेत. मी आपला सन्मान करुन, आपली अडचण लक्षात घेऊन एकंदरीत आपण केलेली सूचना आम्ही समजून घेऊन नियम 289 चा आग्रह न धरता आम्ही नियम 97 खाली चर्चा करण्याची तयारी दर्शवली आही. श्रध्दांजलीचा विषय महत्वाचा आहे. कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे महत्वाचे आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, हे सर्व प्रश्न जरी महत्वाचे असले तरी शेतक-यांच्या जीवन-मरणाचा, लाखो लोकांचा प्रश्न तेवढाच महत्वाचा आहे. त्यामुळे प्रश्नोत्तराच्या तासानंतर ही चर्चा घेण्यात यावी.

..3..



SMT/ MHM/ SBT/ प्रथम सौ. रणदिवे... 13:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : ठीक आहे. प्रश्नोत्तराचा तास संपल्या नंतर लगेच नियम 97 खालील चर्चा घेण्यात येईल.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, शोकप्रस्ताव झाल्यानंतर ही चर्चा घेण्यात यावी.

श्री. नितीन गडकरी : काल सभागृहात शपथविधी घेतला. सभापती महोदय, आपल्याला यातून मार्ग काढता येईल, पण आमच्या विषयाची ग्रॅव्हिटी निघून जाईल. खरे म्हणजे आम्ही नियम 289 चा आग्रह धरला होता. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांच्या आणि आपल्या विनंतीला मान दिला. आमचे म्हणणे असे आहे की, श्रध्दांजलीचा विषय नंतर घ्यावा. प्रश्नोत्तराच्या तासानंतर ही नियम 97 अन्वये चर्चा घेऊ. नाही तर या विषयासंबंधीची पूर्ण ग्रॅव्हिटी निघून जाईल. मग आपण पुन्हा असे म्हणाल की, कागदपत्रे सभागृहासमोर ठेवल्यानंतर ही चर्चा घेऊ.मग ते म्हणतील नियुक्तीची घोषणा करु द्या. मग म्हणतील अहवाल सादर करु द्या. अशा रितीने ही चर्चा पुढे जाईल.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, मला माननीय विरोधी पक्ष नेत्यांना विनंती करावयाची आहे. आपल्या सदनाच्या दिवंगत सदस्यांच्या श्रध्दांजलीचा जो विषय आहे तोही विषय महत्वाचा आहे. त्या प्रस्तावाला फार वेळ लागत नाही. कागदपत्रे सभागृहासमोर ठेवण्यासंबंधीची जी बाब आहे ती नंतर घेतली तरी चालेल.

**सभापती** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवण्यासंबंधीची बाब नंतर घेऊ. शोक प्रस्तावाची बाबा झाल्या नंतर नियम 97 अन्वये या ठिकाणी घेण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : ठीक आहे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**नगरपरिषद पूर्णा येथील गैरव्यवहाराबाबत**

**(१) * १६९२ प्रा. फौजीया खान , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. विनायकराव मेटे , श्री. संजय दत्त :** सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्णा नगरपरिषद अध्यक्ष मोहन मोरे, मुख्य अधिकारी सचिन पवार व प्रभारी मुख्य अधिकारी श्री.तुपे यांनी ऑक्टो-नोव्हें. २००४ मध्ये ४९ कामांवर सुमारे ४३ लाख रु. काम न करताच किंवा थातूर-मातूर काम करुन उचलले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी परभणी यांनी कामातील अनियमीतते बद्दल नगराध्यक्ष मोरे यांना त्यांच्या पदावरुन दूर करावे अशी शिफारस शासनास केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सविस्तर चौकशीसाठी कार्यकारी अभियंता (रोहयो) आणि लेखा अधिकारी यांचे पथक नेमून चौकशीसाठी ८ दिवसांचा कालावधी पथकाला दिला होता हे खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशी पथकाने अहवाल सादर केला आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(५) चौकशीच्या निष्कर्षानुसार नगराध्यक्ष व संबंधित मुख्य अधिकाऱ्यांविरुध्द काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुज यांच्याकरिता :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) होय.

(५) चौकशी पथ्काने सादर केलेल्या अहवालानुसार गैरव्यवहार झाल्याचे दिसून येते. अहवाल आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई व विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचेकडे जिल्हाधिकारी परभणी यांनी पुढील कार्यवाहीसाठी सादर केला आहे. संबंधितांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

----------

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये मला आपल्या परवानगीने पुढील दुरुस्ती करावयाची आहे. सभापती महोदय, उपप्रश्न क्रमांक 5 ला दिलेल्या उत्तरामध्ये थोडा बदल करावयाचा आहे. कारण डायरेक्टर, म्युनिसिपल ॲडमिनिस्ट्रेशने ज्या काही कार्यवार्ही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी महोदयांना दिलेल्या होत्या त्या जिल्हाधिकारी महोदयांनी त्या ठिकाणी केलेल्या आहेत त्यामुळे उपप्रश्न क्रमांक 5 च्या उत्तरामध्ये काय वाचावे एवढेच या ठिकाणी वाचून दाखवितो. " संबंधित नगराध्यक्ष व दोन मुध्याधिकारी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1692 ...... श्री. राजेश टोपे ....

यांच्याविरुध्द एफआयआर दाखल केलेले आहेत. स्थानिक लेखा कार्यालयास विशेष लेखापरीक्षण करण्यासंबंधी सूचित करण्यात आलेले आहे." म्हणजे स्पेशल ऑडीटरला त्या ठिकाणी ऑडीट करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानंतर पुढे पुढील प्रमाणे वाचावे. "संबंधित मुख्याधिकारी श्री. तुपे यांना निलंबित करण्यात आले आहे. संबंधितांकडील सर्व रेकॉर्ड ताब्यात घेऊन सुरक्षितपणे अभिरक्षित ठेवण्यात आलेले आहे. संबंधित नगराध्यक्षाना अपात्र ठरविण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे."

प्रा. फौजीया खान : सभापति महोदय, इस मामले में शासन द्वारा जल्दी एक्शन ली गई है इसलिए मैं शासन का अभिनंदन करना चाहती हूं. मेरा यह प्रश्न है कि परभणी के जिलाधिकारी ने नगरविकास विभाग को भेजी अपनी सिफारिशों में पूर्णा नगरपरिषद अध्यक्ष मोहन मोरे के खिलाफ सेक्शन 55 के तहत पद से हटाने की कार्रवाई करने की सिफारिश की है. मैं यह जानना चाहती हूं कि शासन उन्हें पद से हटाने की कार्रवाई कब तक करेगा ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि, आपने अभी बताया है कि अधिकारियों को निलंबित किया गया है. लेकिन मैं यह जानना चाहती हूं कि क्या अधिकारियों एवं लोकप्रतिनिधियों के खिलाफ ॲन्टि करप्शन कानून के तहत कार्रवाई की जाएगी ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, यामध्ये सेक्शन 55 (अ) खाली शासनाला अधिकार आहे आणि शासनाला त्यासाठी सविस्तर हिअरींग घ्यावे लागते. त्या हिअरींगचा कालावधी आणि गुणवत्तेवर निकाल हे लक्षात घेता साधारणपणे महिनाभरापर्यन्त हा निकाल शासन निश्चितपणे देईल. ॲन्टी करप्शनच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी विचारले. त्या ठिकाणी त्यांना जवळजवळ निरर्ह करण्याचीच प्रक्रिया करीत असल्यामुळे आणि जो काही अधिकारीवर्ग आहे त्यांच्यावर सगळी कारवाई केल्यामुळे ॲन्टी करप्शनचा विषय या ठिकाणी घेण्याचे काही कारण नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी यामध्ये थोडेसे लक्ष घातले पाहिजे. माझ्याकडे रिपब्लीकन पक्षाचे निवेदन आहे. रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया (डेमॉक्रॅटीक) या पक्षाचे श्री. पी.एम.कांबळे हे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत आणि श्री. प्रकाश कांबळे हे राष्ट्रीय उपाध्यक्ष आहेत. त्यांनी असे म्हटले आहे की, हे जे नगराध्यक्ष आहेत ते राष्ट्रवादी काँग्रेसचे असल्यामुळे

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

ता. प्र. क्र. 1692..... श्री. नितीन गडकरी ...

मंत्रिमहोदय त्यांच्यावर कारवाई करीत नाहीत. त्यांनी काही पुरावे जोडलेले आहेत. हिअरींग घेतात, ऐकतात आणि बऱ्याचवेळा कारवाई करीत नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. प्रश्नकर्ते राष्ट्रवादीचे आहेत, नगराध्यक्ष राष्ट्रवादीचे आहेत आणि कारवाई करणारे राज्यमंत्री राष्ट्रवादीचे आहेत म्हणून हे राष्ट्रवादीचे हे सगळे असल्यामुळे याला कॉंग्रेसचाच मुख्यमंत्री न्याय देऊ शकतो. माझी विनंती आहे की, यासंदर्भात रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाचे हे जे निवेदन आहे त्याबाबतीत आपण लक्ष घालून 41 लाख रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या नगराध्यक्षावर तातडीने कडक कारवाई करावी. सन्माननीय सदस्या प्रा. फौजीया खान यांचे मी अभिनंदन करतो. तो राष्ट्रवादीचा असला तरी कदाचित त्यांचा गटाचा आहे की नाही हे माहीत नाही. परंतु त्यांनी याबाबतीत प्रश्न विचारण्याचे धाडस दाखविले त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. पण या राष्ट्रवादीच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणावर माननीय मुख्यमंत्री महोदयांशिवाय दुसरा कोणीही प्रकाश टाकू शकणार नाही. कारण यामध्ये नगरविकास विभाग आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी... ता.प्र.क्र.1692...

आरपीआय देखील तुमच्या युतीमध्ये आहेत, त्यामुळे त्यांच्या निवेदनाच्या आधारावर याठिकाणी कडक कारवाई करणार काय असा माझा प्रश्न आहे.

श्री.विनायक मेटे : सन्माननीय विरोधी पक्ष नेते हे नेहमी अधिक माहिती सांगत असतात त्याप्रमाणे त्यांनी आजही सांगितलेली आहे. माझी सदनाला विनंती आहे की, सदरहू नगराध्यक्षांशी राष्ट्रवादीचा काही संबंध नाही आणि नव्हता. कोणी काही लिहिले आहे त्याच्यावर बोलणे बरोबर नाही. पक्षाच्या संदर्भात जी चुकीची माहिती त्यांनी दिली आहे ती रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावी. राष्ट्रवादीशी त्याचा काही संबंध नाही.

श्री.नितीन गडकरी : महंमद कुरेशी, अध्यक्ष, पूर्णा तालुका शहर विकास समिती, नारायणराव कदम, तालुका सरचिटणीस, कॉंग्रेस पार्टी, प्रकाश कांबळे, आरपीआय डेमोक्रेटिक, सुभाष ठाकूर, माजी नगराध्यक्ष, नगरपालिका, पूर्णा यामध्ये पहिले निवेदन राष्ट्रवादीचे आहेत आणि ते कदाचित मा.सदस्या श्रीमती फौजीया खान गटाचे असेल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी आणखी माहिती देऊ इच्छितो. जे नगराध्यक्ष होते...(अडथळा)

श्री.दिवाकर रावते : श्री.विनायक मेटे यांनी पूर्णा येथे जाहीर सभा घेतली होती.

श्री.विनायक मेटे : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जे सांगितले त्यामध्ये तथ्य नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा औचित्याचा प्रश्न आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये आपण औचित्याचे मुद्दे उपस्थित करीत नाही.

श्री.नितीन गडकरी : त्यांना तिकिट श्री.मेटेसाहेबांनी दिले, प्रचार श्री.मेटे यांनी केला, बी-फॉर्म त्यांनीच दिला आणि भ्रष्टाचार श्री.मोहन मोरे यांनी केला. त्याबाबत आरपीआय, कॉंग्रेस पाटील आणि 3 माजी नगराध्यक्ष निवेदन आलेले आहे या सगळयांचे निवेदन आहे. त्या निवेदनांवर राष्ट्रवादी काहीच कार्यवाही करीत आहे असे ते म्हणतात. यासंबंधी मा.सदस्य श्री.विनायक मेटे यांचा रोल बरोबर नाही. मा.सदस्या श्रीमती फौजीया खान गटाने हिंमत दाखविली आहे. त्यांचे मी अभिनंदन करतो.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1692...                                                        श्री.विनायक मेटे...

**सभापती** : मा.विरोधी पक्ष नेते आपल्याला काय म्हणावयाचे आहे ते आपण सांगितलेले आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, हा प्रश्न विचारणारे प्रश्नकर्त्यांपैकी मा.सदस्य श्री.संजय दत्त हे सोडले असता उर्वरित मा.सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड, मी आणि मा.सदस्या श्रीमती फौजीया खान हे सर्व सदस्य राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत. याचा अर्थ स्पष्ट आहे की राष्ट्रवादी काँग्रेस भ्रष्टाचारावर पांघरुण घालत नाही आणि त्यांच्याशी राष्ट्रवादीचा संबंध नाही. याच्या उलट तेथे श्री.विजय गव्हाणे हे त्यांच्याबरोबरचे आहेत आणि त्यांनी भाजपामध्ये प्रवेश घेतला आहे व त्यांच्यावर पांघरुण घालण्याचे काम मा.श्री.नितीनजी गडकरी करीत आहेत. भ्रष्टाचार पुढे आणून त्याला पायबंद घालण्याचे काम आम्ही करीत आहोत. श्री.विजय गव्हाणे यांच्याबरोबर हा श्री.मोरे हेही भाजपामध्ये गेलेले आहेत. त्याच्यावर पांघरुण घालण्याचे काम ही मंडळी करीत आहेत.

श्री.नितीन गडकरी : आमचा त्याच्याशी काही संबंध नाही.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ाशिज येथील ज माल जमी धारजा जायद्यातंर्जत शेज डो एज र भूजंडाच्या बेज ायदेशीर जरेदी प्रज रजाची सुरु असलेली चौज शी**

**(2) * 3289 श्री. मधुज र सरपोतदार , श्री. अरविंद सावंत , श्री. दिवाज र रावते , श्री. प्रमोद खिलज र , श्री. अलि तरे** : स-मा-ा-ीय मुय मंत्री पुढील ोष्टींचा ुलासा रतील ाय :-

(1) -ाशिज येथील ज माल जमी-ा धारजा जायद्यातंर्जत शेज डो एज र भूजंडाच्या बेजायदेशीर जरेदी प्रज रजाची चौज शी जिल्हाधिजारी -ाशिज हे जरित आहे हे जरे आहे जाय,

(2) असल्यास, -ाशिज येथील जमी-ा घोटाळयाच्या चौज शीची सद्यस्थिती जाय आहे,

(3) असल्यास, -ाशिज येथील जमी-ा घोटाळयाची चौज शी जरजाऱ्या जिल्हाधिजाऱ्यां-ाा धमक्या येत असज्याची बाब शास-ााच्या -िदर्श-ाास आली आहे जाय,

(4) असल्यास, जिल्हाधिजाऱ्यां-ाा धमक्या देजाऱ्यांची शास-ाा-े चौज शी जेली आहे जाय, असल्यास, चौज शीचा -िष्ज र्ष जाय आहे व त्या-ुसार पुढे जाय जारवाई जरज्यात आली वा येत आहे ?

**श्री.राजेंद्र शिंगणे, श्री.विलासराव देशमुज यांच्याकरिता** : (1) होय.

(2) या प्रज रजी सजम प्राधिजारी म्हजू-ा संबंधित तहसिलदार यांच्यामार्फत चौज शी सुरु आहे. तससिलदार यां-ी जुळ जायद्याजाली -ोटीस दिल्या-ंतर संबंधितां-ी उच्च -यायालय, मुंबई येथे याचिजा ज्र.10331 दाजल जेली आहे. सदर याचिजा सु-ावजीवर प्रलंबित आहे.

(3) -ाही.

(4) प्रश्-ा उद्‌भवत -ाही.

श्री.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मला आपल्या अनुमतीने सदर उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. उत्तर क्र.2 च्या शेवटच्या ओळीमध्ये "याचिका क्र.10331 दाखल केली आहे. सदर याचिका सुनावणीवर प्रलंबित आहे." असे म्हटले आहे. याऐवजी "याचिका क्र.10331 दाखल केली होती, सदर याचिका दिनांक 1.3.2005 रोजी निकाली निघाली आहे." असे वाचावे. श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या प्रश्नाला उत्तर देताना त्यामध्ये दुरुस्ती केली पाहिजे होती. सदर याचिका निकाली निघाली आहे त्याचे निष्कर्ष काय आहेत. कारण प्रश्न क्र.3 मध्ये विचारले होते की, "नाशिक येथील जमीन घोटाळयाची चौकशी करणा-या जिल्हाधिका-यांना धमक्या येत असण्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे काय ? आणि प्र.क्र.4 मध्ये असे विचारले होते की, जिल्हाधिका-यांना धमक्या देणा-यांची शासनाने चौकशी केली आहे काय ? असल्यास चौकशीचा निष्कर्ष काय आहे ? असा प्रश्न आहे. जिल्हाधिका-यांना कोणी धमक्या दिल्यास असतील त्याची चौकशी तहसीलदारांकडून होणार नाही.

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.3289 पुढे सुरु...) (श्री. मधुकर सरपोतदार...

ती चौकशी पोलिसांकडून व्हावयास पाहिजे. पोलिसांनी या प्रकरणाची दखल घेऊन चौकशी पूर्ण करावयास पाहिजे. जिल्हाधिका-यांना टेलिफोनवरुन आणि अन्य कोणत्या मार्गाने धमक्या दिल्या जात आहेत ? याबाबतची माहिती सदनासमोर येण्याची आवश्यकता आहे. म्हणून मी प्रश्न विचारलेला आहे. या प्रश्नाचे उत्तर आल्यानंतर मी दुसरा उपप्रश्न विचारीन.

श्री. राजेंद्र शिंगणे : या प्रकरणामध्ये जिल्हाधिका-यांना कोणत्याही धमक्या आलेल्या नाहीत. त्यामुळे त्यासंदर्भात चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : याचिकेची सुनावणी झाली असेल तर त्यातून काय निष्पन्न झाले ?

श्री. राजेंद्र शिंगणे : प्रकरण न्यायालयामध्ये होते. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणी निर्देश दिलेले आहे की, जिल्हाधिकारी नाशिक यांनी सुरु केलेल्या चौकशीला स्थगिती देण्याच्या उद्देशाने या कंपन्यांनी उच्च न्यायालयामध्ये ज्या रिट याचिका दाखल केलेल्या होत्या...

श्री. दिवाकर रावते : माझा हरकतीचा मुद्दा आहे. मा.मंत्री महोदयांनी सुरुवातीलाच उत्तरामध्ये दुरुस्ती करावयास पाहिजे होती.

**सभापती** : प्रश्न पुकारल्यानंतर राज्यमंत्र्यांनी उत्तरामध्ये दुरुस्ती केलेली आहे.

श्री. राजेंद्र शिंगणे : या प्रकरणाची चौकशी जिल्हाधिकारी नाशिक यांनी करावयाची की, हे प्रकरण इतर जिल्हयाच्या जिल्हाधिका-यांकडे चौकशीकरिता हस्तांतरित करावयाचे यासंदर्भात मुख्य सचिवांनी दोन आठवड्यात निर्णय घ्यावा, असे आदेश उच्च न्यायालयाने 1.3.2005च्या आदेशान्वये दिलेले आहेत.

श्री. नितीन गडकरी : मी जेव्हा नाशिकला गेलो होतो त्यावेळी या प्रकरणाचे डिटेल्स मला देण्यात आले. या प्रकरणी दैनिक "लोकसत्ता"मध्ये सदर छापून येत होते. या जमिनीची किंमत 70 ते 80 कोटी रुपये आहे. सदर जमीन अर्बन लँड सिलिंग कायद्याखालील आहे. मोठ्या कंपन्या, नाशिक मधील प्रख्यात बांधकाम ठेकेदार यांना या जमिनी विकलेल्या आहेत. हा गैरव्यवहार आहे असा जिल्हाधिका-यांनी सकृतदर्शनी रिपोर्ट दिलेला आहे. या प्रकरणाची चौकशी नाशिकच्या जिल्हाधिका-यांनी करावयाची की, अन्य जिल्हाच्या जिल्हाधिका-यांनी करायची या मुद्यावर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.3289 पुढे सुरु...) (श्री. नितीन गडकरी...

न्यायालयात सुनावणी झाली. मी या सभागृहामध्ये जबाबदारीने बोलत आहे. या जमिनीची किंमत मला सांगता येणार नाही. या सदनातील मा.सदस्य श्री. वसंत पवार हे या जमिनीची जास्त चांगली किंमत लावू शकतील. ही 100 कोटी पेक्षा जास्त किंमतीची जमीन आहे. या मध्ये नाशिकमधील प्रख्यात कंपन्या आणि बिल्डर असोशिएशनही गुंतलेले आहे. हा गैरव्यवहार असल्याचे जिल्हाधिका-यांनी सकृतदर्शनी मान्य केलेले आहे. हायकोर्टामध्ये झालेली सुनावणी ही तांत्रिक बाबीवर झालेली आहे. मुळात या गैरव्यवहाराबाबत कोर्टामध्ये केस दाखल झालेली नाही. हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. या प्रकरणी मा.सदस्य श्री. वसंत पवार हे चांगली माहिती देऊ शकतील. माझ ी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, हे 100 कोटी पेक्षा जास्त रुपयाचे लँड स्कँडल आहे. या प्रकरणाची चौकशी मुख्य सचिवांमार्फत किंवा महसूल सचिवांमार्फत करुन त्याचा रिपोर्ट आपण स्वत: मागवावा. अर्बन लँड सिलिंगखालील ही मोठी जागा सौदे करुन विकलेली आहे. त्याठिकाणी बंगले, कारखाने बांधलेले आहेत. हे प्रकरण ज्यांच्या लक्षात आले त्या सर्वांना मॅनेज करण्याचा प्रयत्न केलेला आहे. काही राजकारणी लोकांनी देखील लक्ष्मीदर्शनाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात केलेला आहे. ही अर्बन लँड सिलिंग कायद्याखालील 100 कोटी पेक्षा जास्त किंमतीची जमीन आहे. माझ्याकडे या प्रकरणाची काही कागदपत्रे उपलब्ध आहेत. आपणास पाहिजे असतील तर ती मी देऊ शकेन. तेव्हा या प्रकरणी आपण विभागाच्या सचिवा मार्फत 15 दिवसाच्या आत चौकशी पूर्ण करुन अहवाल मागवावा.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.शिगम 13:40

श्री. नितीन गडकरी... ता.प्र.क्र.3289...

जिल्हाधिकारी यांच्या चौकशीत ते सगळे लोक दोषी आढळलेले आहेत.खोटया सहया, खोटी कागदपत्रे अशा प्रकारचे घोटाळे या प्रकरणी झालेले आहेत. सरकाने हे लॅन्ड स्कॅन्डल बाहेर काढावे आणि संबंधितांवर कारवाई करावी. खात्याच्या सचिवामार्फत 15 दिवसात चौकशी करावी व त्यांचा रिपोर्ट सभागृहासमोर ठेवावा अशी माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे.

श्री. विलासराव देशमुख :सभापती महोदय, खरे म्हणजे या प्रकरणात जिल्हाधिकारी यांनी लक्ष घातले आणि ते सर्व प्रकरण शोधून काढले आहे.ज्या अतिरिक्त ठरलेल्या जमिनी आहेत, त्या जमिनी कोणाला देता येतात, अशा जमिनी वाटपाच्या बाबतीत सरकारची नियमावली आहे. पूर्वीच्या त्या काळात यासंबंधीचे निर्णय झालेले आहेत. ज्यांनी खाजगी संस्था निर्माण केल्या, त्या संस्थांना जमिनी ट्रान्सफर झाल्या. ज्या जमिनी ट्रान्सफर झालेल्या आहेत, त्या ट्रान्सफर झाल्यानंतर त्या जमिनींवर बांधकामे झालेली आहेत हा पुढचा भाग आहे. ज्या जमिनी ट्रान्सफर झाल्या त्या योग्य की अयोग्य हा मुलभूत प्रश्न यातून निर्माण झालेला आहे आणि म्हणून नियमाप्रमाणे या ट्रान्सफरची चौकशी करण्याचा अधिकार हा तहसिलदारांना आहे. तहसिलदारांकडून ही चौकशी करणे बरोबर नाही म्हणून ते लोक कोर्टात गेले. नंतर कोर्टाने आदेश दिले की, ही चौकशी कोणी करावी हे मुख्य सचिवांनी ठरवावे. आपण या ठिकाणी जी काही सूचना केलेली आहे त्या सूचनेचा आम्ही जरुर विचार करु. या प्रकरणाची योग्य अधिका-यामार्फत सरकारमार्फत चौकशी करण्यात येईल एवढी माहिती मी सदनाला देऊ इच्छितो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ही चौकशी 15 दिवसांत करण्यात येईल काय असा प्रश्न विचारला होता त्या प्रश्नाचे उत्तर आले नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नाचे देखील उत्तर द्यावे.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, या प्रकरणाची चौकशी 15 दिवसातच होईल असे सांगणे थोडे अडचणीचे आहे. परंतु जी काही चौकशी होईल त्यासंबंधीची माहिती निश्चितपणे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, अशी प्रकरणे नाशिक शहरापूरती नसून संपूर्ण नाशिक जिल्हयात अशी प्रकरणे झालेली आहेत. दिंडोरी, निफाड या परिसरातील शेतक-यांच्या जमिनी कुठल्या कायद्यान्वये या उद्योगपतींचा हातात गेल्या हा गुढ प्रश्न आहे. नाशिकच्या

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड.. ता.प्र.क्र.3289...

जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणाचा शोध लावल्याचे माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी सांगितले. जिल्हाधिकारी यांचे अभिनंदन करावयास हवे की, त्यांनी आपल्या अधिकाराचा वापर करुन शेतक-यांना न्याय देण्याच्या हेतूने या प्रकरणाचा शोध घेतला. माझी अशी माहिती आहे की, या प्रकरणाची चौकशी अजून पूर्ण झालेली नाही. अजून अनेक जमिनींचा तपास करण्याचे बाकी आहे. या प्रकरणाची चौकशी या क्षणाला दुस-याकडे देणे म्हणजे त्या चौकशीत अडथळा निर्माण करण्यासारखे होईल. आजपर्यन्त लोकसत्ता या दैनिकामुळे सर्वसामान्यांपर्यन्त हे प्रकरण पोहोचलेले आहे. हे संपूर्ण प्रकरण जिल्हाधिकारी यांनी शोधून काढलेले आहे. म्हणून त्या जिल्हयाधिका-यांच्याच मार्फत या संपूर्ण चौकशीची चक्रे सुरु राहू द्या. त्यांचा अंतिम अहवाल हा शासनाकडे येऊ द्या. मग शासनाने ॲक्शन टेकन प्लॅन करावा तो पर्यन्त ही चौकशी अन्य अधिका-यांकडून न करता जिल्हाधिका-यांमार्फतच करावी अशी मी शासनाला विनंती करतो. तरच सर्वसामान्यांचा आपल्यावर विश्वास बसेल अन्यथा आपणच या चौकशीत हस्तक्षेप करीत आहोत अशी शंका लोकांच्या मनात निर्माण होईल. म्हणून या प्रकरणांची चौकशी जिल्हाधिका-यांकडेच ठेवण्यात येईल काय ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, जिल्हाधिकारी यांच्याकडून चौकशी काढण्याचा विषयच उपस्थित होत नाही. हा विषय मर्यादित आहे.कारण जी प्रकरणे त्यांनी शोधून काढलेली आहेत. त्या जमिनींचे ट्रान्सफर योग्य झाले आहे की, अयोग्य झाले आहे एवढयाच पुरते चौकशीचे काम हे त्यांनीच तहसिलदार यांच्याकडे सुपूर्द केले आहे. जिल्हाधिकारी यांनी तहसिलदारांना सांगितले की, ही प्रकरणे तुम्ही तपासा. त्याबाबतीत ऑब्जेक्शन घेतले गेले आहे की, तहसिलदार हे जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली असल्यामुळे कदाचित आम्हाला न्याय मिळणार नाही. असा काही मुद्दा संबंधितांकडून कोर्टात उपस्थित केला असावा. कोर्टात निश्चित कोणता मुद्दा उपस्थित केला गेला याची मला निश्चित माहिती नाही. या सर्व प्रकरणाची व्याप्ती आपण लक्षात घेतली तर या प्रकरणाची चौकशी कोणी करावी यासंबंधी मुख्य सचिवांना निर्णय घेण्यास सांगण्यात आले आहे. अमूकच करा असे काही सांगितलेले नाही. आपण या ठिकाणी ज्या बाबी सांगितल्या त्या विचारात घेऊनच यासंदर्भातील निर्णय घेतला जाईल.

3...



ता.प्र.क्र.3289...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले की, नाशिक जिल्हयातील दिंडोरी या आदिवासी तालुक्यातील जमिनी रेशीमच्या उद्योगासाठी घेतलेल्या आहेत.मूळ मुद्दा असा आहे की,सुरुवातीला ही प्रकरणे 600 ते 700 असावी असे वाटले होते.परंतु ही एकूण 1200 प्रकरणे आहेत. सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, 1 मार्च रोजी यासंबंधीचे न्यायालयाने निर्देश दिलेले आहेत. न्यायालयाने काय निर्णय दिला ? न्यायालयाने असा निर्णय दिला की, मुख्य सचिवांनी येत्या 15 दिवसात ही केस कोणी हॅन्डल करावी या संदर्भातील निर्णय द्यावा. हा निर्देश 1 मार्च रोजी दिलेला आहे. आजची तारीख ही 16 मार्च आहे. कोर्टाने दोन आठवडयाची मुदत दिली होती. यासंदर्भात बिल्डर्स असोसिएशनने असे ठरविले की, ही चौकशी येथील तहसिलदारांकडे नको, स्थानिक अधिका-यांकडे नको, दुस-या जिल्हयातील अधिका-यांनी यासंदर्भात चौकशी करावी. तेथेही त्यांना असे वाटले की, दुस-या जिल्हयातील अधिका-यांनी निष्कर्ष काढले म्हणून त्यांच्याकडे देखील ही चौकशी नको.

यानंतर श्री. उपरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3289.....

(श्री.अरविंद सावंत)

मुख्य सचिवांना 15 दिवसांमध्ये निर्णय घ्यावयाला सांगितले होते तो निर्णय त्यांनी घेतला आहे काय ? घेतला असल्यास काय निर्णय घेतला ? मुख्य सचिवांनी चौकशीचे अधिकार कोणाला दिले आहेत ? चौकशी केव्हा पूर्ण होईल ? जी अनियमितता झालेली आहे त्याबाबत कार्यवाही कधी होणार आहे ?

श्री.विलासराव देशमुख : आपण सांगितले ते बरोबर आहे. उच्च न्यायालयाने एक मार्चला निकाल दिला असला तरी प्रत्यक्षात 9 मार्चला आमच्याकडे माहिती आली आहे. यासंदर्भात विलंब लागला असला तरी एक-दोन दिवसांमध्ये निर्णय होईल. त्याला फार वेळ लागण्याचे कारण नाही. उद्यापर्यंत यासंदर्भात निर्णय घ्यावा अशी सूचना मुख्य सचिवांना देण्यात येईल.

श्री.अनंत तरे : कोर्टाचा निर्णय मार्च महिन्याच्या एक तारखेला झाला असताना आजपर्यंत निर्णय घेण्यात आलेला नाही. दिलेल्या मुदतीत निर्णय न घेतल्यामुळे कोर्टाच्या निर्णयाचा अवमान झालेला आहे. तरी याबाबत आपल्याला काय म्हणावयाचे आहे ?

श्री.विलासराव देशमुख : आम्हांला 9 मार्च रोजी माहिती मिळाली आहे. त्यामुळे आम्हांला माहिती मिळाल्यापासून 15 दिवसांमध्ये निर्णय घ्यावयाचा आहे.

श्री.अनंत तरे : शासनाचे वकिल कोर्टामध्ये होते किंवा नाही ?

श्री.विलासराव देशमुख : आपणही कोर्टामध्ये जाता. मीसुध्दा कोर्टामध्ये जातो. सगळ्यांना वेगवेगळया कारणांसाठी कोर्टामध्ये जावे लागते. कोर्टाचा निर्णय लागल्या नंतर त्या निर्णयाची सर्टिफाय कॉपी आपल्याला मिळवावी लागते आणि त्यासाठी थोडा वेळ गेला. आमच्या महसूल विभागाकडे 9 मार्चला निर्णय आला. त्यामुळे 9 मार्चपासून पुढील 15 दिवस.

श्री.अनंत तरे : निर्णय कधी घेण्यात येणार आहे ?

श्री.विलासराव देशमुख : सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांच्या प्रश्नाला उत्तर देताना उद्या निर्णय घेण्यात येईल असे मी सांगितले आहे. त्यासाठी फार अभ्यास करण्याचे कारण नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : काही लोकांनी प्रायव्हेट लिमिटेड कंपन्या केल्या आहेत, ट्रस्ट केले आहेत आणि हजारो एकर जमिनी घेतल्या आहेत. तरी या जमिनी घेणारी बिल्डर, भांडवलदार माणसे कोण आहेत ?

डॉ. वसंत पवार : ही नावे सांगितली तर तुम्ही अडचणीमध्ये याल.

श्री.विनोद तावडे : आम्ही अडचणीमध्ये येणार नाही. दिंडोरीच्या संदर्भातही आमची तयारी आहे. तरी या ठिकाणी नावे सांगण्यात यावीत. हे बिल्डर किंवा भांडवलदार कोण आहेत ? त्यांची माहिती माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगावी. त्यांच्या नावांची यादी द्यावी. हा घोटाळा झाला त्यावेळी प्रशासनातील ज्या लोकांनी दुर्लक्ष केले आहे त्यांच्यावर तुम्ही काय कारवाई करणार आहात ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सन्माननीय सदस्यांनी नावे विचारली आहेत. ती नावे माझ्याकडे आता नाहीत. परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, 450 कंपन्यांच्या नावाने जमीन खरेदी झाली आहे. जवळपास 1800 एकर जमीन खरेदी झालेली आहे. आपण सांगता त्याप्रमाणे चुकीच्या पध्दतीने खरेदी झाली असेल तर ज्यांनी चुकीच्या पध्दतीने काम केले आहे त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री.विनोद तावडे : ज्यांनी जमीन खरेदी  केली त्यांच्या नावांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल काय ?

श्री.राजेंद्र शिंगणे : होय.

-----

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## मुंबईतील कापड गिरण्यांच्या जमिनीबाबत

**(३) * १६९७ श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्री. दिवाकर रावते , श्री. विलास अवचट , श्री. अरविंद सावंत , श्री. अनिल परब , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अनंत तरे , डॉ. अशोक मोडक , डॉ. दिपक सावंत :** सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कापड गिरण्यांचे भूखड मालकांना देण्यासाठी शासनाने पूर्वीचा फॉर्म्युला बदलून आता ७९% जागा गिरणी मालकांना देऊन २१% जागेपैकी ७% मुंबई महानगरपालिका ७% म्हाडा,७% मालक असा वाटप फाम्यूर्ला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर फॉर्म्यूल्यामुळे गिरणी मालकांस ८६% जागे बरोबर मुंबई महानगरपालिकेच्या ७% भूंखंडावरही चटई क्षेत्र मिळत असल्याने ९३% चटईक्षेत्र घेऊन गिरणी मालकांना मोठा आर्थिक फायदा झाला हे खरे आहे ज ाय,

(३) असल्यास, सदर फॉर्म्यूल्यानुसार आता गिरणीच्या संपूर्ण जागेचे तीन विभाग करुन त्यानुसार जमिनीचे वाटप करण्यात येणार आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर फॉर्म्युल्यामुळे आता यापुढे म्हाडाला जास्त जागा मिळणार आहे हे खरे आहे ज ाय?

**श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुज यांच्याकरिता :** (१) -ााही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी जो मूळ प्रश्न विचारला होता त्यातील काहीही शब्द येथे नाहीत. माझा मूळ प्रश्न असा होता की," मुबईच्या विकास नियंत्रण नियमाखाली काही अटी घालून गिरणी मालकांना जमिनीच्या विकासाची परवानगी देण्यात येते हे खरे आहे काय आणि असल्यास डेव्हलपमेन्ट कन्ट्रोल रुल्सप्रमाणे 1/3 जमीन म्हाडाला, 1/3 जमीन मुंबई महानगरपालिकेला दिली होती काय ?" परतु या प्रश्नाला उत्तर देण्यात आलेले नाही. जो प्रश्न विचारण्यात आला होता त्याला वेगळेच उत्तर देण्यात आलेले आहे.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, आमच्याकडे प्रश्नाचा जो ड्राफट आला होता त्यानुसार उत्तर देण्यात आले आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात उपप्रश्न विचारावा.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाला "नाही" असे उत्तर देण्यात आलेले आहे. याचा अर्थ असा आहे की, पूर्वीचा नियम क्रमांक 58 हा बदलण्यात आलेला नाही. मुंबईच्या ज्या जमिनी विकल्या गेल्या आहेत तेथे मोठ मोठे टॉवर्स, मॉल्स, शॉपिग सेन्टर्स निर्माण झालेले आहेत. नियम 58 बदलण्यात आलेला नसेल तर आतापर्यन्त म्हाडाला 1/3 आणि मुंबई महानगरपालिकेला 1/3 प्रमाणे किती जमीन मिळाली आहे ?

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1697...

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय,नियम बदललेला नाही. त्याचबरोबर प्रश्नामध्ये 79 टक्के,21 टक्के आणि 7 टक्के जागेच्या बाबतीत उल्लेख करण्यात आला आहे. तेव्हा तो प्रश्न नाही.जुना 58 नियम जो आहे तो तसाच ठेवण्यात आला आहे. त्यातील टक्केवारीत बदल केलेला नाही. परंतु त्यातील तरतुदीत काही बदल केलेला आहे.तो बदल काय करण्यात आला आहे हे मी आपल्याला सांगतो. जुन्या 58 व्या नियमाप्रमाणे खुली जमीन आणि बांधकाम पाडल्यास त्या खालील उपलब्ध होणारी जी जमीन होती तिची वाटणी होऊ शकत होती. किंवा त्यानंतर बी.एम.सी.आणि म्हाडा यांना जे काही क्षेत्र मिळेल त्याच्या कॉम्पेनसेशनसाठी त्या ओनरला टी.डी.आर.दिला जात होता.अशा प्रकारे जुना 58 चा नियम आहे.त्यामध्ये आता असा बदल करण्यात आला आहे की, "आता खुली जागा आणि उर्वरित एफ.एस.आय वाटपासाठी उपलब्ध होणार आहे." जेवढे बांधकाम आहे व त्याचा जो एफ.एस.आय. शिल्लक राहणार आहे तो एफ.एस.आय. वाटपासाठी उपलब्ध राहणार आहे. त्याचबरोबर दुस-या काही महत्वाच्या तरतुदी त्यात घातल्या आहेत. ज्यामध्ये टक्केवारीत बदल केलेला नाही परंतु बी.एम.सी.चा जो एफ.एस.आय आहे तो ओनरच्या प्लॉटवर .लोड करण्याचा विशेष अधिकार दिलेला आहे.त्याचबरोबर त्या भागात जर चाळी असतील तर त्या चाळधारकास 225 स्केअर फुट....

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय,माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर प्रथम पूर्ण ऐकून घ्यावे.काय काय बदल करण्यात आलेले आहेत ते मी थोडक्यात सांगतो.1991 मध्ये ज्या 2 तरतूदी होत्या त्यामध्ये काही नवीन तरतुदी ॲड केलेल्या आहेत त्यानुसार चाळधारकास 225 स्केअर फुटाची विनामूल्य सदनिका मिळणार आहे. कामगारांच्या थकित देयकासाठी एस्क्रो अकाऊन्ट ठेवले जाणार आहे आणि मॉनेटरीग इफेक्टीव्ह करण्यासाठी रिटायर्ड चीफ जस्टीस श्री.चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी स्थापन करण्यात आलेली आहे ती समिती संपूर्णपणे एस्क्रो अकाऊन्टवर मॉनेटरींग करील आणि जेवढया सदनिका विकल्या जातील आणि जे काही पैसे येतील ते सर्व या एक्स्प्रो अकाऊन्टमध्ये येतील .त्यानंतर प्रथम कामगारांचे देणे दिले जाईल,काही फायनाशिंअल इन्स्टिटयूशन्सची देणी आहेत ती दिली जातील आणि त्यानंतर जी रक्कम राहील ती मालकाला मिळेल त्यातून त्यांना बाकीची कामे करता येतील.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1697...

श्री.मधुकर चव्हाण : बी.एम.सी. ला आणि म्हाडाला 1/3 प्रमाणे किती जमीन मिळाली आहे.?

श्री.राजेश टोपे :सभापती महोदय,जो जुना नियम आहे त्या नियमाखाली एकूण 7 प्रकरणे झालेली आहेत.जुन्या 58 व्या नियमाखाली सात प्रकरणे झालेली आहेत व त्या सात प्रकरणामध्ये 33 टक्के जमीन मिळेल असे आपल्याला वाटले होते.परंतु 33 टक्के सुध्दा जमीन मिळू शकत नाही म्हणूनच 58 वा नियम आपण बदललेला आहे. जुना 58 चा नियम जर आपण लक्षात घेतला तर एकूण जमिनीच्या 11 टक्के जमीन बी.एम.सी.ला आणि साडेसात टक्के जमीन म्हाडाला मिळालेली आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मत्रिमहोदय गंभीर विषयाकडे दुर्लक्ष करीत आहेत.जुन्या फॉर्म्युल्यापमाणे बी.एम.सी. आणि म्हाडाला किती जमीन मिळाली ? नवीन नियमाप्रमाणे म्हाडाला व बी.एम. सी.ला जमीन मिळणार नाही.यामध्ये गिरणी मालकांचा करोडो रुपयांचा फायदा होत आहे.बी.एम.सी. आणि म्हाडा या पब्लिक इन्स्टिटयुशन्स आहेत. तेव्हा नवीन फॉर्म्युल्याप्रमाणे म्हाडा आणि बी.एम.सी. यांना एकही फूट जागा मिळत नाही.

नंतर श्री.कानडे .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1697 पुढे सुरु .....

श्री. नितीन गडकरी ....

पूर्वीच्या नियमात दुरुस्ती केल्यामुळे या सगळया जमिनीचा फायदा गिरणी मालकांना शासन देत आहे. जुने नियम होते त्यापेक्षा नवीन नियमांमुळे गिरणी मालकांचा करोडो रुपयांचा फायदा होत आहे. जुने नियम दुरुस्त केल्यामुळे म्हाडा आणि मुंबई महानगरपालिका यांना एक इंचही जमीन मिळत नाही ही गोष्ट खरी आहे काय याबाबत शासनाने स्पष्टीकरण करावे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, अशी परिस्थिती अजिबात नाही. जमीन वाटपाच्या टक्केवारीमध्ये कोणताही बदल झालेला नाही. जी जमीन उपलब्ध होईल त्यामध्ये जुन्या 58 व्या नियमाप्रमाणे आणि नवीन नियमाप्रमाणे जमीन वाटपाच्या टक्केवारीमध्ये कोणताही बदल झालेला नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, जमीन वाटपाचा जो फॉर्म्युला आहे त्यानुसार 1/3 मालकाला, 1/3 महानगरपालिकेला आणि 1/3 म्हाडाला याप्रमाणे जमिनीचे वाटप करण्यात येते. याठिकाणी खुल्या जमिनीचा विषयच नाही. बांधकाम केल्यानंतर 1/3 प्रमाणे जमीन मिळत नाही. पूर्ण जमिनीच्या संदर्भातील हा विषय आहे. खुल्या जमिनीचा विषयच मूळ प्रश्नामध्ये उपस्थित केलेला नाही.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, मूलभूत प्रश्न याठिकाणी उपस्थित झालेला आहे तो टेक्सटाईल इंडस्ट्रीमधील कामगारांच्या संदर्भात उपस्थित झालेला आहे. 1991 साली शासनाने कलम 58 प्रमाणे जे नियम केले त्यामध्ये एक नियम असा होता की अस्तित्वात असलेली इमारत डिमॉलीश केल्यानंतर मोठा एरिया तयार होईल त्या एरियाचे 1/3 प्रमाणे वाटप करावयाचे होते परंतु कुठलाही गिरणी मालक आपली इमारत पाडून 1/3 टक्के सवलतीचा लाभ घेण्यासाठी पुढे आला नाही. मग प्रश्न निर्माण झाला की जुनी इमारत पाडण्यापेक्षा असलेली इमारत नूतनीकरण करणे आणि उरलेली मोकळी जागा आहे त्यापैकी 1/3 मालकाला मिळणार आहे, 1/3 महानगरपालिकेला आणि 1/3 म्हाडाला मिळणार आहे. गिरण्या बंद पडल्या आहेत कामगारांची देणी थकली आहेत. कामगारांच्या नेत्यांनी सरकारला सांगितले की, कुठलाही मालक कामगारांची देणी देत नाही आणि गिरणी चालवू इच्छित नाही. कुठल्याही व्यवस्थेमधून आम्हांला फायदा मिळत

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ KGS/ KTG/ MHM/ प्रथम श्री. गायकवाड 13:55

ता.प्र.क्र. 1697 पुढे सुरु...

श्री. विलासराव देशमुख ....

नाही. कामगारांच्या पैशाची व्यवस्था झाली पाहिजे. त्यानंतर मंत्रिमंडळाने वस्त्रोद्योग मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. समितीने मिल ओनर्स आणि कामगारांचे नेते यांच्याशी याबाबत चर्चा केली. चर्चा केल्यानंतर नवीन वस्त्रोद्योग धोरण शासनाला सादर केले. त्यावर मंत्रिमंडळामध्ये चर्चा केल्यानंतर धोरण मान्य करण्यात आले आणि मग नियम 58 मध्ये बदल करण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्याबाबत हरकती आणि सूचना मागविल्या आणि त्याप्रमाणे बदल केले. हे बदल करीत असताना पहिल्यांदा कामगारांची देणी दिली पाहिजेत त्यावर कोणाचे नियंत्रण राहणार नाही म्हणून हायकोर्टाच्या निवृत्त न्यायाधिशाची नियुक्ती केली. जमिनीच्या विक्रीमधून किंवा बांधलेल्या इमारतीमधून जो काही पैसा मिळेल त्यामधून पहिल्यांदा कामगारांची देणी दिली पाहिजेत. त्यासाठी एस्क्रो अकौंट निर्माण केले. त्यानंतर उरलेले जे काही राहील त्याचे वाटप कसे करावयाचे ते त्याने करावे.

यानंतर श्री. सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख (पुढे चालू...) ता.प्र.क्र.1697 ...

त्याचबरोबर ज्या पूर्वीच्या चाळी आहेत, जेथे गिरणी कामगार रहात आहेत त्यांनासुद्धा, ज्याप्रमाणे आपण इतर योजनांतून किमान 225 चौ.फूटाचे घर देतो त्याप्रमाणे, विनामूल्य घरे दिली पाहिजेत असे आपण केले. आता आमच्या असे लक्षात आले आहे की, जे काही 225 चौ.फूटाचे घर त्या गिरणी कामगाराला देण्याची अट आपण घातली त्यामुळे गिरणी मालकांनी तो भाग तसाच ठेवला आणि उरलेल्या जागेत डेव्हलपमेंट करण्यास सुरूवात केलेली आहे. त्यामुळेच आता आम्ही महापालिका आयुक्तांना आदेश पाठवित आहोत की, जो पर्यंत गिरणी कामगारांना किमान 225 चौ.फूटांची घरे दिली जाणार नाहीत, जे गिरणी मालक आपल्या कामगारांना अशी घरे देणार नाहीत तोपर्यंत गिरण्यांच्या जमिनीवरील बांधकामास कम्प्लिशन सर्टिफिकेट देऊ नये. अध्यक्ष महाराज, या मध्ये मुळात प्रश्न असा निर्माण झालेला आहे की, यामध्ये ही गोष्ट खरी आहे त्या जागांचा वापर अधिक प्रमाणात कमर्शिअल झाला आणि त्यातून गिरणी मालकांना अधिक फायदा मिळतो आहे. सध्या ज्या आपल्याकडे 52-54 कापड गिरण्या आहेत. त्यातील 25 गिरण्या या एनटीसीच्या आहेत आणि एक एमएमटीसीची आहे व बाकीच्या खाजगी मालकांच्या आहेत. एनटीसीच्या गिरण्यांचा विषय बाजूला आहे, पण मूळ मुद्दा हा खाजगी मालकांच्या ज्या गिरण्या आहेत त्याबाबतीत आपण आता हा नियम केला आहे आणि तो करीत असताना प्रथम कामगारांची देणी देऊन त्यांच्या घरांची देखील व्यवस्था झाली पाहिजे हा भाग आम्ही पाहिला आहे. नियम 58 मध्ये दुरुस्ती केल्यानंतर हे लोक पुढे आले. जुन्या नियम 58 नुसार फायदा घेण्यास मात्र कोणीही पुढे आले नव्हते, येत नव्हते. कारण यातून आपला काहीही फायदा होत नाही असे दिसून आल्यामुळेच कोणीही त्यासाठी पुढे आले नाहीत वा येत नव्हते. त्यामुळे आमच्यापुढे प्रश्न असा होता की, गिरणी कामगारांची जी कोट्यवधी रुपयांची देणी शिल्लक आहेत .. आतापर्यंत या योजनेमधून जवळपास 700 कोटीच्या वर देणी या विक्रीतून दिली गेली आहेत आणि 17 हजार कामगारांची व्यवस्था या नियमात दुरुस्ती केल्यामुळे केली गेलेली आहे. तेव्हा या सगळ्या गिरणी कामगारांचे पेमेंट करून, त्यांची व्यवस्था करणे हा त्यातील हेतू होता म्हणूनच या नियमामध्ये बदल आपण केलेला आहे.

...... एम 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1697 ...

श्री. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महाराज, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. प्रमोद नवलकर नेहमी म्हणत की, आडवी असलेली मुंबई आता उभी होत चालली आहे. आणि खरोखरी टिळक ब्रिजवरून जाताना पूर्वी काळे ढग दिसत होते तेथे आता काळी बांधकामे, टॉवर उभे राहिल्याचे दिसत आहे. भयानक परिस्थिती या मुंबईत आणि जवळच्या ठाण्याच्या परिसरामध्ये निर्माण झालेली आहे आणि त्यातच बेरोजगारी वाढत आहे. अध्यक्ष महाराज, नागपूर अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी शब्द दिला होता की, महाराष्ट्रातील तमाम कामगारांच्या जमिनींवर.. फक्त गिरणी कामगार नाहीत, तर जेथे जेथे म्हणून कामगार असतील मग ते छोट्या गिरण्यांतील वा उद्योगातील कामगार असतील ... 1981 साली अडीच लाख गिरणी कामगार मुंबईमध्ये होते तर 25 लाख कामगार इतरत्र काम करीत होते. मी उदाहरणादाखल सांगितले होते की, सीबा-गायगी, जर्मन रेमिडीज इ. या 100-100 एकर जमिनींचे मालक असलेल्या कंपन्या आता बंद पडल्या आहेत आणि अशा उद्योगांतून अनेक कामगार काम करीत होते. त्या कामगारांची देणी दिली जात नाहीत. आणि त्या जमिनींवर आता मोठमोठ्या इमारतींची कामे सुरू झालेली आहेत. त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी नागपूर अधिवेशनामध्ये शब्द दिला होता की, या अधिवेशनामध्येच मी हे कबूल करतो की, 'जोपर्यंत कामगारांची देणी दिली जात नाहीत तोपर्यंत कोठल्याही औद्योगिक जमिनीवर बांधकाम केले जाणार नाही.' गिरणी कामगारांबद्दल आपला उदात्त हेतू आहे हे आम्ही मान्य करतो. पण इतरही कामगार कामगारच आहेत आणि त्यांच्या बाबतीतही शासनाचे धोरण सुस्पष्ट असावे. कारण यापुढे मुंबई-ठाण्यातील बांधकाम हे केवळ औद्योगिक क्षेत्रामध्ये येणार आहे.

( काही विरोधी सदस्य 'हा गिरणी कामगारांचा .. गिरण्यांच्या जमिनींचा प्रश्न आहे' असे सांगून बोलू लागतात ... )

( अडथळा )

**सभापती** : सन्माननीय सदस्यांचा प्रश्न वेगळा आहे. आपल्यापुढे चालू असलेला प्रश्न मुंबईतील कापड गिरण्यांच्या जमिनींच्यासंबंधातील आहे .... तेव्हा सन्माननीय सदस्य यासाठी दुसरा प्रश्न विचारू शकतात. आता हा प्रश्न ते येथे विचारू शकत नाहीत. मी सन्माननीय सदस्य श्री.रावते यांना प्रश्न विचारण्याची संधी देत आहे.

..... एम 3 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महाराज, पण शेवटी गिरणी कामगार आणि औद्योगिक क्षेत्रातील कामगार म्हणजे 'कामगार'च आहे. ...

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी आता उत्तर देताना नियमातील बदल सांगितला ... तो सांगताना त्यांनी सांगितले की, जुने स्ट्रक्चर आहे त्याशिवाय जी खुली जागा आहे त्याचा 1/3, 1/3 करावयाचा, त्या बांधकामतून जे येईल त्याचा एस्क्रो अकौंट करावयाचा आणि त्यातून कामगारांची देणी द्यावयाची. त्यांच्या सांगण्यातील गोंडसपणा अतिशय सुंदर होता. कामगारांच्या हितासाठी शासन किती जागरूक आहे हे त्यातून दिसून येत होते. पण मुळात मुंबईतील गिरणी मालकांची तुंबडी आपण व्यवस्थित भरू दिली. गिरणी मालकांनी यामध्ये आपला फायदा कसा काढला हे मी आपल्याला सांगतो. मी आपल्या सभागृहाचेच उदाहरण देतो. आपण या सभागृहात बसलो आहोत त्या सभागृहाचा चौरस मीटरचा एरिया आहे आणि तसाच त्याच्या उंचीचा एरियाही आहे. पण तो उंचीचा एरिया मोजलाच नाही. गिरण्यांच्या जमिनींवर जे बांधकाम झाले ते अशा प्रकारचे आहे. ....

( यानंतर श्री.जागडे .... एन 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...... ..1697....

मिल मालकांनी आतून मजलेच्या मजले उठविले. त्या ठिकाणी मोठमोठे मॉल बांधले. तेव्हा नवीन इमारत वेगळ्या प्रकारे बांधण्यात आल्या. रिन्यूएशनच्या नावाखाली अशा प्रकारे इमारती बांधून एफएसआय बळकावून टाकला. त्यामुळे मिल मालकांच्या हातात जास्तीत जास्त भाग कसा जाईल, याची नियमात बदल करीत असताना काळजी घेण्यात आली. मा. मुख्यमंत्र्यांनी सांगितले ते बरोबर होते. या ठिकाणी कामगारांची देणी प्रथम द्यावयाची होती. एक तृतियांश, एक तृतियांश असा काही प्रकार सुरुवातीला नव्हता. त्यानंतर नियमात बदल झाल्यामुळे मिल मालकांनी याचा फायदा घेतला. त्याप्रमाणे म्हाडाला तसेच महानगरपालिकेला काहीच मिळाले नाही. आता हा प्रकार संपूर्ण मुंबईत सुरु आहे. मोठमोठे मॉल या जागांवर बांधण्यात आले आहेत. या ठिकाणी बेकायदेशीररित्या चटईक्षेत्र वापरण्यास मालकांना दिले आहे. मिल मालकांचा यामध्ये फायदा करण्यात आला आहे. मिल मालकांच्या बाजुने घेतलेला निर्णय आहे. कामगारांना उध्वस्त करणारा हा निर्णय आहे. यातील मोकळी जागा महानगरपालिकेला तसेच म्हाडाला मिळत नाही. म्हाडाच्या माध्यमातून या शहरात गरीब लोकांची घरे उभी राहिली असती, परंतु तसे झाले नाही. त्यालाही तिलांजली देण्यात आली आहे. सरकारचा हा निर्णय अत्यंत निषधार्ह आहे. कामगारांचा घात करणारा आणि मिल मालकांच्या घशात या जमिनी घालण्याचा शासनाचा हा निर्णय असल्यामुळे आम्ही याचा निषेध नोंदवित आहोत आणि सभात्याग करीत आहोत.

( विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभात्याग केला नाही. )

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, हा नियम करण्यापूर्वी मुंबई महानगरपालिका किती जागा देण्यात आली ? वस्त्रोद्योग मंत्री काशीराम राणा यांच्या उपस्थितीत एनटीसीच्या सगळ्या मिलच्या जमिनी एकत्र करुन यातील जो भाग म्हाडा तसेच महानगरपालिकेला द्यावयाचा आहे, तो भाग एकाच गिरणीतील द्यावयाचा. ज्या गिरणीला बाजारभावानुसार कमी भाव आहे, तेथील जमीन म्हाडा आणि महानगरपालिकेला द्यावयाची आणि मलिदा मिळणा-या गिरण्यांची जमीन बिल्डर्सना देण्याबाबतचा निर्णय झाला आहे काय ?

श्री. राजेश टोपे : आता याबाबतचा आकडा मी सांगू शकत नाही. जुन्या नियमाअंतर्गत जमीन दिली जात नव्हती. म्हणूनच नवीन नियम करण्यात आला. याबाबतची मी एक माहिती सदनाला देवू इच्छितो की, श्री. दीपक पारीख यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आहे. महानगरपालिकेला जुन्या नियमानुसार जमीन दिली जात नव्हती.

16-03-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) N 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( गोंधळ )

श्री. विनोद तावडे : आपण किती जमीन दिली आहे ?

( गोंधळ )

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

( गोंधळ )

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, शासनाच्या निर्णयाच्या विरुध्द आम्ही सभात्याग करीत आहोत.

( विरोधी पक्षाच्या माननीय सदस्यांनी सभात्याग केला. )

**सभापती** : प्रश्नवेला संपली.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवणे

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दि. 15 मार्च 2005 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : दि. 15 मार्च 2005 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी. )

( यानंतर श्री. सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:शोकप्रस्ताव**

**मु.शी.: इंडोनेशियाजवळ समुद्रात झालेल्या भूकंपामुळे त्सुनामी लाटांच्या तडाख्यांमध्ये तामिळनाडू, आंध्र, ओरिसा, पॉंडिचेरी व केरळ या राज्यांसह अन्य देशांच्या किनारपट्टींवरील मृत्युमुखी पडलेल्या हजारो निरपराध मृत व्यक्तींना श्रध्दांजली**.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना कल्पना आहे की, रविवार दिनांक 26 डिसेंबर 2004 रोजी इंडोनेशियाच्या समुद्रात झालेल्या शक्तिशाली भूकंपामुळे समुद्रात उसळलेल्या अक्राळ विक्राळ त्सुनामी लाटांमध्ये तामिळनाडू, आंध्र, ओरिसा, पॉंडिचेरी, केरळ या आपल्या देशातील राज्यांच्या किनारपट्टीवरील व इंडोनेशिया, श्रीलंका, थायलंड, मलेशिया, मालदीव या देशांच्या किनारपट्टीवरील अनेक गावे उध्वस्त झाली व हजारो निरपराध लोक मृत्यूमुखी पडले. अशा नैसर्गिक आपत्तींपासून योग्य तो बोध घेऊन भविष्यात बचाव करण्यासाठी योग्य ते उपाय योजून त्यांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होते की नाही हे पहाणे आवश्यक आहे असे मी या निमित्ताने सुचवू इच्छितो.

या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या निरपराध व्यक्तींना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी मी शोक प्रस्ताव प्रस्तुत करीत आहे.

"रविवार दिनांक 26 डिसेंबर, 2004 रोजी इंडोनेशिया जवळ समुद्रात झालेल्या शक्तीशाली भूकंपामुळे बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या अक्राळ विक्राळ त्सुनामी लाटांच्या तुफानामुळे आपल्या देशातील तामिळनाडू, आंध्रप्रदेश, ओरिसा, पॉंडिचेरी, केरळ इत्यादी राज्यांसह इंडोनेशिया, श्रीलंका, थायलंड, मलेशिया व मालदीव या देशांतील समुद्र किनाऱ्यांवरील अनेक गावे, वस्त्या उध्वस्त झाल्या. हजारो निरपराध लोक मृत्युमुखी पडले. त्या निरपराध व्यक्तींच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

सन्माननीय सदस्यांनी स्तब्ध उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

( सदस्य उभे राहतात )

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : **शो□ प्रस्ताव**

मु. शी.: **सर्वश्री. शालीग्राम राजाराम बसैये, मोतीराम उदेभानजी लहाने-पाटील, मुरलीधर गंगाराम पवार यांच्या ि□ध□ाबद्दल शो□प्रस्ताव.**

श्री. अनिल देशमुख (सार्वजनिक बांधकाममंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री. शालीग्राम राजाराम बसैये, मोतीराम उदेभानजी लहाने-पाटील, मुरलीधर गंगाराम पवार माजी विधा□परिषद सदस्य यांच्या ि□ध□ाबदध्दल मी □ालील शो□प्रस्ताव मांडतो :--

"सर्वश्री शालीग्राम राजाराम बसैये, मोतीराम उदेभानजी लहाने-पाटील, मुरलीधर गंगाराम पवार यांच्या दु:□द ि□ध□ाबददल हे सभा□ृह अतीव दु:□ व्यक्त □रते."

(प्रेस : याठिकाणी सोबत जोडलेले अल्पपरिचय छापण्यात यावेत.)

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (मा.विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, या सभागृहातील माजी सन्माननीय सदस्य सर्वश्री शालीग्राम बसैयेबंधू, मोतीराम उदेभानजी लहाने-पाटील व मुरलीधर गंगाराम पवार यांच्या दु:खद निधनाबद्दल श्रध्दांजली वाहण्यासाठी माननीय मंत्री महोदयांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्याचे अनुमोदन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कै.शालीग्राम बसैयेबंधू यांचा आपल्या सर्वांशी सभागृहात जवळून परिचय होता. ते 1996 पासून 2002 पर्यंत माननीय राज्यपालांकडून नामनियुक्त झालेले विधान परिषदेचे सदस्य होते. ते अतिशय नम्र आणि मृदू भाषी होते. गोड बोलण्यामध्ये सभागृहात त्यांचा हात कोणी धरणार नाही, एवढे त्यांचे नम्र आणि लाघवी व्यक्तीमत्व होते. मराठवाडयातील रेल्वेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आणि औरंगाबाद शहराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. आर्य समाजाच्यावतीने सामुहिक विवाह तसेच, आंतरजातीय विवाह सुलभरित्या व्हावेत म्हणूनही त्यांनी प्रयत्न केले. भारतीय जनता पक्षाचे उत्तम जुने कार्यकर्ते म्हणून ते महाराष्ट्राला परिचित होते. त्यांच्या निधनाने मराठवाडा परिसरातील अनेक कार्यकर्त्यांनी अतिशय दु:ख व्यक्त केले आहे. त्यांच्या दु:खद निधनानंतर मी स्वत: त्यांच्या परिवाराला भेटण्यासाठी गेलो होतो. अतिशय सामान्य परिस्थितीत राहणारा, गरीब कार्यकर्ता अतिशय प्रतिकूल परिस्थितीत काम करुन समाजाची सेवा कशी चांगल्या प्रकारे करु शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणून कै.शालीग्राम बसैये यांचे देता येईल. त्यांच्या दु:खद निधनामुळे समाजाचे मोठे नुकसान झालेले आहे आणि भारतीय जनता पक्षाचे देखील नुकसान झालेले आहे. मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, कै.भाऊसाहेब लहाने-पाटील म्हणजे मोतीराम उदेभानजी लहाने-पाटील यांच्याबद्दल सांगावयाचे तर त्यांचा जन्म 1922 मध्ये झाला. 1952 पासून म्हणजे भारतीय जनसंघाची स्थापना झाल्यापासून ते आमचे कार्यकर्ते होते. ते महाराष्ट्र स्टेट सहकारी भूविकास बँकेचे संचालक होते.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

अकोला जिल्हा व नागपूर विभाग सहकारी भू विकास बँकेचे अध्यक्ष, अकोला जिल्हा सहकारी बँक, सहकारी साखर कारखाना, सूत गिरणी व सहकारी मुद्रणालयाचे संचालक, कृषी उद्योग सहकारी प्रक्रिया संस्था व स्वस्तिक सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष, अनेक शिक्षण संस्थांशी त्यांचा अतिशय जवळून संबंध होता. महाराष्ट्रातून विधानसभेच्या माध्यमातून ते विधानपरिषदेवर दोन वेळा निवडून आले. त्याचबरोबर मागच्यावेळी मुर्तीजा विधानसभाक्षेत्रातून ते विधानसभेवर निवडून आले होते. त्या आधी ते राज्यसभेचे सदस्य होते. भारतीय जनसंघाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष होते. त्यांनी शेवटपर्यंत अतिशय चांगल्या पकारे शेतक-यांच्या प्रश्नावर आवाज उठविला. जुन्या काळामध्ये कापूस उत्पादक शेतक-यांची जी मोठी आंदोलने झाली मग तो बहिरमचा सत्याग्रह असेल त्या आंदोलनामध्ये त्यांनी यशस्वीपणे नेतृत्व केले. गोळीबारामध्ये मोठया मुष्कीलिने ते अचानक परमेश्वर कृपेने वाचले. आयुष्याच्या शेवटपर्यंत ते सतत समाजाची सेवा करीत राहिले. भारतीय जनता पार्टी व राष्ट्रीय स्वंयसेवक संघावर त्यांची अतूट श्रध्दा होती. अकोला मतदार संघातून ते जवळ जवळ दोन-तीन वेळा लोकसभेची निवडणूक लढले. जनसंघाचा आणि त्यांनतर भारतीय जनता पार्टीचा पाया महाराष्ट्रात आणि विशेषत: विदर्भात पक्का करण्यामध्ये त्यांची फार मोठी मोलाची भुमिका होती. अतिश प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांनी आमच्या पक्षाचे नेतृत्व केले आणि त्या काळात पक्षात एक चांगला, उत्तम बेस उभा करुन दिला. त्यांच्या प्रयत्नांमुळे पक्षाला आज महाराष्ट्रात एक मोठे स्वरुप प्राप्त झालेले आहे. शेतकरी, शेतमजुरांकरिता संघर्ष करणारा, सहकार क्षेत्रामध्ये उत्तम काम करणारा आणि शेतक-यांच्या प्रश्नाकरिता सतत आवाज उठविणारा असा हा लोकनेता होता. त्यांचे निधन झाले, त्यामुळे शेतक-यांचे, शेतक-यांच्या चळवळीचे, विदर्भाचे आणि महाराष्ट्रातील राजकारणामधे काम करणा-या एका चांगल्या नेतृत्वाचा अस्त झालेला आहे. भारतीय जनता पार्टी, जनसंघ असेल, राष्ट्रीय स्वंयसेवक संघ असेल या सर्व काळात कै. श्री. मोतीराम उदेभानजी लहाने-पाटील यांनी अतिशय निष्ठेने काम केलेले आहे. म्हणून आमचा कामाचा एक आधार त्यांच्या जाण्यामुळे गेलेला आहे. मी विरोधी पक्षाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

दुसरे सदस्य श्री. मुरलीधर गंगाराम पवार हे जळगाव जिल्हयातील आहेत. त्यांनी देखील या सभागृहामध्ये उत्तम काम केलेले आहे. सन 1986 मध्ये विधानसा सदस्यांद्वारे .................

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

विधानपरिषदेवर त्यांची निवड झाली होती. ते एक ज्येष्ठ समाजसेवक होते. या तीनही माजी सदस्यांचे निधन हा आपल्या सगळयांना मोठा धक्का आहे. विरोधी पक्षाच्यावतीने मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे बोलणे संपवितो.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, या सदनाचे दिवंगत सदस्य सर्वश्री शालीग्राम राजाराम बसैये, मोतीराम उदेभानजी लहाने-पाटील व मुरलीधर गंगाराम पवार, यांच्या दु:खद निधनाबद्दलचा शोक प्रस्ताव या सदनात मांडला गेलेला आहे.त्याला विरोधी पक्ष नेते सन्माननीय श्री. नितीन गडकरी यांनी अनुमोदन दिलेले आहे. मी सुध्दा त्या शोक प्रस्तावाला अनुमोदन देण्यासाठी या ठिकाणी उभा आहे. कै. श्री. शालीग्राम राजाराम बसैये हे माझे वैयक्तिक मित्र होते. त्यावेळी मी संभाजीनगर म्हणजे औरंगाबाद जिल्हयात काम करीत होतो त्यावेळी त्यांच्यांशी माझा अतिशय निकटचा संबंध आला. नेहमी दुस-याशी अतिशय शालिनतेने वागणारे, कोणतीही समस्या समजून घेणारे आणि कधीही आक्रमक न होणारे असे श्री. बसैये होते. मला ते दिवस आजही आठवतात. सन 1985,1986 आणि 1987 मध्ये ज्यावेळी औरंगाबादमध्ये, संभाजीनगरमध्ये मी संघटनात्मक काम करीत होतो, त्यावेळी त्यांचा आणि माझा परिचय झाला. सुरुवातीला त्यांच्यात आणि माझ्यात मतभेद जरुर होते. पण त्यांनी त्या मतभेदाची आमच्या प्रगतीमध्ये किंवा त्यांच्या कुठल्याही कामात आडकाठी कधीही येऊ दिली नाही. नेहमीच दुस-याला समजून घेऊन, अतिशय नम्रपणे वागणारे, असे हे व्यक्तिमत्व होते, असे मी कै. बसैयेंचे जरुर वर्णन करीन.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ RJW/ KTG/ प्रथम कु. थोरात 14:25 वा.

श्री. मधुकर सरपोतदार......

सन 1996 मध्ये राज्यपाल नियुक्त सदस्य म्हणून ते विधान परिषदेमध्ये आले आणि सहा वर्षानंतर निवृत्त झाले. इतक्या लवकर त्यांचे निधन होईल याची कल्पना नव्हती. परंतु ज्यावेळी ही बातमी वाचली त्यावेळी जास्त दु:ख झाले. भारतीय जनता पक्षाचा आणि अतिशय मनमिळावू स्वभावाचा कार्यकर्ता गेला याचे जास्त दु:ख झाले. 1996 ते 2002 या कालखंडामध्ये ते या सदनामध्ये होते.

दुसरे दिवंगत सन्माननीय सदस्य स्वर्गीय मोतीरामजी लहाने यांनी सुध्दा शिक्षण व सहकार क्षेत्रामध्ये काम केले. त्यांचे वैशिष्टय असे की, त्यांनी विधानसभेमध्ये सुध्दा काम केले आणि विधान परिषदेमध्ये सुध्दा काम कले. ते लोकसभेच्या निवडणुका सुध्दा लढले. या देशाची जी सर्वोच्च मंदिरे आहेत त्या मंदिरांच्या माध्यमातून जनतेची सेवा करण्याची संधी त्यांना प्राप्त झाली. त्यांना जी संधी मिळाली त्या संधीचे त्यांनी सोने केले. या ठिकाणी अनेक लोक निवडून येतात परंतु निवडून आल्यानंतर एक लोकप्रतिनिधी म्हणून जी जबाबदारी आहे त्या जबाबदारीला न्याय देणारी माणसे किती असतात हा फार मोठा प्रश्न आहे. आपल्या सदनामध्ये गेली अनेक वर्षे आपण पाहतो की, अनेक आमदार निवडून येतात, लोकसभेमध्ये अनेक खासदार निवडून येतात आणि प्रत्येकाचे काम करण्याचे वैशिटय असते. परंतु अनेक लोकांना आपल्या जबाबदाऱ्या काय आहेत हे मुळीच कळलेले नाही. परंतु या सदनामध्ये स्वर्गीय मोतीरामजी लहाने यांनी जे काम केलेले आहे त्याला तोड नाही. सहकार क्षेत्र असो, शिक्षण क्षेत्र असो, शेतकऱ्यांचे प्रश्न असो किंवा शेतमजुरांचे प्रश्न असो, त्यासाठी त्यांनी आयुष्यभर काम कले. असा कार्यकर्ता आपल्यातून अंतर्धान पावला याचे जरुर दु:ख होते.

सभापती महोदय, तिसरे दिवंगत सदस्य कै. मुरलीधर गंगाराम पवार हे 1986 मध्ये विधान परिषदेमध्ये सदस्य म्हणून आले. एकदा विधान परिषदेमध्ये आलेल्या सदस्यांने राजीनामा दिला नाही तर सहा वर्षे त्या जागेला धक्का पोहोचत नाही. विधानसभेमध्ये किंवा लोकसभेमध्ये निवडून आलेला सदस्य दोन वर्षात, चार वर्षात, पाच वर्षात निवृत्त होतो कारण ते सरकार कधी कोसळेल हे सांगू शकत नाही. परंतु विधान परिषदेमध्ये शाश्वती असते. या ठिकाणी एकदा निवडून आले की सहा वर्षे त्या पदाला काळजी नाही. लोकसभेमध्ये पुष्कळवेळा माझ्या लक्षात आले की, जे लोक राज्यसभेमध्ये निवडून जातात ते लोकसभेमधील सरकार पाडण्याचा प्रयत्न करतात. मी माझ्या अनुभवावरुन बोलतो. त्यामुळे अनेक लोकांनी अशी मागणी करावयास





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

सुरुवात केली की, विधानसभा आणि राज्यसभा यांच्या निवडणुकांचे माध्यम निराळया पध्दतीने ठेवावे आणि त्यांना मध्येच एखादा धक्का देण्याची सोय असावी म्हणजे ते जास्त जबाबदारीने वागतील. निवडून आलेले लोक ज्या पध्दतीने वागतात तसे वागता येईल. लोकांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींमधून निवडून येण्यापेक्षा डायरेक्ट लोकांमधून निवडून यावे म्हणजे अतिशय महत्वाचे काय आहे, कोणत्या महत्वाच्या जबाबदाऱ्या आहेत हे समजून घेण्यासाठी बरे पडते. या सदनाचे तीन माजी सन्माननीय सदस्य आपल्या दृष्टीआड झालेले आहेत. ते या जगामध्ये परत दिसणार नाहीत. ते आपल्या दृष्टीला पडणार नाहीत. परंतु एक गोष्ट निश्चित आहे की, अशी जी माणसे या सदनामध्ये येतात, आपल्या कामाचा ठसा उमटवितात, आपले विचार या ठिकाणी मांडतात त्या सगळया विचारांची शिदोरी इतरांना सुध्दा वापरावयास मिळते. शेवटी त्यांचा अनुभव, त्यांचे वक्तव्य, त्यांचा अभ्यास याचे वाचन केले तर भविष्यात येणारी जी पिढी आहे त्यांना त्यातून मार्गदर्शन होऊ शकते. हे तीनही माजी सन्माननीय सदस्य आज आपल्यामध्ये नसले तरी मी आमच्या पक्षाच्या वतीने आणि विरोधी पक्षातर्फे त्यांना विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो.

------

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ RJW/ KTG/

प्रा. बी. टी. देशमुख ( अमरावती विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. अनिल देशमुख यांनी तीन माजी सन्माननीय सदस्यांच्या दु:खद निधनाबद्दल मांडलेल्या शोक प्रस्तावास सहभावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, श्री. भाऊसाहेब लहाने हे विदर्भातील शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करणारे जेष्ठ नेते होते. या सभागृहामध्ये 1980 मध्ये विदर्भ पदवीधर मतदारसंघातून ते निवडून आले. त्यावेळी तो मल्टीपल मेंबर मतदारसंघ होता. त्या मतदारसंघातून दोन सदस्य निवडून द्यावयाचे होते. श्री. भाऊसाहेब लहाने आणि मी स्वत: त्या दोन जागांमध्ये, त्या ठिकाणी वेगवेगळया विचारांचे प्रतिनिधित्व करणारे सदस्य म्हणून निवडून आलो होतो. श्री. भाऊसाहेब लहाने यांनी सहकार क्षेत्रामध्ये काम केले होते.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

शेतक-यांच्या चळवळीमध्ये काम केले होते. ग्रामपंचायतीमध्ये, जनपथमध्ये, जिल्हा परिषदेमध्ये त्यांनी नेतृत्व केले होते. राज्यसभेमध्ये त्यांनी कार्यकाल घालविला, विधानपरिषदेमध्ये ते होते, विधानसभेमध्ये एक टर्म होते. त्यांच्या विषयीची एक गोष्ट महत्वाची दिसून येते ती अशी की, एखाद्या विचारामध्ये काही तांत्रिक कारणावरुन मतभेद असू शकतात. सुरुवातीला ते कापूस उत्पादक परिषदेचे अध्यक्ष होते, त्या परिषदेने कापूस एकाधिकाराला विरोध केला होता. परंतु त्यावेळी हे लक्षात आले की, ही योजना शेतक-यांच्या हिताची आहे. त्यामुळे त्यांनी कापूस उत्पादक परिषदेमध्ये ठराव करुन एक भूमिका घेतली आणि मग त्या विचारांचे त्यांनी ठामपणे समर्थन केले. मला सभागृहातील एक प्रसंग आठवतो. समोरच्या बाजुला श्री.एन.डी.पाटील हे बसले होते आणि त्यांच्या बाजुला कै.मोतीरामजी लहाने बसले होते. कापूस एकाधिकार योजनेच्या भाषणावर बोलत असताना त्यांच्या स्वभावाप्रमाणे या योजनेचे समर्थन करीत करीत त्यांनी एक वाक्य असे वापरले की, या योजनेला मोठयांपासून लहान्यांपर्यंत सर्वांचा पाठिंबा आहे. यावर कै.भाऊसाहेब लहानेदेखील खाली बसून हसले आणि त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये विचार मांडले होते ते मी आज मुद्दाम पाहून आलो आहे. ते विरोध का करीत होते, तांत्रिक कारणे काय होती, शेवटपर्यंत कापूस एकाधिकाराला समर्थन केले नाही.

दुसरे माजी सदस्य कै.मुरलीधर गंगाराम पवार हे जळगाव जिल्हयातील होते. शुभ्र खादीचा पोशाख व डोक्यावर टोपी घालत असत. ते फार बोलत नसत, परंतु ज्यावेळी बोलत असत त्यावेळी त्याला प्रत्यक्ष माहितीची धार असे. त्यांचे प्रेझेंटेशन फॉर्म कमी जास्त असेल परंतु ते बोलण्यासाठी उभे राहिले की सर्व बाजुच्या सदस्यांना त्यांचे ऐकण्याशिवाय गत्यंतर रहात नसे. त्यांची सुध्दा ग्रामपंचायतीपासून कारकिर्द सुरु झाली होती. या सभागृहामध्ये ते तळमळीने प्रश्न मांडत असत.

तिसरे माजी सदस्य कै.शालीग्राम राजाराम बसैये यांच्याबद्दल कोणीही एक शब्द वापरला नाही तो मी जरुन वापरीन. कै.शालीग्राम बसैये उपाख्य बंधू असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. कारण मराठवाडयामध्ये सर्वजण त्यांना बंधू असेच म्हणावयाचे. आणि ते सुध्दा बोलण्याची

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ RJW/

प्रा.बी.टी.देशमुख...

सुरुवात करताना काय बंधू असे म्हणत असत. कै.बसैये बंधू हे या सभागृहामध्ये एक टर्म सदस्य होते. ते मोजकेच प्रश्न मांडत असत परंतु त्या विषयाची ठामपणे मांडणी करीत असत. या तिन्ही दिवंगत माजी सदस्यांना या शोकप्रस्तावाच्या निमित्ताने मी माझ्या सहभावना व्यक्त करतो आणि मी थांबतो.

-----

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ RJW/

श्री.सुधाकर गणगणे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आज सभागृहासमोर आलेल्या दु:खद प्रस्तावाच्या निमित्ताने कै.शालीग्राम राजाराम बसैये, कै.मोतीरामजी लहाने-पाटील आणि कै.मुरलीधर गंगाधर पवार या तीन माजी सदस्यांचा माझा थोडाबहुत परिचय होता. त्यामध्ये कै.मोतीरामजी लहाने हे माझ्या अकोला जिल्हयातील होते आणि अकोला जिल्हयामध्ये जे अनेक राष्ट्रीय नेते क्षितिजावर होते, त्यात अनेकांची काम करण्याची वेगवेगळी शैली होती. परंतु कै.मोतीरामजी लहाने हे अतिशय तत्ववादी व्यक्तिमत्व होते. कै.मोतीरामजी लहाने यांचा आणि माझ ा परिचय अगदी बालपणापासून आला होता. त्यांचा आणि माझा जवळचा संबंध होता.

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सुधाकर गणगणे पुढे सुरु....)

अकोला जिल्हयामध्ये भारतीय जनसंघाच्या स्थापनेपासून आणि नंतर भारतीय जनता पार्टीमध्ये असताना पक्षाशी एकनिष्ठ राहून पक्षाला पुढे नेण्याचे त्यांनी कार्य केले. मला तर असे वाटते की, अकोला जिल्हयामध्ये इतर कोणत्याही पक्षाच्या नेत्याने केले नसेल इतके कार्य कै. मोतीरामजी लहाने-पाटील यांनी केलेले आहे. सर्व क्षेत्रामध्ये त्यांनी आपला ठसा उमटवलेला आहे, मग ते सहकार क्षेत्र असो, शैक्षणिक क्षेत्र असो, सामाजिक क्षेत्र असो की, राजकीय क्षेत्र असो. अशा विविध क्षेत्रामध्ये त्यांनी संघर्षाची भूमिका घेऊन आपल्या पक्षाची बांधणी केली. ते अत्यंत मृदुभाषी होते आणि त्यांची राहाणी अतिशय साधी होती. अकोला जिल्हयामध्ये विकासाच्या कामाच्या संदर्भातून माझी जेव्हा राजकीय कारकीर्दीला सुरुवात झाली त्यावेळी मी फार लहान होतो. परंतु सुरुवातीलाच त्यांनी मला सांगितले होते की, "जरी मी विरोधी पक्षाचा असलो तरी आपल्या जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने आपण एकत्र काम केले पाहिजे. जिल्हयातील जे निरनिराळे विकासाचे प्रकल्प आहेत त्यामध्ये कोणतेही प्रश्न निर्माण झाले तर मी तुला निश्चितच साथ करीन". त्यांनी सांगितलेल्या या गोष्टीचा मला अनुभवही आला. मी अकोटमध्ये जेव्हा सहकारी सूत गिरणीची स्थापना केली त्यावेळी सहकार क्षेत्रातील अनेक लोक माझ्या विरोधात गेले आणि त्यांनी अडचणी निर्माण केल्या. परंतु अशा प्रसंगी कै. मोतीरामजी लहाने यांनी मला वेळोवेळी धीर दिला. त्यांनी सांगितले की, विरोध झाला तरी घाबरुन जायचे नाही. सहकार क्षेत्रामध्ये काम करीत असताना कोणत्याही अडचणी निर्माण झाल्या तरी मी तुझ्या बरोबर राहीन, असे त्यांनी मला आश्वासन दिले. इतकेच नाही तर माझ्या सहकार क्षेत्रातील कार्यामध्ये मदत करण्यासाठी त्यांनी त्यांचे कार्यकर्तेही माझ्याबरोबर दिले. असे हे अत्यंत उदात्त व्यक्तिमत्व. कै. मोतीरामजी लहाने यांनी पक्षाशी एकनिष्ठ राहून सतत पक्ष वाढविण्याचे काम केले. अनेक वेळा निरनिराळया निवडणुकामध्ये त्यांना पराजयही स्वीकारावा लागला. परंतु पक्षाची प्रतिकूल परिस्थिती असतानाही त्यांनी पक्षनिष्ठा सोडली नाही. राजकीय क्षेत्रामध्ये सर्वांना बरोबर घेऊन जाणारे असे हे व्यक्तिमत्व. आज ते आपल्यातून निघून गेलेले आहेत. तसेच सर्वश्री शालीग्राम राजाराम बसैये व मुरलीधर गंगाराम पवार हे देखील आज आपल्यामध्ये नाहीत. मी या सर्वांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

---

MSS/ RJW/ KGS/

डॉ. अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, तीन सन्माननीय सदस्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी म्हणून आपण येथे जमलो आहोत. दुर्दैवाने कै. मोतीरामजी उदेभानजी लहाने-पाटील आणि कै मुरलीधर गंगाराम पवार यांच्याशी माझा फार जवळून संबंध आला नाही. परंतु कै. शालीग्राम राजाराम बसैये यांच्याशी मात्र या सदनामध्ये माझी मैत्री जुळलेली होती. म्हणून मित्रकर्तव्याच्या भावनेतून मी या ठिकाणी त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी उभा आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक...

वस्तुत: सन्माननीय श्री.नितीनजी गडकरी हे या ठिकाणी बोलले. पक्षाच्या एकाच सदस्याने बोलावे असा संकेत आहे आणि त्या अर्थाने काहीशी संकेताची पायमल्ली होते आहे याची मला जाणीव आहे. कै.शालीग्रामजी यांच्या विषयी बोलावयाचे म्हटले तर मला स्वत:ला त्यांचा जो सगळयात लोभसपणाचा गुण आयुष्यभर जाणवत राहील तो त्यांचा साधेपणाचा. आमदार माणूस आम आदमी म्हणूनच रहावा आणि त्याने सामान्य माणसाशी आपले जिव्हाळाचे निरपेक्ष बंधुत्वाचे नाते कायम ठेवावे हा एक वस्तुपाठ श्री.शालीग्रामजींच्या निजी आणि सार्वजनिक कर्तृत्वातून कोणालाही प्राप्त होईल. सभापती महोदय, मला या संदर्भात सभागृहात एक मुद्दा सांगितलाच पाहिजे की, तुम्हा आम्हाला जो विकास निधी मिळतो, याला आपण कोण का जाणे आमदार निधी म्हणतो, जसे दिल्लीच्या लक्ष्मी नारायण मंदिरास बिर्ला मंदीर असे नाव मिळाले आहे. तसाच काहीसा हा प्रकार आहे. खरे म्हणजे हा निधी आपण आपल्या खिशातल्या पैशातून द्यावयाचा नसतो याचे भान जर कोणी सापेक्षबुध्दीने ठेवले असेल तर ते श्री.शालीग्रामजींनी ठेवले असे मी छातीठोकपणे सांगू शकतो. त्या निधीचा चोख हिशोब त्यांनी ठेवला. त्यातून समाजाच्या हिताचे प्रकल्प उभे केले, त्यातून अनेक बांधवाना दिलासा मिळेल अशा त-हेची निवासस्थाने त्यांनी उभी केली. म्हणजे जर साधेपणा हा त्यांचा पहिला पैलू असेल तर सरकारकडून आपल्या नावावर वर्ग झालेला निधी समाजाच्या हितासाठीच पारदर्शक बुध्दीने वापरला पाहिजे हा त्यांचा मनातील निश्चय व त्यांचा जीवनातील दुसरा पैलू होता. मला तिसरा आणखी एक महत्वाचा विषय सांगितलाच पाहिजे. माननीय श्री. गणगणे जे या ठिकाणी बोलले ते खरे आहे. शेवटी पक्षाशी एकनिष्ठा हा एक फार मोठा, महत्वाचा असा गुण आज सार्वजनिक जीवनात आहे. ज्यावेळी स्वातंत्र्योत्तर काळात संस्था आणि संघटना विलयाला जात आहेत, त्यावेळेला विशेषत: वर्तमान कालखंडात आपण कोणत्याही संघटनेचे काम करीत असू, त्या संघटनेचे आपण देणे लागतो आहोत, अनुभव भले गोड,कडू,खारट, तु-रट,वाईट येतील सुध्दा याचे विलक्षण भान श्री.शालीग्रामजींनी आयुष्यभर बाळगले हे मला या ठिकाणी नमूद करावेसे वाटते. सभापती महोदय, ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीतील उक्त्ती मला येथे मोठया समर्पक शब्दात सांगावीशी वाटते. ज्ञानदेव बोलून गेले...

2...

डॉ. अशोक मोडक...

" मेघ चातकावरी वळेना,
तरी चातक पालटेना,
चंद्र वेळेवरी उगवेना,
तरी चकोर अन्यन्य,
ऐसे असावे संख्यत्व."

संघटनेचे आणि आपले नाते मेघ आणि चातक यांच्यातल्या नात्याशी पैजा खेळत असते, चंद्र आणि चकोर यांच्या नात्याशी पैजा खेळत असते, मेघ कदाचित माझ्याकडे वळणार नाही तरीही मी जर चातक असेल तर माझे मेघावरचे प्रेम कमी होता कामा नये. चंद्र कदाचितवेळेवर उगवणार नाही, पण चकोर मात्र चंद्रावरचे प्रेम करीत नसतो. आज या जीवनमूल्यांची नितांत आवश्यकता आहे.वर्तमानकाळातील मूल्यांची घसरण थांबवावयाची असेल तर मला असे वाटते की, श्री.शालीग्रारामजी काय, श्री. मोतीरामजी लहाने काय, अशा या सगळया व्यक्तिरख्स आदर्श तुम्ही आम्ही यासाठी गिरविण्याची नितांत आवश्यकता आहे. मी मघाशी म्हटल्या प्रमाणे मित्रकर्तव्याच्या भावनेतून श्री.शालीग्राजींना श्रध्दांजली वाहण्यास मी उभा राहिलो आहे. सभापती महोदय,आपण मला अनुमती दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो.श्री.शालीग्रामजींना विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे भाषण संपवितो.

--------

यानंतर श्री. उपरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरूनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री. अनिल देशमुख यांनी सर्वश्री शालीग्राम राजाराम बसैये, मोतीराम उदेभानजी लहाने-पाटील व मुरलीधर गंगाराम पवार, माजी विधान परिषद सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे त्याबाबतीत माझ्या सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, श्री. शालिग्राम बसैये आणि श्री.मोतीराम उदेभानजी लहाने-पाटील यांचा आणि माझा फारसा परिचय नाही. श्री. मोतीराम लहाने-पाटील हे विदर्भातील जनसंघ आणि आताच्या बी.जे.पी.चे प्रमुख कार्यकर्ते होते. विदर्भातील विरोधी पक्षाचे ते प्रमुख नेते होते. पण श्री.मुरलीधर पवार यांच्याशी पक्ष संघटनेच्या माध्यमातून माझा संबंध आला होता. त्यांची आणि माझी अनेक वेळा भेट झालेली होती. ते आणि मी एकत्र येण्याचे अनेक प्रसंग आले होते. ते टिळक भवनमध्ये आणि काँग्रेसच्या निरनिराळ्या व्यासपीठावर येत होते. ते स्वच्छ लेंगा आणि झब्बा घालीत असत आणि इस्त्री केलेली कडक टोपीही घालीत असत. या सभागृहामध्ये जे सन्माननीय सदस्य निवडून येतात ते सहा वर्षाच्या कालावधीसाठी येत असतात. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी असे सांगितले की, या ठिकाणी जे लोक निवडून येतात त्यापैकी काही लोक लोकसभेमध्ये आणि राज्यसभेमध्येही जातात. या सभागृहामध्ये जे सन्माननीय सदस्य निवडून येतात ते राजकारणामध्ये, समाज जीवनामध्ये काम करीत असले तरी या ठिकाणी विद्यार्थी म्हणून येत असतात. या सभागृहामध्ये निवडून आलेला सभासद सहा वर्षे काम केल्यानंतर एक परिपक्व विचार घेऊन आणि संपूर्ण राज्याची माहिती असलेला एक उत्तम कार्यकर्ता म्हणून सभागृहातून बाहेर जात असतो. खालच्या सभागृहामध्ये आणि आपल्या सभागृहामध्ये असा फरक आहे की, खालच्या सभागृहामधील सन्माननीय सदस्यांची मुदत संपल्यावर संपूर्ण सभागृह एकाच वेळी बरखास्त होते. परतु आपल्या सभागृहाचे वैशिष्ट्य असे आहे की, आपले सभागृह अखंडपणे चालू असते. दर दोन वर्षानी सभागृहातील 1/3 सदस्य निवृत्त होत असतात आणि ते निवृत्त झाल्यानंतर त्यांच्या जागी दुसरे सदस्य येत आतात. जे सदस्य निवृत्त होतात त्यांना या सभागृहामध्ये निरोप दिला जातो. त्यामुळे या तीन दिवंगत सदस्यांनाही या सभागृहाने निरोप दिलेला आहे. आज हे तीनही माजी विधान परिषद सदस्य आपल्यामध्ये नाहीत. परंतु त्यांनी या सभागृहाच्या कामकाजामध्ये भाग घेऊन या सभागृहाची शान वाढविली आहे आणि महाराष्ट्राचा विकास करण्यासाठी त्यांनी जे योगदान दिले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरूनाथ कुलकर्णी )

आहे त्याचे आज स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. मी माझ्या वतीने आणि माझ्या पक्षाच्या वतीने या तीनही दिवंगत सदस्यांना अत्यंत आदरपूर्वक श्रध्दांजली अर्पण करतो आणि त्यांच्या आत्म्याला चिरशांती लाभो अशी ईश्वराजवळ प्रार्थना करून मी माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SDU/ KGS/ RJW.

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सर्वश्री शालीग्राम राजाराम बसैये, मोतीराम उदेभानजी लहाने-पाटील व मुरलीधर गंगाराम पवार, माजी विधान परिषद सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. त्याबाबत मी सहवेदना व्यक्त करीत आहे. श्री. शालीग्राम राजाराम बसैये यांना बसैये बंधू असे म्हटले जात असे. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या आंदोलनाच्या वेळी ज्या ज्या वेळी मी औरंगाबादला जात होतो त्या त्या वेळी बसैये बंधूंची आणि माझी भेट व्हायची. नामांतराच्या संदर्भात लाँग मार्चचे तीव्र आंदोलन सुरू झाले त्यावेळी ते आंदोलन दडपण्यासाठी शासनाने अनेक प्रकारच्या मार्गांचा अवलंब केला होता.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेन्द्र कवाडे ...

आम्हाला अटक करण्यासाठी जेव्हा पोलिसांचा ससेमिरा आमच्या मागे लागावयाचा तेव्हा आमच्यापैकी अनेक मंडळी आमच्या पासून दूर राहण्याचा प्रयत्न करावयाची. अशी पळापळी सुरु असतांना माझी कै. बसैय्ये बंधूची भेट झाली होती.तेव्हा त्यांनी कशाचीही पर्वा न करता आपल्या घरी आम्हाला चहापानासाठी नेले होते. हा दिवस मी विसरु शकत नाही. आंदोलनामध्ये जे अनुभव येतात ते अनुभव विसरण्यासारखे नसतात. कै. शालिग्राम बसैय्ये यांना सर्वजण बंधू असे म्हणत असत त्याप्रमाणे मी सुध्दा त्यांना बंधूच म्हणत होतो. ते कोणत्या पक्षाचे होते हे सुध्दा मला माहीत नव्हते.परंतु न्यायासाठी सघर्ष करणा-या, न्यायासाठी आंदोलन करणा-या लोकांवर मात्र त्यांचे प्रेम होते.त्यांना पाठिंबा देऊन त्यांचा उत्साह वाढविण्याचे काम कै. शालिग्रामजी बसैय्ये बंधू यांनी केले होते. पुढे मागे जेव्हा मी आंदोलनाचे चरित्र लिहिण्याचा प्रयत्न करील तेव्हा कदाचित कै. शालिग्राम बसैय्ये बंधू यांचा अगत्यपूर्वक उल्लेख त्यात केला जाईल.ते अत्यंत शालीन, शांत आणि सुस्वभावी होते.मराठवाडयाच्या विकासासाठी रेल्वे रुंदीकरणाचे जे आंदोलन झाले होते त्या आंदोलनामध्ये त्यांनी भाग घेतला होता.मराठवाडयाच्या विकासासाठी, रेल्वे रुंदीकरण करण्यासाठी त्यांनी जो संघर्ष केला तो संघर्ष औरंगाबाद शहरातील जनता कदापि विसरु शकणार नाही.शालिग्राम बसैय्ये बंधू यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो. त्याचबरोबर कै. मोतीरामजी लहाने यांचे दु:खद निधन झालेले आहे. त्यांचाही शोक प्रस्ताव येथे मांडण्यात आला आहे जनसंघापासून ते भारतीय जनता पक्षापर्यन्तची त्यांची वाटचाल राजकीय चळवळीचा विद्यार्थी म्हणून मी अभ्यासत आलो आहे.ते संघनिष्ठ होते त्याचबरोबर पक्षनिष्ठ होते.तात्विक दृष्टीकोनातून राष्ट्रीय स्वयं सेंवक संघाशी आमचा प्रचंड विरोध होता परंतु अकोल्यामध्ये जेव्हा जेव्हा जाण्याची मला संधी मिळाली आणि जेव्हा जेव्हा जाहीर सभेत बोलण्याचा प्रसंग आला तेव्हा आम्ही मोतीरामजी लहाने यांच्या सारख्या संघनिष्ठ नेत्यांवर आम्ही तुटून पडावयाचो.एवढा विरोधी असतांना सुध्दा आमच्या सारख्या कार्यकर्त्यावरील त्यांची माया मात्र कमी झालेली नव्हती. वैचारिक मतभेद असतांना, तात्विक मतभेद असतांनासुध्दा आपल्या विरोधकांवर प्रेम करण्याची, माया करण्याची जी भावना आहे ती अलीकडच्या काळात कमी होत असतांना दिसून येत आहे. परंतु ही भावना कै. लहाने यांच्यामध्ये प्रकर्षाने जाणवत होती.या सभागृहातील सदस्यांनी संसदेमध्ये तसेच संसदीय क्षेत्रात जी महत्वपूर्ण कामगिरी केली होती ती मी कदापि विसरु शकणार नाही.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेन्द्र कवाडे ...

शेतक-यांसाठी त्यांनी भरीव कामगिरी केली होती.आज आपण शेतक-यांच्या कापसाच्या संदर्भात चर्चा उपस्थित करणार आहोत. परंतु शेतक-यांच्या प्रश्नासाठी आणि त्यांच्या विकासासाठी त्यांनी केलेली कामे आम्ही कदापि विसरु शकणार नाही. कै. मुरलीधर गंगाराम पवार यांनीसुध्दा आपल्या सभागृहात अत्यंत मोलाची कामगिरी केली असून त्यांनी चांगले योगदान दिले होते. ही गोष्ट हे सदन विसरु शकणार नाही. सभापती महोदय, माजी सदस्य कै. शालिग्राम राजाराम बसैय्ये बंधू, मोतीराम उदयभानजी लहाने,मुरलीधर गंगाराम पवार या सदस्यांच्या

दु:खद निधनाबद्दल माझ्या वतीने आणि पिपल्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने मी विनम्र श्रध्दाजंली अर्पण करतो.

-----

नंतर श्री.कानडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ RJW/ SBT/ MHM/ KGS/ प्रथम श्री. गायकवाड 14:55

**सभापती** : सदनामध्ये विधानपरिषदेचे तीन माजी सदस्य सर्वश्री शालीग्राम राजाराम बसैये, मोतीराम उदेभानजी लहाने-पाटील आणि मुरलीधर गंगाराम पवार यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडण्यात आला आणि त्या प्रस्तावाला विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी यांनी पाठिंबा दिलेला आहे. सदनातील दोन्ही बाजूच्या मा. सदस्यांनी या तीन माजी सदस्यांनी जे कार्य केले त्याबद्दल आपल्या भावना याठिकाणी व्यक्त केलेल्या आहेत.

कै. शालीग्राम बसैये यांचा आणि माझा व्यक्तीगत परिचय नव्हता. परंतु सदनातील सदस्यांनी त्यांच्याबद्दल ज्या भावना व्यक्त केल्या त्या भावना त्यांच्याविषयीचे कार्य सांगणा-या आहेत. त्यांचे राजकीय आणि सामाजिक कार्य सर्व लोकांना सातत्याने प्रेरक ठरले आहे. संघर्ष करणा-या व्यक्तिच्या पाठीशी उभे राहणारे असे त्यांचे विशाल व्यक्तिमत्व होते. 1996-20002 या कालावधीत राज्यपाल नामनियुक्त म्हणून ते या सदनाचे सदस्य होते. त्यांचे जे कार्य याठिकाणी सांगण्यात आले त्याप्रमाणे अशा त्यागी व्यक्तिला याठिकाणी मी श्रध्दांजली वाहतो.

कै. मोतीराम लहाने-पाटील यांचे कार्य ज्यावेळेला मी विधानसभेमध्ये होते त्यावेळी पाहिले आहे. राज्यामध्ये शेतक-यांच्या अनुषंगाने विशेषत: भूविकास बँकेच्या माध्यमातून शेतक-यांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी चांगले काम केले. विशेषत: विदर्भामध्ये त्यांनी या क्षेत्रात काम केले. शेतक-यांच्या समस्या सोडविण्यासाठी ते राज्याच्या अन्य भागामध्ये सुध्दा फिरले. राजकीय दृष्टया ते एका पक्षाचे असले तरी शेतकरी हा केंद्रबिंदू मानून शेतक-याचे प्रश्न सोडविण्याकरिता विदर्भात आणि राज्यात त्यांनी प्रयत्न केले. विशेषत: भूविकास बँकेच्या माध्यमातून शेतक-यांना अल्प दराने कर्ज मिळण्याच्या अनुषंगाने त्यांनी प्रयत्न केले.

कै. मुरलीधर पवार यांची व माझी व्यक्तिगत ओळख नव्हती. त्यांच्याशी मला बोलण्याची संधी मिळाली. सहकारी चळवळीच्या माध्यमातून आणि शिक्षण क्षेत्रामध्ये त्यांनी खानदेशात उठावदार काम केले. या तीनही माजी सदस्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी त्यांना श्रध्दांजली वाहतो आणि सर्व मा.सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून शोक प्रस्ताव संम्मत करावा.

सदस्यांनी खाली बसावे.

( सदस्य उभे राहतात. )

शोक प्रस्ताव संम्मत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

(2....

**सभापती** : आता जवळ-जवळ तीन वाजले आहेत. मला वाटते नियम 97 खाली जो प्रस्ताव दिलेला आहे तो लगेच सुरु करण्यापेक्षा......

श्री. दिलीप वळसे-पाटील(ऊर्जा मंत्री) : अध्यक्ष महोदय, मला धोरणात्मक निवेदन करावयाचे आहे.

**सभापती** : मघाशी असे ठरले आहे की, शोक प्रस्तावानंतर नियम 97 अन्वये कापसावरील चर्चा पूर्ण करावयाची आहे. त्यानंतर कामकाज पत्रिकेवरील इतर कामकाज घेण्यात येणार आहे.

यानंतर श्री. सुंबरे

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** (पुढे चालू ....

इतर कामकाज म्हणजे आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर असलेले इतर कामकाज. तेव्हा मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, त्यांना नियम 46 खाली जे निवेदन करावयाचे आहे ते त्यांना या चर्चेनंतर करता येईल.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महाराज, माझी विनंती आहे की, पॉवर जनरेशन संबंधात जी नवीन पॉलिसी आपण.. राज्य सरकारने ॲडॉप्ट केलेली आहे त्यासंबंधीचे निवेदन मी आताच खालच्या सदनामध्ये केलेले आहे आणि आता मी ते या ठिकाणी करू इच्छितो आहे. कारण नंतर खालच्या सभागृहामध्ये माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा सुरू होईल तेव्हा मला त्या ठिकाणी बसावे लागणार आहे. दुसरे असे की, आपल्या राज्याच्या दृष्टीकोनातून पॉवर जनरेशनचा विषय हा अत्यंत महत्त्वाचा आहे आणि त्यासंबंधीचे राज्य सरकारचे धोरण आपल्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचणार आहे. खालच्या सदनामध्ये यासंबंधीचे निवेदन मी केलेलेच आहे आणि या सभागृहामध्ये ते जर मी आज करू शकलो नाही तर पुन्हा प्रोप्रायटीचा प्रश्न निर्माण होईल. म्हणून माझी माननीय विरोधी पक्षनेत्यांना विनंती आहे.. तसे ते उदार मनाचे आहेत आणि नेहमीच ते सहकार्य करीत असतात तेव्हा त्यांनी राज्यातील वीजेच्या लोड शेडींग संबंधातील शासनाच्या धोरणासंबंधातील हे निवेदन आता करू देण्यास मान्यता द्यावी.

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, मी नेहमीच सहकार्य करीत असतो आणि आजही करण्यास तयार आहे. परंतु आम्ही आपल्याकडे नियम 289 चा प्रस्ताव दिला होता आणि आजचे सभागृहापुढील सर्व विषय-कामकाज स्थगित करून त्यावर चर्चा करण्याची विनंती कली होती. ती आपण मान्यही केली पण त्याचबरोबर आपण आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी विनंती केली की, शोक प्रस्ताव झाल्यानंतर ही चर्चा घ्यावी. आपल्या या विनंतीला आम्ही मान दिला आहे आणि आता ठरल्याप्रमाणे नियम 97 खाली चर्चा व्हायला पाहिजे अन्यथा त्या नियमाचे स्पिरीटच निघून जाईल. तेव्हा मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, आज आम्ही येथे 8.00 वाजेपर्यंत कामकाज करणार आहोत. तेव्हा आपण या चर्चेनंतर केव्हाही निवेदन करण्यास यावे आम्ही आपल्याला सहकार्य करू.

.... वाय 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महाराज, आपल्या प्रथेनुसार शोक प्रस्ताव संमत झाल्यानंतर आपण 10 मिनिटे सभागृहाची बैठक स्थगित करीत असतो. तरी आता ती प्रथा आपण पाळावी.

**सभापती** : बरोबर आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 30 मिनिटांनी पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक 3.02 वाजता स्थगित झाली. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी : मा. उपसभापती )**

**पृ.शी./मु.शी.: सभापती-तालिका नामनिर्देशित करणे**

**उपसभापती** : मी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 8 च्या पोट नियम ( 1 ) अन्वये खालील सदस्यांची सभापती तालिकेवर नामुनियुक्ती करतो.

1) श्रीमती सुधा जोशी
2) प्रा. फौजिया तहसिन खान
3) डॉ. अशोक मोडक
4) श्री. अनंत तरे

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कापसाला 2700 रुपये भाव देण्याच्या घोषणेपासून शासनाने घेतलेली माघार.

**मु.शी.**: कापसाला 2700 रुपये भाव देण्याच्या घोषणेपासून शासनाने घेतलेली माघार या विषयी श्री. नितीन गडकरी यांनी उपस्थित किलेली अल्पकालीन चर्चा.

**उपसभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी अडीच तासाचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. नितीन गडकरी ( विरोधी पक्षनेता ) : महोदय, मी नियम 97 अन्वये पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"ज्या अर्थी, आघाडी शासनाने कापसाला 2700 रुपये भाव देण्याची घोषणा केली व त्यानंतर त्या निर्णयापासून माघार घेतली आणि,

ज्या अर्थी, याच शासनाने राज्यातील शेतक-यांच्या कर्जावरील व्याज माफ करण्याची घोषणा केली व त्या निर्णयापासून देखील माघार घेतली आणि,

ज्या अर्थी, कापूस खरेदी योजनेअंतर्गत शासनाने खरेदी केलेल्या कापसाचे 3600 कोटी रुपये शेतक-यांना अद्याप द्यावयाचे आहेत आणि,

ज्या अर्थी, कापूस खरेदी केंद्रावर कापूस विक्रीसाठी शेतक-यांच्या बैलबंडीच्या मैलागणती रांगा लागलेल्या असतानाच शासनाने अचानक कापूस खरेदी बंद करण्याचा निर्णय घेतला आणि,

ज्या अर्थी, कापूस पणन महासंघाचे कर्मचारी व व्यापारी यांनी संगनमताने बाहेरील राज्यातील कापूस राज्यातील शेतक-यांच्या नांवावर दाखवून राज्य शासनाच्या निधीची लूट केलेली आहे व त्यामुळे येथील शेतक-यांचा हजारो क्विंटल कापूस अद्याप विक्रीविना पडून आहे व त्यांच्या खरेदी केलेल्या कापसाचे पैसेही त्यांना मिळालेले नाहीत आणि त्यांनी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या केलेल्या आहेत आणि,

ज्या अर्थी, मंत्रालयाच्या दारात विशाल शिंदे नावाच्या अशाच एका वैफल्यग्रस्त शेतक-यांने दिनांक 4 मार्च 2005 रोजी किटकनाशक औषध घेऊन आत्महत्या केली आणि,

ज्या अर्थी, राज्याच्या इतर भागात देखील कापूस खरेदी केंद्रावरच 15/15 दिवस उपाशीपोटी रहावे लागल्याने शेतक-यांना प्राण गमवावे लागले तर काहीनी स्वत:स जाळून घेण्याच्या घटना घडल्या आहेत आणि,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

ज्या अर्थी, शेतक-यांच्या या दयनीय अवस्थेकडे शासनाचे पूर्ण दुर्लक्ष झालेले आहे."

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यात कापूस एकाधिकार योजना सुरु आहे. या योजनेला केंद्र सरकारने 10 वर्षाकरिता मुदतवाढ दिली आहे. या योजनेच्या संदर्भात कॉटन मोनोपॉली ॲक्ट महाराष्ट्रात आज अस्तित्वात आहे की नाही, हे समजण्याकरिता काहीच मार्ग नाही. या प्रस्तावाला माननीय मंत्रिमहोदय श्री. हर्षवर्धन पाटील उत्तर देणार आहेत. ते माझे मित्र आहेत. परंतु त्यांनी केलेल्या घोषणेचे हे सरकार पालन करीत नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री, काँग्रेसच्या मंत्र्यांचे ऐकत नाहीत. तसेच काँग्रेसचे मंत्री राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांचे ऐकत नाही. परंतु अपक्ष मंत्र्यांचे कोणीच ऐकत नाही. सभापती महोदय, माननीय मंत्रिहोदयांनी नागपूरच्या अधिवेशनात असे आश्वासन दिले होते की, तीन महिन्याच्या आत कापसाचा चुकारा दिला जाईल. असे असतानाही कापसाचे पैसे दिले नाहीत. दिलेल्या आश्वासनाचे पालन केलेले नाही. राष्ट्रवादी काँगेस आणि काँग्रेसच्या जाहीरनाम्यात ज्या गोष्टींचा उल्लेख करण्यात आला आहे, त्याचे पालन करण्यात येत नाही. मा. मुख्यमंत्री असे सांगतात की, जाहीरनामा हा सांगण्यासाठी असतो, पाळण्यासाठी नसतो.

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

आणि त्यांची तशी अपेक्षा आहे की, विधीमंडळामध्ये दिलेली आश्वासने देखील सांगण्यासाठी असतात ती पाळण्यासाठी नसतात. त्यांनी सांगितले की, ज्या गावामध्ये, तालुक्यांमध्ये 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी आहे, त्याठिकाणी कर्ज वसूली झाली असेलतर ती वापस करु. माननीय श्री. पाटील साहेबांनी सांगितलेली ही गोष्ट आमच्या लक्षात आहे. झालेली कर्ज वसूली चुकीची आहे ती वापस करण्याचे आदेश दिले आहेत. तुम्ही आदेश दिल्यानंतर 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असणाऱ्या एकाही गावामध्ये झालेली कर्ज वसूली वापस केलेली नाही. तुमचे आदेश कुणी पाळले नाही. सभागृहात तुम्ही दिलेले आदेश पाळले जात नाहीत ही वस्तुस्थिती आहे. तुम्ही सांगितले होते की, कापूस एकाधिकार खरेदी योजनेचा अध्यादेश काढलेला नाही. अधिवेशन संपल्यानंतर अध्यादेश काढणार आहोत. सभापती महोदय, आपणास आठवत असेल की, आपण असतांना माननीय मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी अध्यादेश काढण्याची ताबडतोब कारवाई करु असे सभागृहात आश्वासन दिल्यानंतर तीन महिन्या नंतरही आपण अध्यादेश काढला कां? काढला नाही. म्हणजे अध्यादेश काढण्याचे आदेश दिलेले नाहीत. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी घोषणा केली की, बाहेरच्या राज्यातून जो कापूस या राज्यात येतो त्यांच्यावर आपण कारवाई करु. तुम्हाला कारवाई कशी करता येईल? जर कापूस एकाधिकार खरेदी योजनेचा कायदा अस्तित्वात नाहीतर बाहेरच्या राज्यातून आलेला कापूस आपण थांबवू शकत नाही. बाहेरच्या राज्यातील येणाऱ्या कापसाला थांबविण्याचा तुम्हाला कायदेशीर अधिकार नाही. तुम्ही फक्त घोषणा करता, आणि कृती शून्य असते. काल तर माननीय मुख्यमंत्र्यांनी कमाल केली. त्यांनी सभागृहामध्ये सांगितले की, 2700 रुपये भाव हा पाच वर्षामध्ये द्यावयाचा आहे, तो आज दिला पाहिजे असे नाही. आणि म्हणून आम्ही पाच वर्षामध्ये हा भाव देऊ. मी याबाबत त्यांचे अभिनंदन केले. किती प्रामाणिक उपमुख्यमंत्री आहेत? म्हणजे पुढील पाच वर्षे ते या राज्यामध्ये कापूस एकाधिकार खरेदी योजना राबविणार आहेत, शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करणार आहेत, आणि शेतकऱ्याला 2700 रुपये भाव देणार आहेत. अशाप्रकारचे सरकारचे धोरण त्यांनी जाहीर करुन टाकले त्याबद्दल मी आनंद व्यक्त करुन त्यांचे अभिनंदन केले. 2700 रुपये भाव पाच वर्षात देणार म्हणजे ही योजना 5 वर्षे या राज्यात राबविणार अशाप्रकारची घोषणा माननीय उपमुख्यमंत्र्यांनी काल या सभागृहामध्ये केली.माननीय श्री. हर्षवर्धन पाटील साहेब आपण या घोषणेशी सहमत असाल. कारण माननीय उपमुख्यमंत्र्यांनी केलेली ही घोषणा असल्यामुळे आपल्यावर ती बंधनकारक आहे. त्यामुळे सर्व प्रथम मी कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अभिनंदन

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

करतो की, त्यांनी कापूस एकाधिकार खरेदी योजना पुढील पाच वर्षे चालविण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. आणि तशाप्रकारे जाहीरपणे आश्वासन माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील यांनी या सभागृहामध्ये दिले त्याबद्दल त्यांचेही आभार मानतो. आता तुम्हाला यावर्षी कापसाला 2700 रुपये भाव द्यावयाचा नव्हता तर मग मिनिमम भाव द्यावयास पाहिजे होता. परंतु तुम्ही जाहीरनाम्यामध्येच 2700 रुपये भाव देण्याचे जाहीर केले. माननीय श्री. हर्षवर्धन पाटील साहेब आपण कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे समर्थन घेऊन निवडून आलात. तुम्ही कधीही कुणाचेही समर्थन घेता. आमचे सरकार आले तरी मंत्री आणि त्यांचे सरकार आले तरी मंत्री "गंगा गये गंगादास, जमुना गये जमुनादास" तुमचा रंग लाल आहे. कुणाचेही सरकार आले तरी तुम्ही मंत्रीपदावर कायम असता. मी तुमच्या या राजकीय कौशल्याबद्दल अभिनंदन करतो. मला तुम्हाला असे विचारावयाचे आहे की, कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या समर्थनाने तुम्ही निवडून आलात. त्यामुळे त्यांनी केलेला जाहीरनामा तुम्हाला बंधनकारक आहे की नाही? तुम्हाला ज्या पक्षाने जाहीरपणे समर्थन दिले, त्या पक्षाचे सरकार आल्यानंतर त्यांनी जाहीरनाम्यात दिलेली वचने आपण कशी विसराल? त्यामुळे तुम्ही 2700 रुपये भाव जाहीर का केला नाही? हा सुध्दा तुम्ही केलेला विश्वासघात आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या वेळी मी यावर बोलणार आहे. त्यांच्या भाषणातील पहिलेच वाक्य आहे की, " माझ्या नवीन सरकारने केलेल्या घोषणांचे पालन केले आहे याचा मला अतिशय आनंद होत आहे". या सरकारने कुठेही पालन केले नाही, किती विश्वासघात केला हे मी सांगणार आहे. बिच्चारे, माननीय राज्यपाल हे शेजारच्या राज्यामधून आले आहेत. आपण त्यांना कशासाठी चुकीची माहिती पुरविता? तुम्ही मोफत वीज देण्याचे जाहीर करुन नंतर पळवाट शोधली, कर्जमुक्तीमध्ये पळवाट शोधली, कापसाच्या प्रश्नावर पळवाट शोधून काढली, मोफत पुस्तके देतो असे जाहीर करुन नंतर पळवाट शोधली. आणि मा. राज्यपालांचे मंत्रालयातून भाषण तयार करुन आणले की, "माझ्या सरकारने सर्व वचने पूर्ण केली याचे मला समाधान वाटते" त्या वचनाशी तुमचा संबंध आहे काय? हिंदी सिनेमामध्ये एक हिरो 7-8 हिरॉईन्सना प्रेमाचे वचन देतो.

(यानंतर सौ. रणदिवे)

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/SBT/KTG पूर्वी श्री.सरफरे . . . . 15:40

श्री.नितीन गडकरी . . . .

आणि नवव्या हिरॉईनबरोबर पळून जातो हे सिनेमामध्ये पाहिलेले आहे. पण तुमचा वचनाशी काही संबंध नाही. सभापती महोदय, या प्रकारामध्ये जो भाव जाहीर केला, तो दिला नाही. एवढेच नाहीतर जी मिनिमम प्राईज आहे, ती देखील आपण दिली नाही. माननीय पणन मंत्री महोदयांना कृषी उत्पन्न बाजार समितीचा ॲक्ट माहिती असेल. त्यामध्ये व्यापा-यांनी माल खरेदी केल्यानंतर शेतक-यांना किती वेळामध्ये पैसे दिले पाहिजेत ? तर 24 तासाच्या आत शेतक-यांचे पैसे दिले पाहिजेत असा कायदा केलेला आहे. मग आमच्या कापसाचे पैसे तीन-तीन महिने का देत नाही ?

श्री.हर्षवर्धन पाटील(खाली बसून) : आपल्या घरी चेक पाठविला आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्या घरी 55 हजाराचा चेक पोहोचला आणि अजून दीड लाख बाकी आहेत. पण मला तुम्हाला प्रश्न विचारावयाचा आहे की, एकीकडे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ॲक्टमध्ये तरतूद करुन तेथील व्यापा-यांवर वेळेवर पैसे देण्याच्या बाबतीत बंधन टाकता की, त्यांनी खरेदी केलेल्या मालाचे 24 तासाच्या आत पैसे दिले पाहिजेत. तर मग महाराष्ट्र शासनातर्फे आमचा जो कापूस खरेदी केला आहे, त्याचे तीन-तीन महिने पैसे देत नाही हे तुमचे वर्तन या कायद्याच्या विरोधात आहे की नाही ? याठिकाणी माननीय पणन मंत्र्यांनी कायदा पास केला आहे आणि त्याच्या विरोधात तुम्ही वागत आहात. अशा प्रकारचे वागणे पणन विभागाच्या या कायद्याला धरुन आहे का ? अजून किती गोष्टी सांगाव्यात. 700-700 गाडया खरेदी केंद्रावर उभ्या होत्या अशी स्थिती होती. मला आठवते की, स्व.वसंतराव नाईक यांच्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने मी आणि माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील पूसदला गेलो होतो. माननीय श्री.मनोहर नाईकसाहेबांनी आम्हाला बोलविले होते. आम्ही जालना येथे गेलो, तेव्हा आम्हाला तेथे लोक भेटले, पूसदला गेलो, तेव्हा देखील आम्हाला लोक भेटले. तेथे सर्व ठिकाणी गाडया उभ्या होत्या. कुठे 500, कुठे 700 गाडया उभ्या होत्या. त्या काळात कृषी उत्पन्न खरेदी-विक्री संघासमोर 9 शेतक-यांनी आत्महत्या केल्या, ते थंडीने मृत्यूमुखी पडले आणि अशा प्रकारच्या घटना 8-9 ठिकाणी घडलेल्या आहेत. आज शेतकरी मृत्यूमुखी पडले तरी तुम्ही कापूस देखील खरेदी केला नाही. म्हणजे तुम्ही त्यांच्या कापसाचे पैसे देत नाही, कापूस खरेदी करीत नाही. तसेच टोकन मागावयास गेल्यावर सुध्दा पैसे दिल्याशिवाय त्याला टोकन देत नाही. अशी तुमची सुंदर यंत्रणा आहे. शेतक-यांचे पैसे हप्त्याहप्त्याने देऊ असे सांगितले जाते.मला वाटते की,

. . . .2 बी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जसे मंत्रालयामध्ये हप्त्याहप्त्याने घेणे सुरु आहे, ते हप्ते चालू ठेवा. खरे म्हणजे लोकशाही आघाडी सरकारच्या मंत्र्यांनी कसे वागावे ? याच्याकरता माननीय मुख्यमंत्र्यांनी आचारसंहिता केली पाहिजे अशी माझी मागणी आहे. पैसे घेण्याच्या बाबतीत सरकारची मार्गदर्शक तत्वे, म्हणजे लेडीज बारमध्ये जाऊन डान्स सुरु असताना गल्ल्यावर उभे राहून पैसे मागू नयेत. पेट्रोल पंपावर बाजूला उभे राहून त्याठिकाणी पैसे आणा, तसेच तेथे जाऊन पैसे मागू नयेत. पैसे शक्यतो रात्रीच्या वेळी बेडरुममध्ये स्विकारावेत इ. याची गरज आहे.

**उप सभापती** : प्रश्न कापसाचा आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, टोकन मागितल्यावर त्यासाठी देखील पैसे मागितले. शेतक-यांनी आत्महत्या केली. आठ-आठ दिवस टोकन दिले नाही. पहिल्यांदा सांगितले की, बैलबंडीतून आलेला कापूस घेऊ. पण त्याबरोबर ट्रॅक्टरमधून कापूस आला. मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, सन्माननीय सदस्य श्री.नाईकसाहेबांना यवतमाळ जिल्हयातील स्थितीबाबत विचारावे. मनोहरराव, तुम्ही शेतकरी आहात आणि मी देखील शेतकरी आहे. तुमच्याकडे ट्रॅक्टर आहे आणि माझ्याकडेही ट्रॅक्टर आहे. आज प्रत्येक गावात 50-100 ट्रॅक्टर आहेत. आता कुठे बैलबंडी अस्तित्वात राहीलेली आहे का ? मी एक आश्चर्यकारक गोष्ट माझ्या डोळयांनी पाहिलेली आहे की, एका ट्रॅक्टरला एक कापसाची बंडी बांधलेली आहे, त्या बंडीला दुसरी बंडी बांधलेली आहे आणि तो ट्रॅक्टर चालला आहे. हा काय तमाशा आहे ? ट्रॅक्टरला दोन-दोन बंडी बांधलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.मनोहर नाईकसाहेब, हे खोटे असेल तर आपण मला तसे सांगावे. मी हे डोळयांनी पाहिलेले आहे. ही खरी गोष्ट आहे की, ट्रॅक्टरला ट्रॉली जोडण्याऐवजी बंडी बांधली जात आहे. यांनी नवीन नियम काढला की, ट्रॅक्टरमधून आलेल्या कापसाची खरेदी होणार नाही. ट्रॅक्टरला दोन बंडया लावल्या, बैल नाही. बैल काढून टाकले आणि त्याचा आसूड काढून त्याला एक बंडी बांधली आणि पुन्हा दोरी बांधून दुस-या बंडीला बांधली.

श्री.हर्षवर्धन पाटील(खाली बसून) : ती बैलगाडी असेल . . . .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आमच्याकडे त्याला बैलबंडी म्हणतात. पण येथे बैल नव्हते, तर बैलाच्या ऐवजी ट्रॅक्टर ओढत होता. त्याच्यामागे दोन बंडया होत्या. हे अनेक ठिकाणी पाहिले आहे. पण हा चमत्कार आम्ही 40 वर्षात पाहिलेला नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी..

हे सरकार कुठून आले? पूर्वी भानामतीचे प्रकार होत होते. भिंत आपोआप चालत होती. तशी आता बैल-बंडी आपोआप चालते. बैलबंडीला बैल न लावता ट्रॅक्टरच्या मागे दोन-दोन बैलबंडया बांधल्या जातात आणि त्या बैलबंडया त्या ट्रॅक्टरमागे चालतात. सभापती महोदय, हसावे की रडावे काही समजत नाही. सभामती महोदय, माझ्या आयुष्यात असा प्रकार मी पाहिला आहे. मी स्वत: संभाजीनगरवरुन बुलढाणा जिल्हयाच्या दौ-यावर गेलो होतो. त्यावेळी रस्त्यावरुन ट्रॅक्टर बैलबंडया ओढून नेत असतांना मी पाहिलेले आहे. असे कां? तर सरकारने नियम केलेला आहे की, ट्रॅक्टरमधला कापूस घेणार नाही. मंत्रालयात उरफाटे लोक बसलेले आहेत. ते या शासनाला सांगतात. जे नोकरशहाचे ऐकतात त्या मंत्र्यांची आणि सरकारची ते वाट लावून टाकतात. आपण यांचे ऐकू नका. हे आपल्याला काहीही नियम शिकवतात. आपण त्यांना सांगा, राज्य आम्ही म्हणू तसे चालेल. बाहेरचा कापूस महाराष्ट्रात येत आहे असे सांगण्यात येते. बाहेरच्या राज्यातील कापूस येथे कसा येईल? महाराष्ट्र शासन कपसाला 1800 रुपये क्विन्टल या प्रमाणे भाव देते.मध्यप्रदेश आणि आंध्र प्रदेशातून विदर्भ व मराठवाडयात कापूस येतो. आंध्र प्रदेशमध्ये कापसाचा प्रती क्विन्टल 1600 रुपये भाव आहे आणि मध्यप्रदेशमध्ये तो 1650 रुपये भाव आहे. महाराष्ट्र शासन कापसाला प्रती क्विन्टल 1800 रुपये भाव देते, मात्र त्या कापसाचे पैसे देण्याचा अजून पत्ता नाही. सिमेवरुन महाराष्ट्रात कापूस आणतांना तेथे पोलिसवाल्यांना पैसे द्या.जकातीचे पैसे द्या. वर ग्रेडरला पैसे द्या. आणि त्यानंतर कापूस खरेदी योजनेत कापूस विकून त्यासंबंधीचे पैसे मिळण्यासाठी पाच-सहा महिने आकाशाकडे पाहात बसा. त्याचे व्याज सहन करा. अशा पध्दतीने महाराष्ट्रात कापूस विकायला व्यापारी मूर्ख आहे काय? हे सफेद झूट आहे. महाराष्ट्रामध्ये परराज्यातून कापूस आलेला नाही. मग कापूस कां वाढला? 9746 गावामध्ये कापूस निघायच्या आधी जी आणेवारी काढली ती 50 पैशापेक्षा कमी आली आहे. कापूस जास्त झाला याचे कारण असे की, माझ्याकडे पहिल्यांदा एकरी आठ क्विंटल इतका बी.टी. कॉटन झाला. त्यासाठी मी केमिकल फर्टिलायझर वापरले नाही. विदर्भातील श्री. नाईकसाहेब या ठिकाणी बसलेले आहेत. पाहिजे तर आपण त्यांना याबाबत विचारा. सभापती महोदय, बी.टी. कॉटनवर बोंडअळी येत नसल्यामुळे बी.टी.कॉटनचे एकरी उत्पन्न सहा ते सात क्विन्टल इतके झालेले आहे. अकोला,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

बुलढाणा जिल्हयात बी.टी. कॉटनचे ॲव्हरेज उत्पन्न किती झाले यासंबधात श्री. सुधाकररावांना आपण विचारा. श्री. हिराणी साहेब या ठिकाणी बसलेले आहेत. त्यांना यासंबंधातील सगळी माहिती आहे. विदर्भात बी. टी. कॉटनचे उत्पन्न वाढल्यामुळे जास्त कापूस आला. तुमच्यात ताकद नाही तर मग तुम्ही ही योजना कशाला चालविता? ही योजना सुरु करण्यापूर्वी या योजनेसाठी पैसे आहेत की नाही हे या शासनाला समजले नाही काय? शासनाजवळ पैसे नाहीत, असे असतांना श्री. आर. आर. पाटील यांनी अकोला येथे जाऊन प्रेस कॉन्फरन्स घेतली आणि सांगितले की, कापसाचे पैसे त्वरित दिल्या शिवाय आम्ही राहणार नाही. कुठे गेले ते पैसे? हेही गायब आणि पैसेही गायब. काही देणे-घेणे नाही. यासंबंधात विदर्भात एक म्हण प्रसिध्द आहे, पण मला ती सभागृहात सांगता येत नाही. तसा हा प्रकार आहे. शासनाकडे पैसे देण्याची ताकद नाही तर मग हया झंझटी कशाला लावता. शासनाजवळ पैसे नाहीत, तरी नाही, शासन एकाधिकार योजना चालू ठेवील. शासनाने सांगावे की, आमच्या जवळ पैसे नाहीत, जी आहे ती अशी व्यवस्था आहे, आम्ही ही योजना चालवू शकत नाही. श्री.विलासराव देशमुख आणि श्री. आर.आर.पाटील यांचा शपथविधी झाल्यानंतर ते मंत्रालयात आले आणि दोन लोकांची कॅबिनेट बैठक झाली. आदरणीय विलासराव देशमुख आणि श्री. आर.आर.पाटील यांच्या विद्वतेबद्दल मी काय बोलावे? श्री. आर.आर. पाटील यांना कोणी संत म्हणतात तर कोणी महंत म्हणतात. ते पोपटासारखे मिटूमिटू बोलतात. त्या दोघांच्या कॅबिनेट मिटिंगमध्ये एकाधिकार कापूस खरेदी योजना सुरु ठेवण्यासंबंधीचा पहिला निर्णय झाला. कापूस खरेदी योजनेमार्फत ताबडतोब कापसाची खरेदी सुरु होईल. आणि क्विन्टलला 2500 रुपये भाव देऊ, हा निर्णय विचारांती घेतला की, विचारांती घेतला नाही, याबाबत तुम्ही कॅबिनेटमध्ये त्यांना विचारा की, हा निर्णय घेतांना तुमच्या जवळ पैसे होते कां? दोन्हीही तुमचेच नेते आहेत. आता घेणे-देणे काही नाही. पैसे जवळ नाहीत. आणि घोषणा करायला चालले. आम्ही कापूस खरेदी करु. कापसाला भाव देऊ. शेतक-यांना वा-यावर सोडणार नाही. श्री. आर. आर.पाटील शेतक-यांना वा-यावर सोडले नाही तर मग या शेतक-याला कुठे घातले आहे? तीन महिने झाले शेतक-यांकडून खरेदी केलेल्या कापसाचे पैसे मिळालेले नाहीत. शेतक-यांचा कापूस खरेदी करायला देखील आठ-आठ दिवस लावले जातात. ट्रॅक्टरवाल्यांनी बंडया आणल्या त्याचा

..3..



SMT/ KTG/ SBT/ प्रथम सौ. रणदिवे.. 15:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

त्यांना किराया पडला. अध्यक्ष महाराज, कापूस खरेदी करण्यासाठी जर चार दिवस बैलबंडी उभी राहिली तर बैल काय खातील? बैलांना चारा कुठून आणायचा? बंडीचा चार दिवसाचा किराया कुठून द्यायचा? चार दिवसाचा बैलाचा किराया, चार दिवसाची माणसांची मजुरी कुठून द्यायची? सभापती महोदय, शेतक-यांचा कापूस घ्यायला कोणी तयार नाही? ही स्थिती या सरकारची आहे.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

यांनी दिलेली सर्व आश्वासने पूर्ण केलेली नाहीत. 2700 रुपये भाव दिला नाही. आता अधिवेशन आल्यानंतरच आम्हाला ओरडण्याची संधी मिळते. आम्ही अधिवेशन नसताना कितीही ओरडलो तरी सरकार दखल घेत नाही. त्यांच्यापर्यन्त आवाज पोहोचत नाही. म्हणून आम्ही ठरविले की, जर तुम्ही आमच्या कापसाचे पैसे दिले नाहीत तर आम्ही सभागृहाचे कामकाज चालू देणार नाही. म्हणून आम्ही काल नियम 298 अन्वये सूचना दिली होती. अध्यक्ष महाराज, माझ्या माहितीप्रमाणे 3600 कोटी रुपयांचे देणे आहे. आणखी एक नवीन घोषणा करण्यात आली की, कापसाचा शेवटचा बोंड असेपर्यन्त सरकार कापूस खरेदी करील. कशाचे बोंड आणि कशाचे काय ? जे बोंड घेतले त्याचे पैसे दिले नाहीत आणि दुसरीकडे घोषणा करतात की, कापसाचा शेवटचा बोंड असेपर्यन्त सरकार कापूस खरेदी करील. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही असे सांगतात. त्यांना वाऱ्यावर सोडले. ते खड्डयात गेले. बोंड खरेदी करण्याचे नाव नाही. तुम्ही शेतकऱ्यांना 2700 रुपये भाव दिला नाही. कसे सरकार आहे ? शेवटचे बोंड असेपर्यन्त खरेदी करु असे सांगितले. त्याची खरेदी होत नाही. अध्यक्ष महाराज, जिल्हा सहकारी बँक आहे. मला एक चेक मिळाला. काल घरुन माझ्या पत्नीने फोन केला. मी विथ्ड्रॉवल चेकवर सही करुन दिली होती. परंतु मला सांगण्यात आले की, बँकेचा एक फॉर्म आहे त्यावर सही पाहिजे. म्हणजे त्या जिल्हा सहकारी बँकेत जावयाचे आणि मॅनेजरला विचारावयाचे. आमच्या जिल्हा बँकेमध्ये कोणी 50 रुपये डिपॉझीट ठेवण्यास तयार नाही. आमच्या जिल्हा सहकारी बॅंकेमध्ये आमचे पैसे आले तर ते पैसे राहतील की नाही याचा आम्हाला पत्ता नाही. आमच्या जिल्हा बँकेत 150 कोटीचा भ्रष्टाचार आहे. त्या ठिकाणी आमचे अकाऊंट आहे. पैसे आले का हे विचारण्यासाठी आमचा माणूस गेला. मी त्याला सांगितले की, रोज जा कारण एखाद्या दिवशी पैसे येऊन जमा झाले आणि मध्ये काही नवीन भानगड झाली तर आपले पैसे दुसरीकडे जातील आणि पुन्हा आपल्याला पैसे मिळणार नाही. अध्यक्ष महाराज, त्यांनी कर्जाची वसुली कापून टाकली. यांनी सांगितले की, ज्या ठिकाणी दुष्काळ आहे त्या गावात वसुली कापली जाणार नाही. यांचे कोणी ऐकत नाही. सेक्रेटरी यांचे ऐकत नाही. डेप्युटी सेक्रेटरी ऐकत नाही. अंडर सेक्रेटरी ऐकत नाही. कोणी महत्व देत नाही. यांचे आदेश निघालेले नाहीत. काहीही झालेले नाही. आमचे कर्जाचे हप्ते त्यांनी कापून टाकले. अध्यक्ष महाराज, आता महत्वाचा

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

मुद्दा म्हणजे आपण सगळया आत्महत्या बघा. अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा आणि तिकडे आंध्र प्रदेशच्या भागामध्ये आदिलाबादकडील आंध्र प्रदेशचा भाग आहे त्या सगळया कापूस उत्पादक क्षेत्रात आत्महत्या झाल्या. केंद्र सरकार तुमचे आहे. तेथील आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मदतीकरिता 7 कोटी रुपये दिले आणि विदर्भामध्ये 550 आत्महत्या झाल्या तरी सरकारने मदत केली नाही. 30 हजार रुपये, 35 हजार रुपये सुध्दा मदत केली नाही. परवा मंत्रालयासमोर एका शेतकऱ्याने विष घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या ज्या आत्महत्या होत आहेत त्या पाहता तुम्ही शेतकऱ्यांचे पैसे दिले नाहीत म्हणून शेतकरी आत्महत्या करीत आहेत. म्हणून या आत्महत्यांकरिता तुम्ही जबाबदार आहात. तुमची नैतिक जबाबदारी आहे. कारण तुम्ही शेतकऱ्यांचे पैसे देत नाहीत. आम्ही तुमच्याकडे भीक मागत नाही. कृपा मागत नाही. सबसिडी मागत नाही. इन्सेंटीव्ह मागत नाही. आम्ही आमच्या शेतात पिकलेल्या मालाचे पैसे मागत आहोत. तुम्ही खरेदी केलेली आहे. राज्य सरकारने खरेदी केलेली आहे. तुम्ही जबाबदार आहात. तुम्ही आमचा माल विकत घेतलेला आहे. तुम्ही का विकत घेतला ? तुम्ही कशाकरिता खरेदी केली ? जर तुम्ही खरेदी केली असेल तर आमच्या मालाचे पैसे आम्हाला ताबडतोब द्या असे म्हटले तर यामध्ये काय चूक आहे ? आमच्या मालाची किंमत आम्ही मागितली तर काय चूक आहे ? आम्ही काही बोनस मागत आहोत काय ? 2700 रुपये भाव देणे हा तर नंतरचा प्रश्न आहे पण तुम्ही 1800 रुपये मिनिमम प्राईसने घेतलेल्या मालाचे जेवढे पैसे आहेत तेवढे आम्हाला एकमुस्त द्या अशी मागणी आम्ही केली. ते पैसे देखील तुम्ही आम्हाला देत नाही. आता 500 कोटी रुपये काढले, आता हुंडया वठत आहेत असे सांगितले जाते. राज्य सहकारी बँकेकडे गेले. स्टेट बँकेचे उदाहरण नवीनच आहे. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांचे मी अभिनंदन करीन. त्यांनी स्टेट बँकेच्या अधिकाऱ्यांना माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठविले. माननीय मुख्यमंत्र्यांनी स्टेट बँकेच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली. त्या अधिकाऱ्यांना त्यांच्याकडे पाठविणारे सन्माननीय सदस्य श्री. रावते आहेत, चर्चा करणारे माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख आहेत आणि घोषणा करणारे माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील आहेत. म्हणजे ही तर दुसरी एक जी म्हण आहे त्याप्रमाणे झ ााले. ती म्हण या ठिकाणी म्हणता येत नाही. अध्यक्ष महाराज, कुणाच्या खांद्यावर

...3...



RDB/ RJW/ KTG/ SBT/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

कुणाचे ओझे आणि कोण कोठे आहे काही समजावयास मार्ग नाही. त्यांनी काल उत्साहात घोषणा केली की, आम्ही व्यवस्था केलेली आहे. 1200 कोटी रुपये 3 दिवसाच्या आत आम्ही देत आहोत. स्टेट बँकेशी चर्चा केली आहे. चर्चा करणारे माननीय मुख्यमंत्री विलासराव देशमुख आहेत. खरे म्हणजे उपमुख्यमंत्री पदाला काही अर्थ नाही. घटनेमध्ये उपमुख्यमंत्री या पदाला काही किंमत नाही. कोर्टाचा निर्णय आहे. उपमुख्यमंत्री म्हणजे कॅबिनेट मंत्री आहे. ही एक राजकीय सोय आहे. एक तुमचा आणि एक आमचा असे जे चालते त्याच्यातील ही राजकीय सोय आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..

त्यांना वाटले की, मा.मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी खालच्या सभागृहामध्ये सांगितले तर त्याचे क्रेडिट काँग्रेसला जाईल. म्हणून येथे घाईघाईने येऊन सांगितले. भाषण करण्याची आधीच हौस, माईक लावून आम्ही 1200 कोटी रुपये देऊ अशी घोषणा करुन टाकली. आम्ही त्यासंबंधी चर्चा मागत होतो. सभापती महोदय, काल त्यांनी ही घोषणा केली आहे. मग उद्या रात्री 12 वाजेपर्यंत 1200 कोटी रुपये मिळणार आहेत काय ? शेतक-यांना मिळाले काय, मंत्र्यांनी जबाबदारीने घोषणा कराव्यात. मा.सदस्य डॉ.हिराणी येथे आहेत, त्यांना मी विचारतो की, डॉक्टरसाहेब तीन दिवसामध्ये 1200 कोटी रुपये तेथे मिळाले काय ? तुम्ही फेडरेशनचे अध्यक्ष आहात. तेथे काय झाले, पैसे मिळाले की नाही याबाबत ते सांगतील. ते जर आज खरे बोलले आणि त्यांनी आज शपथेवर सभागृहात सत्य माहिती सांगितली तर मा.उपमुख्यमंत्री याठिकाणी बोलण्याच्या लायकीचे देखील राहणार नाहीत. कारण मा.सदस्यांकडे सत्य माहिती आहे. काही पैसे तेथे गेले नाहीत, वर्तमानपत्रामध्ये छापून येण्यासाठी, टी.व्ही.वर न्यूज आणण्याकरिता त्यांनी कापसाचे शेवटचे बोंड असेपर्यंत खरेदी केली जाईल, 2700 रुपयांचा भाव दिला जाईल, शेतक-यांचे तीन दिवसात पैसे देतो असे सांगितले आहे. हया सगळया घोषणा आहेत. इकडे पैसा नाही, यांना काही घेणे देणे नाही, मी या चर्चेच्या निमित्ताने एकच प्रश्न विचारतो आणि माझे भाषण संपवितो. तुम्ही कापूस उत्पादक शेतक-यांचे आजच्या दिवसापर्यंत जेवढी बोंड खरेदी झाली त्याचे एकंदर देणे किती आहे ? त्यापैकी आजपर्यंत किती पैसे दिलेले आहेत ? आणि काल मा.उपमुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे 12 कोटी रुपये तुम्ही वितरित केले आहेत काय ? कालचा आणि आजचा दिवस गेला आणि उद्याचा तिसरा दिवस आहे. हे पैसे वितरित केले काय ? आणि उरलेले पैसे तुम्ही किती दिवसामध्ये देणार आहात ? जर कापूस उत्पादक शेतक-यांचे पैसे मार्च महिना संपण्याच्या आत देणार नसतील तर आम्हाला कमीत कमी एप्रिल महिन्यामध्ये बोलता तरी येईल. नाही तर अधिवेशन संपविण्यासाठी दुपारी 1.00 वाजता बैठक झाली, संपले रे संपले, भागो रे भागो, संपले अधिवेशन. गेले, कोणी कोणाला विचारत नाही, आमचा विश्वास नाही, अधिवेशन केव्हा समाप्त होईल हे सांगता येत नाही. यांच्या मनात आले, अडचण झाली की कर अधिवेशन समाप्त. मा.श्री.भुजबळसाहेबांना मागच्या वेळेचे माहीत आहे. एक मिटिंग झाली की,

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सगळे आटपून टाकले जाते. हे सगळे तिकडे सायरन वाजवित गेले की, आम्ही पुन्हा कोणाच्या तोंडाकडे पहावयाचे ? तुमच्या चेह-यासमोर ठेवून पैसे मिळाल्याचे समाधान मानावयाचे काय ? त्याच्यामुळे दि.31 मार्चच्या आत आमचे सगळे पैसे मिळाले पाहिजेत. याबाबत स्पष्ट घोषणा करावी आणि जर तुम्ही आमचे पैसे देणार नसाल तर आम्ही या सभागृहाच्या कामकाजामध्ये सहभागी होणार नाही आणि कोणत्याही प्रकारे आम्ही  सभागृह चालवू देणार नाही हे तुम्ही लक्षात ठेवा. कारण हा आमच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे, आत्महत्या करणा-या शेतक-यांचा प्रश्न आहे.  अजून जास्त आत्महत्या होतील. म्हणून याबाबत आपण सखोल मार्गदर्शन करावे आणि उत्तरे द्यावीत अशी विनंती करतो. शेवटचे एकच वाक्य सांगतो की, हे पवित्र सभागृह आहे.  या सभागृहाची सॅन्टिटी आहे.  येथल्या एकेक शब्दाला महत्व आहे.  तुम्हाला या सभागृहाचा सन्मान वाढविता येत नसेल तर कमीत कमी या सभागृहाचे अवमूल्यन करु नका.  येथे केलेल्या घोषणांची अंमलबजावणी करावी लागते.  ही जबाबदारी त्या मंत्र्यांची असते आणि जे सभागृहात बोलले जाते त्याचे पालन करावे लागते.  मी जे बोललो आहे त्याचे मी पालन केले आहे असे सभागृहात सांगावे लागते.  ही या सभागृहाची उच्च परंपरा आहे.  वेळ मारुन नेण्यासाठी थातूरमातूर घोषणा करुन निघून जायचे आणि वर्तमानपत्रात आणि टी.व्ही.समोर सांगायचे.  काल येथे घोषणा केल्यानंतर लगेच मा.श्री.आर.आर.पाटील हे टी.व्ही.ला मुलाखत देण्यासाठी धावत गेले.  त्यांनी तेथे सांगितले की, 1200 कोटी रुपये देणार. श्री.विलासराव देशमुख क्रेडिट घेतात की काय  असे वाटल्याने धावपळ करत तेथे गेले.  तुम्ही काय करावयाचे ते करा. क्रेडिट तुमचे जावो की श्री.विलासराव देशमुख यांचे जावो.  आम्हाला माहीत नाही.  अपक्षाला दिले नाही तरी चालते, कारण अपक्षांची मजबुरी आहे. ते तुमच्याबरोबरच राहणार आहेत.  माझी एकच विनंती आहे की, आज ज्या घोषणा तुम्ही करणार आहात त्याच्या जबाबदारीचा अहवाल एप्रिलच्या पहिल्या आठवडयामध्ये या सभागृहात द्यावा लागेल. तुम्ही हे सांगा की, आम्ही सगळयांचे पैसे चुकविले आहेत आता कोणाचेही देणे नाही.  मी एक शेवटची आठवण करतो.  पाचव्या वेतन आयोगाचे पैसे देण्यासाठी तुम्ही बजेटला कट लावला आणि सगळया कर्मचा-यांचे पैसे दिले होते.  ते त्यांच्या पगाराचे पैसे होते.  आज  शेतक-यांच्या मेहनतीचे, परिश्रमाचे कापसाचे पैसे दिले पाहिजे. हे अनुदान नाही, ही सबसिडी



अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/ SBT/ RJW/

श्री.नितीन गडकरी..

नाही, तुमच्याकडून दिलेला विशेष बोनस नाही. हा त्याच्या मालाचा पैसा आहे. तुम्ही कोणतीही व्यवस्था करावी. तुम्ही जबाबदारी घेतलेली आहे, आता मागे हटता येणार नाही. 2700 रुपये भाव द्यावा आणि आता आमचे केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवारसाहेब कोठे गेले ? महाराष्ट्रातील नद्या जोडणी प्रकल्पासाठी 58 हजार कोटी रुपये मिळाले पाहिजे, दुष्काळासाठी 1500 कोटी रुपये मागितले, दुष्काळाला किती पैसा दिला ? काल मला पार्लमेंटकडून लेखी उत्तर आले आहे की, महाराष्ट्रामध्ये कोणत्याही प्रकारचा दुष्काळ नाही असे त्यांच्याकडून कळविल्यामुळे त्यांच्याकडून मागणी आलेली नाही. हे कृषी मंत्रालयाचे उत्तर आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु...)

साखरेकरिता 2 हजार कोटी मिळणार असतील तर मग कापसाकरिता अडीच हजार कोटी रुपये द्यायला काय हरकत आहे? राज्यामध्ये श्री. अजितदादा पवार हे मंत्री आहेत आणि केन्द्रामध्ये श्री.शरदरावजी पवार हे कृषी मंत्री आहेत. काकांना सांगितले तर एका मिनिटामध्ये काम होईल. केन्द्रामध्ये श्री. शरदरावजी पवार हे कृषी मंत्री असताना राज्यामध्ये कापूस उत्पादक शेतकरी आत्महत्या करीत आहेत हे योग्य नाही. तुम्ही केन्द्राकडून अडीच हजार कोटी रुपये घ्या आणि ते पैसे कापूस उत्पादक शेतक-यांना मार्च महिन्याच्या आत देऊन एप्रिल महिन्यामध्ये या सदनामध्ये सांगा की, ज्याला कापसाचे पैसे मिळालेले नाहीत असा एकही शेतकरी राज्यामध्ये नाही. असे जेव्हा मंत्री महोदय येथे सांगतील त्यावेळी मी उभे राहून त्यांचे अभिनंदन करीन. परंतु अभिनंदन करण्याची वेळ तुम्ही येऊ द्याल काय ? तुम्ही तशी वेळ आणावी आणि दिलेल्या शब्दाप्रमाणे वागावे एवढी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ RJW/ KGS/ SBT/

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, काल या सभागृहामध्ये विरोधी पक्षातर्फे शेतक-यांचे कापसाचे पैसे देण्यासंबंधी मागणी केली जात असताना माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी 1200 कोटी रु.ची तरतूद झाल्याचे सांगितले. काल या सभागृहामध्ये गोंधळ सुरु असताना मला बोलण्याची संधी मिळाली नाही. आज सकाळी मी वर्तमानपत्र वाचले आणि त्यानंतर महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँकेत स्वत: गेलो. माननीय मंत्री महोदय श्री. अजितदादा पवार हे त्या बँकेचे संचालक आहेत आणि मी देखील आहे. या शासनाने 1200 कोटी रुपये घ्यावेत यासाठी महाराष्ट्र स्टेस्ट को-ऑप. बँकेच्यावतीने शासनाला विनंती केली. परंतु अशा प्रकारच्या कोणत्याही प्रस्तावाला रिझर्व्ह बँकेने मान्यता दिलेली नाही. आज मी सकाळी बँकेत गेलो होतो. काल या सदनामध्ये गोंधळ होता त्यामुळे मला बोलण्याची संधी मिळाली नाही. म्हणून मी माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्याकडे गेलो आणि त्यांना वस्तुस्थिती सांगितली कारण ते या विषयावर जास्त विस्ताराने बोलू शकतात. महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँकेच्या मार्फत शासनाला 1200 कोटी रुपये देण्याचा प्रयत्न केला होता. तसेच मी स्वत: बँके मार्फत शासनाला 150 कोटी रु. देण्याचा गेल्या तीन महिन्यापासून सातत्याने प्रयत्न केला होता. शिवाय मी स्वत: नाबार्ड बँकेकडे जाऊन त्यांच्याशी दोन-तीन तास चर्चा केली. नाबार्डने रिझर्व्ह बँकेकडे प्रस्ताव पाठविला. परंतु रिझ र्व्ह बँकेने पैसे देता येणार नाहीत असे सांगितले. अशी ही एकंदर परिस्थती आहे. या ठिकाणी माननीय मंत्री महोदय श्री. अजितदादा पवार आहेत. त्यांना ही सर्व परिस्थिती माहीत आहे. महाराष्ट्र स्टेट को-ऑप बँकेकडून मिळणा-या अर्थसहाय्याला देखील रिझर्व्ह बँकेने आक्षेप घेतला. म्हणून कापूस उत्पादक शेतक-यांचे पैसे देण्याच्या संदर्भात शासनाने वेगळी व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा असा आहे की, आपल्या कृषी खात्या मार्फत राज्यातील पीक परिस्थितीचा आढावा घेऊन कोणते पीक कसे येईल यासंबंधी दर सहा महिन्यानी रिपोर्ट दिला जातो. कोणते बंपर पीक येणार याची माहिती शासनाला या रिपोर्टच्या माध्यमातून सांगितली जाते. असे असताना मा. उपमुख्यमंत्री याठिकाणी असे म्हणाले की, मोठ्या प्रमाणावर बंपर पीक आल्यामुळे आमची अडचण निर्माण झाली. नागपूरच्या अधिवेशनामध्ये शासनाने हेही सांगितले होते की, कापसाचे शेवटचे बोंड असे पर्यन्त कापूस उत्पादक शेतक-याचा कापूस खरेदी केला जाईल.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ RJW/ KGS/ SBT/

(श्री. जयंत प्र. पाटील......)

नागपूरचे अधिवेशन संपवून आम्ही मुंबईला परतलो. त्यानंतर तीन महिन्यांचा काळ लोटला. अजूनही शेतक-यांचा कापूस खरेदी केलेला नाही. मला असे विचारावयाचे आहे की, शासनाच्या कृषी खात्याकडून राज्यातील पीक परिस्थिती बाबत पणन खात्याला कोणता रिपोर्ट प्राप्त झाला होता? मी काही कापूस उत्पादक शेतकरी नाही किंवा त्या भागाचे प्रतिनिधीत्व करणारा कार्यकर्ता नाही. परंतु आमच्याकडे डीपीडीसीमध्ये पीक परिस्थितीच्या संदर्भातील रिपोर्ट येतात. त्यामध्ये सांगितले होते की, कापसाचे अमूक इतके पीक येणार आहे आणि त्यासाठी अमूक इतकी संकलन केन्द्रे उभारली पाहिजेत. तेव्हा यासंदर्भात पणन खात्याने कोणते धोरण स्वीकारले हे स्पष्ट करावे. महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँकेकडून हे पैसे मिळणार नाहीत. ...

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील...

माननीय श्री. अजित पवार या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांच्या कर्तृत्वाखाली एम.एस.सी.बँक चालते आहे. ज्या पैशांना मंजुरी मिळालेली नाही, ज्या पैशास अजून रिझर्व्ह बँकेची मान्यता नाही. अशी परिस्थिती असताना या सभागृहात माननीय उप मुख्यमंत्र्यांनी असत्य माहिती दिलेली आहे.आज दुपार पर्यन्त या पैशास रिझर्व्ह बँकेने मान्यता दिली असेल तर मी माझे शब्द परत घेतो. आज सकाळी मी एम.एस.सी.बॅन्केच्या एम.डी. यांना भेटलो. त्यांच्याकडून माहिती घेतली आहे. मी घेतलेल्या माहिती नुसार या पैशास रिझर्व्ह बँकेची अजून मान्यता मिळालेली नाही..

श्री.अजित पवार : यासंबंधीचा ठराव पाठविलेला आहे...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी माननीय मंत्री श्री. अजित पवार यांना सांगू इच्छितो की, यासंबंधीचा एम.एस.सी. बँकेचा ठराव करुन चार महिने होऊन गेलेले आहेत. त्यानंतर तीन बैठका झाल्या. मी एम.एस.सी. बँकेच्या कर्ज समितीवर सभासद आहे.शासनास पैसे उपलब्ध करुन देण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. आपण चार महिन्यापूर्वीच ठराव केलेला आहे. पुन्हा आपण या बाबतीत ठराव केलेला आहे. अशी परिस्थिती असताना पैशांचे वितरण उद्या होईल असे सभागृहात उप मुख्यमंत्र्यांकडून सांगण्यात आलेले आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सभागृहात असत्य माहिती दिली त्याबाबतीत खुलासा केला गेला पाहिजे अशी माझी मागणी आहे.

----

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सभागृहात गंभीर बाब निदर्शनास आणून दिलेली आहे त्याचा खुलासा सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी केला. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकने तीन महिन्यापूर्वी यासंदर्भाचा ठराव केलेला आहे. या बँकेचे संचालक श्री.अजित पवार आहेत. त्याच प्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील हे देखील या बँकेचे संचालक आहेत. या ठरावाला रिझर्व्ह बँकेकडून फायनल क्लिअरन्स मिळालेला नाही. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे 1200 कोटी रुपयांचे मंजुरीचे पत्र शासनाकडे असेल तरच सभागृहात घोषणा करणे बरोबर आहे.महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे मंजुरीचे पत्र शासनाकडे नसेल तर आमची दिशाभूल का करता ? याबाबतीत माननीय उप मुख्यमंत्र्यांना सभागृहात बोलवा. त्यांनी काल सभागृहात 1200 कोटी रुपये देण्याबद्दल सांगितले आहे या गोष्टीचा प्रथम त्यांच्याकडून खुलासा होऊ द्यावा. त्यानंतर महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे 1200 कोटी रुपये मंजुरीचे पत्र शासनाकडे आहे किंवा नाही याचा देखील खुलासा सभागृहात माननीय उप मुख्यमंत्र्यांकडून केला गेला पाहिजे.शासनाकडे बँकेचे मंजुरीचे पत्र नसेल तर माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. कापूस उत्पादक शेतक-यांचा विश्वासघात केलेला आहे. जो पर्यन्त या बाबतीत शासनाकडून खुलासा केला जात नाही तो पर्यन्त या चर्चेला काहीच अर्थ नाही.सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी अतिशय गंभीर बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने शासनास या संदर्भात पैसे मंजूर केले, शासनाकडे पैसे आले, हुंडया काढल्या, चेक वितरीत होत आहेत असे मी समजलो होतो. परंतु ही तर नवीनच भानगड या ठिकाणी ऐकावयास मिळाली. अशा प्रकारे आमच्या भावनाशी खेळणे हे बरोबर नाही. आमचा अशा प्रकारे विश्वासघात करणे बरोबर नाही. सभापती महोदय, या गंभीर बाबीचा शासनास प्रथम खुलासा करण्यास सांगितले पाहिजे.शासनाने खुलासा केला नाही तर सभागृहात केलेल्या घोषणांना काही अर्थ रहाणार नाही. ही नाटक कंपनी आहे काय ? मनोरंजनाचा कार्यक्रम आहे काय ? याचा जो पर्यन्त खुलासा होत नाही तो पर्यन्त ही चर्चा पुढे नेण्यात काहीही अर्थ नाही. काल माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले की, 1200 कोटी रुपये मंजूर झालेले आहेत. शेतक-यांना कापसाचे पैसे तीन दिवसात देण्यात येतील असेही त्यांनी सांगितले. खरे काय आहे ते आम्हाला समजू द्या. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी काल सभागृहात जी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

माहिती दिली ती खरी आहे असे आम्ही समजून चर्चा करीत आहोत. मी भाषण करताना समजलो की,शासनाने 1200 कोटी रुपये कापूस उत्पादक शेतक-यांना उपलब्ध करुन दिले. 1200 कोटी रुपये वाटण्यास सुरुवातही झाली आहे असे मला वाटले होते. पंरतु आज ऐकावयास मिळाले की, बँकेकडून ही रक्कम अजून मंजूरच करण्यात आलेली नाही. आम्हाला चुकीची माहिती का देता ? खरी वस्तुस्थिती काय आहे ती आम्हाला सांगितली गेली पाहिजे. 1200 कोटी रुपये मंजूर आहेत की नाही याचा प्रथम खुलासा झाला पाहिजे. कारण यासंदर्भात मला माझे विचार व्यक्त करावयाचे आहेत. 1200 कोटी रुपयांचा खुलासा शासनाकडून झाल्याशिवाय या चर्चेत सहभागी होण्यात काहीही अर्थ नाही.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. अन्य सदस्यांनी देखील काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. या सर्व मुद्यांची विस्तृतपणे आमचे पणन मंत्री माहिती देणार आहेत. सन्माननीय मंत्र्यांना सदस्यांनी एकेक प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर ते कसे काय देऊ शकतील. कापसाच्या संदर्भातील विरोधी पक्षाच्या सदस्यांचे सर्व प्रश्न विचारुन झाले असतील तर आमचे मंत्री महोदय त्यास उत्तर देण्यास तयार आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय,काल सभागृहात 1200 कोटी रुपये देण्याची घोषणा करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे या पैशांचे वाटप सुरु झाले असेल असे मी समजलो. तुमच्या शब्दावर मी विश्वास ठेवला. तुमच्या शब्दावर विश्वास ठेवून मी माझे भाषण केले. आता मला सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांच्याकडून नवीन माहिती मिळाली. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांची माहिती चुकीची असेल तर त्यांच्यावर कारवाई करावयास पाहिजे.जर माननीय श्री. आर.आर.पाटील यांच्या विपर्यस्त वेगळी माहिती दिली असेल तर त्याचा खुलासा केला गेला पाहिजे.

यानंतर श्री. उपरे..

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.नितीन गडकरी)

सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे खरे बोलतात की सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील हे खरे बोलतात हे आम्ही समजायचे कसे ? आम्हांला जर चुकीची माहिती मिळणार असेल तर आमच्या बोलण्याला काही अर्थच नाही. 1200 कोटी रुपये मंजूर झालेले आहेत आणि वाटप सुरू झालेले आहे. बँकेची अडचण नाही. एवढे सांगा म्हणजे मी बोलत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले की, पैसे मंजूर झालेले आहेत , अकौन्टमध्ये जमा झालेले आहेत. हे रेकॉर्डला आहे. पैसे मंजूर झाले आणि आर.बी.आय.ची परवानगी यामध्ये फरक आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी काल असे स्पष्ट निवेदन केले की, 1200 कोटी रुपये मिळाले आहेत. ते तीन दिवसांमध्ये वाटण्यात येतील आणि उर्वरीत 1200 कोटी रुपये लवकर उपलब्ध करण्यात येतील.

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, काल या ठिकाणी 1200 कोटी रुपये दिल्या बद्दलचे वक्तव्य केले गेले. आज एम.एस.सी.बँकेच्या एक्झेक्युटिव्ह कमिटीची मिटींग होती. त्यामुळे मी तेथे असे विचारले की, आपण पैसे मंजूर करून ताबडतोबीने उपलब्ध करून दिले का ? त्यावेळी मला अशी माहिती मिळाली की, सरकारचा प्रस्ताव आहे. परंतु आपण अजून मंजूर केलेले नाही. सभागृहाच्या माहितीसाठी मी हे सांगत आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण माननीय उप मुख्यमंत्र्यांना या ठिकाणी बोलवावे. त्यांना या संदर्भात खुलासा करू द्या. कारण ते सभागृहाचे नेते म्हणून आमच्या समोर घोषणा करतात. पैसे मंजूर झालेले नसताना तीन दिवसांच्या आत पैसे देऊ असे सांगतात. त्यामुळे अध्यक्ष महाराज, या ठिकाणी माननीय उप मुख्यमंत्र्यांना बोलविल्याशिवाय कामकाज पुढे नेता येणार नाही. आम्हाला माहिती पाहिजे. आम्ही असे समजलो की, 1200 कोटी रुपये रिलिज झाले आहेत. पण या ठिकाणी आमची दिशाभूल करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांनी या ठिकाणी येऊन खुलासा केला पाहिजे. तो केल्याशिवाय काही अर्थ नाही. कारण ही चर्चा दोन स्टेप्समध्ये आहे. काल माननीय उप मुख्यमंत्र्यांनी केलेले निवेदन, आम्हांला मिळालेली माहिती आणि त्यानंतर आम्ही आज उपस्थित केलेली चर्चा. कालचा जो भाग आहे त्यासंदर्भात मी बोललो आहे. त्यांनी जे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SDU/ KGS/ RJW.

(श्री.नितीन गडकरी)

सांगितले ते खरे आहे असे आम्ही समजलो आणि आता राज्य सहकारी बँकेचे दोन संचालक असे सांगत आहेत की, अजूनपर्यंत बँकेने पैसे मंजूर केलेले नाहीत. त्यामुळे आपण माननीय उप मुख्यमंत्र्यांना बोलवा. माझी आपल्याला अशी विनंती आहे की, त्यांना बोलाविल्याशिवाय आम्हांला न्याय मिळणार नाही. कदाचित एखादे वेगळे पत्र त्यांच्याकडे असेल. सन्माननीय मंत्री श्री. अजित पवार यांना आणि श्री.हर्षवर्धन पाटील यांना त्याची माहिती नसेल. कदाचित रिझर्व बँकेंच्या गव्हर्नरचे किंवा केंद्रीय कृषि मंत्र्यांचे पत्र त्यांच्या खिशात असेल. त्यांच्याकडे नवीन काही तरी असू शकेल. त्यामुळे आम्हांला 1200 कोटी रुपये कोठून मिळणार ते कळले पाहिजे. एवढी मोठी ही रक्कम आहे आणि हा आमच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. आम्ही असे समजलो की, 1200 कोटी रुपये मिळाले. पण राज्य सहकारी बँकेचे दोन संचालक या सदनाचे सदस्य आहेत. ते असे म्हणतात की, पैसे मंजूर नाहीत. जर हे राज्य सहकारी बँकेचे संचालक असलेले दोन सन्माननीय सदस्य असे सांगत असतील तर सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी दिलेल्या माहितीच्या विरुध्द माहिती ते सभागृहात देत आहेत. माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आणि श्री.यशवंतराव गडाख साहेबांना याची कल्पना आहे की, या सभागृहामध्ये सत्य माहिती दिली पाहिजे. मग हे दोन संचालक खरे सांगत आहेत की, सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील खरे सांगत आहेत ? त्यामुळे खरे काय आहे ? ते सभागृहासमोर येऊ द्या.माननीय उप मुख्यमंत्र्यांनी तर पैसे वाटणे सुरू झाले असे सांगितले आहे. त्यामुळे मी नियम क्रमांक 241 प्रमाणे सभागृहाची दिशाभूल केली म्हणून हक्क भंगाचा प्रस्ताव आणू शकतो. पण मला अशी विनंती करावयाची आहे की, हे करण्याच्या आधी कदाचित माननीय उप मुख्यमंत्र्यांकडे दुसरी काही माहिती असेल, इन्शुरन्सचे पैसे असतील किंवा स्टेट बँकेचे 1200 कोटी रुपये असू शकतील. याची तुम्हाला काही माहिती आहे काय ? तुम्ही स्टेट बँकेचे डायरेक्टर आहात काय ? ते दोघे राज्य सहकारी बँकेचे डायरेक्टर्स आहेत. तुम्ही स्टेट बँकेचे डायरेक्टर नाही. कदाचित मा.उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांच्या खिशामध्ये स्टेट बँकेच्या मॅनेजिंग डायरेक्टरचे पत्र असेल आणि त्याच्या आधारावर ते बोलले असतील तर मी त्यांच्यावर आरोप करणे बरोबर होणार नाही. त्यांच्यावर अन्याय होईल. जर स्टेट बँकेकडून 1200 कोटी रुपये त्यांना मिळाले असतील आणि ते जर बोलले असतील तर ते बरोबर असेल आणि आम्ही त्यांच्यावर आरोप केले तर ते

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SDU/ KGS/ RJW.

(श्री.नितीन गडकरी)

त्यांच्यावर अन्याय करणारे होतील. त्यामुळे या बाबतीतील वस्तुस्थिती त्यांनी सभागृहासमोर सांगावी आणि 1200 कोटी रुपये स्टेट बँकेचे असतील तर त्यांच्याबद्दल जे काही उद्‌गार कळत न कळत आमच्याकडून निघाले असतील ते मी परत घेईन. तसे केले नाही तर त्यांच्यावर अन्याय होईल. म्हणून स्टेट बँकेचे 1200 कोटी रुपये असतील तर त्याबद्दल त्यांनी खुलासा करावा. अध्यक्ष महाराज, हा प्रश्न महत्वाचा आहे. दोन दिवस झाले. सगळे रामायण सुरू आहे. या रामायणाचा आत्मा पैसे हा आहे. त्यामुळे त्यासंबंधी जोपर्यंत आमचे माननीय उप मुख्यमंत्री या ठिकाणी येऊन काही सांगत नाहीत. तोपर्यंत ही चर्चा आपण थांबविली पाहिजे. ही चर्चा म्हणजे रामलीला नाही. मनोरंजनाचा कार्यक्रम नाही. तरी ही चर्चा आपण स्थगित करा आणि त्यांना बोलवा. माझी आपल्याला विनंती आहे की, याबाबतीत जोपर्यंत खुलासा होत नाही तोपर्यंत चर्चा पुढे जाऊ शकत नाही.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : माननीय उप मुख्यमंत्री येई पर्यन्त ही चर्चा चालू ठेवण्यात यावी.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, दहा मिनिटांकरता सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी.1200 कोटी रुपये हे स्टेट बॅन्क ऑफ इंडियाचे आहेत असे आपण सांगा.आम्ही शांत बसू.

**उप सभापती** : माननीय उप मुख्यमंत्र्यांना येथे बोलाविण्यात येईल. तोपर्यन्त ही चर्चा चालू ठेवू या.

श्री.नितीन गडकरी :सभापती महोदय, मी भाषण करीत असतांना 1200 कोटी रुपये मिळाले असे समजून बोललो होतो. माझ्या तोंडून त्या संबंधीचे शब्द निघून गेले होते. माझा वेळ आता संपला आहे. 1200 कोटी रुपये मिळाले आहेत असे त्यांनी सागितल्यानंतर मी त्यांच्यावर विश्वास ठेवून आंनदून गेलो होतो.आता मला अशी माहिती मिळालेली आहे की, 1200 कोटी रुपये मिळालेले नाहीत.हे पैसे मिळालेले आहेत असे मी काल समजलो होतो. त्यामुळे माझा अधिकार हिरावला गेला आहे.या सभागृहामध्ये माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहाची दिशाभूल करणारी माहिती दिल्यामुळे मी तो विषय मांडू शकलो नाही. मी असे समजलो की, 1200 कोटी रुपये मिळालेले आहेत .तेव्हा उर्वरित पैशाच्या बाबतीत काय ? अशी मी विचारणा केली होती. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी येथे येऊन खुलासा केला नाही तर माझ्यावर अन्याय होईल तसेच सभागृहावर देखील अन्याय होईल. या ठिकाणी उपस्थित असलेल्या मंत्र्यापैकी कोणीही मंत्री उत्तर देऊ शकतो. या ठिकाणी श्री. छगन भुजबळ उपस्थित आहेत ते माजी उप मुख्यमंत्री होते. ते ज्येष्ठ नेते असून भविष्याचे नेतृत्व करण्यासाठी सध्या ते सगळया ठिकाणातून मुक्त झालेले आहेत. हात उंच करुन ते येत आहेत. आता ते माझे मित्र आहेत. तेव्हा 1200 कोटी रुपये हे स्टेट बॅन्क ऑफ इंडियाचे आहेत असे श्री. छगन भुजबळ यांनी सांगावे .आम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवू.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी :श्री. छगन भुजबळ हे जेव्हा उप मुख्यमंत्री होते तेव्हा ते आपले मित्र नव्हते आणि आता ते आपले मित्र आहेत असे आपण सांगत आहात.

श्री.नितीन गडकरी : 1200 कोटी रुपये हे स्टेट बॅन्क ऑफ इंडियाचे आहेत असे श्री.छगन भुजबळ साहेबांनी सांगावे. हाच खरा या ठरावाचा आत्मा आहे. माननीय उप मुख्यमंत्र्याकडून याबाबतीत खुलासा करण्यात आला पाहिजे. ते येईपर्यन्त दहा मिनिटे सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी.

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे भाषण झालेले आहे तेव्हा ही चर्चा चालू ठेवू या आणि दरम्यानच्या काळात उप मुख्यमंत्र्यांना पाचारण करु या .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपल्याला एक गोष्ट विचारतो. त्याबाबतीत आपण मला संरक्षण द्यावे.या सभागृहाच्या रेकॉर्डवर आपल्या उपस्थितीमध्ये काल माननीय उप मुख्यमंत्र्यांनी दिलेली जी महत्वपूर्ण माहिती दिली होती ती माहिती असत्य आहे असे या सभागृहातील दोन सदस्यांनी पुष्टी देऊन सांगितलेले आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बॅन्केने कोणत्याही प्रकारे 1200 कोटी रुपये मंजूर केलेले नाहीत . माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, हे पैसे मिळालेले आहेत आणि तीन दिवसात त्याचे वाटप करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख आणि श्री.जयंत प्र.पाटील यांनी जर चुकीची माहिती दिली असेल तर त्यांना आम्ही दिलगिरी व्यक्त करावयास सांगू किंवा त्यांच्याविरुध्द कारवाई करावयास सांगू. सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख व श्री.जयंत प्र. पाटील हे सत्य सांगत आहेत की माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी काल जे सांगितलेले आहे ते सत्य आहे ? कोणाचे सत्य आहे हे आपण मला सांगावे.तुम्ही दिलेला आदेश मी मान्य करीन.

**उप सभापती** : हे सत्य शोधण्याची आपण मला संधी द्यावी . मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना पाचारण करतो व तोपर्यन्त ही चर्चा चालू ठेवू या.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सभागृहात ही चर्चा सुरु ठेवावयाची असेल तर माननीय उप मुख्यमंत्र्यांना येथे बोलाविण्यात आले पाहिजे.

**उप सभापती** : त्याबाबतीत मी सांगितलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, तो पर्यन्त सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी. काल या सभागृहात असे सांगण्यात आले होते की, 1200 कोटी रुपये पोहोचले आहेत आणि 3 दिवसात त्याचे वाटप करतो. राहिलेल्या पैशाच्या बाबतीत एक महिन्यात व्यवस्था करण्यात येईल . अशा प्रकारे जर सांगण्यात आलेले असेल तर आता त्या दृष्टीने चर्चा होईल. परंतु पैसे येणार नसतील आणि शेतक-यांच्या बाबतीत जर बनवाबनवी करण्यात येत असेल तर आम्ही कोणत्या पध्दतीने चर्चा करावयाची ?

**उप सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मघाशी असे सांगितले होते की, या ठिकाणी जबाबदार मंत्री उपस्थित आहेत ते उत्तर देऊ शकतात. तेव्हा शासनाच्या वतीने त्यांनी या ठिकाणी खुलासा करावा. 3..


VTG/ RJW/ KGS/ प्रथम श्री.उपरे 16.15

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.नितीन गडकरी यांनी असा मुद्दा मांडला आहे की, माननीय  उप मुख्यमंत्र्यांना येथे बोलाविण्यात यावे. तेव्हा माननीय उपमुख्यमंत्र्यांना येथे बोलाविण्याच्या बाबतीत मी निरोप दिलेला आहे. तो पर्यन्त ही चर्चा चालू ठेवण्यात यावी.तसेच या संदर्भात मी सविस्तर उत्तर नंतर देईन.माननीय उप मुख्यमंत्री येई पर्यन्त सभागृहाची बैठक स्थगित करावी असा मुद्दा त्यांनी मांडला आहे परंतु मला असे सांगावयाचे आहे की, ते येई पर्यन्त चर्चा चालू ठेवावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, काल माननीय उप मुख्यमंत्र्यानी कारण नसतांना निवेदन केले होते की,.महाराष्ट्रातील शेतक-यांच्या बाजूने आघाडीचे सरकार उभे आहे...

"शेतक-यांच्या भल्याकरता त्यांच्या बाजूने हे सरकार उभे आहे आता काहीही प्रश्न राहिलेला नाही. 1200 कोटी रुपये आलेले आहेत तीन दिवसात ते पैसे वाटण्यात येतील  राहिलेले पैसे उर्वरित एक महिन्यात आम्ही देतो." अशा प्रकारचे स्टेटमेन्ट करुन आम्हीच शेतक-याचे हितचिंतक आहोत असे त्यांनी सांगितलेले होते. कारण नसतांना त्यांनी हे निवेदन केले होते. मी काल तीन वेळा उभे राहून त्यांना विनंती केली होती की, आपण आता निवेदन करु नका. प्रथम आपण चर्चा करु या आणि नंतर निवेदन करा. परंतु ते ऐकण्यास तयार नव्हते. सभापती महोदय, आपण दिलेल्या सहकार्याचा गैरफायदा घेऊन त्यांनी हुशारी केली होती. दिवाळीमध्ये ज्याप्रमाणे तडतडी वाजते त्याप्रमाणे हे इ ाालेले आहे. येथे येऊन त्यांचा संबंध नसलेल्या खात्याच्या संदर्भात ते बोलले आहेत. त्यामुळे ही बाब त्यांच्या अंगाशी आलेली आहे. तेव्हा या बाबतीत आम्ही तरी काय ..

करणार ? यामध्ये आमचा काहीही दोष नाही. खालच्या सभागृहात चर्चा झालेली नसतांनासुध्दा उपमुख्यमंत्र्यांनी  मुलाखत दिली  होती आणि काल रात्री टी.व्ही.वर  आम्ही त्यांची  मुलाखत पाहिली.

नंतर श्री.कानडे

.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

उपमुख्यमंत्र्यांनी ई टी.व्ही.वर यासंबंधी मुलाखत दिली. शेतक-यांना कापसाचे पैसे मिळणार आहेत असे सांगितले. आता येथे वस्तुस्थिती वेगळी दिसत आहे. प्रश्न सोडविण्यासाठी सभागृह हे माध्यम आहे. बनवाबनवी करण्यासाठी सभागृह नाही. पणन मंत्री याठिकाणी आहेत तसेच बँकेचे संचालक आहेत. श्री. अजितदादा पवार आहेत. कापसाचे पैसे मिळणार किंवा नाहीत ते सभागृहामध्ये सांगा. माझी अशी विनंती आहे की, उपमुख्यमंत्री याठिकाणी उपस्थित होईपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित करावे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपणांस सहकार्य करावयास तयार आहे. सभागृहामध्ये जी माहिती दिलेली आहे ती सत्य आहे किंवा असत्य आहे हे आपण ठरवावे. अन्यथा आम्ही सभागृहामध्ये याविषयावर भाषण करु शकणार नाही. 1200 कोटी रु. हा या ठरावाचा बेस आहे.

**उपसभापती** : सभागृहामध्ये दिलेली माहिती आपण सत्य मानतो. रेकॉर्डवर माहिती आहे. उपमुख्यमंत्री याठिकाणी उपस्थित होईपर्यंत ही चर्चा सुरु ठेवावी.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, 3600 कोटी रुपयांपैकी 1200 कोटी रु. दिले असे समजून आम्ही बोलावे किंवा नाही ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, याविषयी विस्ताराने वस्तुस्थिती सांगण्यास मी तयार आहे. प्रश्न एवढाच आहे की, मा. उपमुख्यमंत्री याठिकाणी येऊन स्पष्टीकरण देईपर्यंत सभागृहाचे कामकाज सुरु ठेवावे अशी माझी विनंती आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, कापसाच्या संदर्भात सभागृहामध्ये चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. यासंदर्भात राज्याच्या मा. उपमुख्यमंत्र्यांनी काही स्टेटमेंट काल याठिकाणी केले आहे. परवा मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये शेतक-यांचा जो कापूस घेतला आहे त्याचे 1200 कोटी रुपये देण्याच्या संदर्भात चर्चा झाली आणि तेवढे पैसे उभे करुन शेतक-यांचे पैसे दिले जातील या अनुषंगाने उपमुख्यमंत्र्यांनी स्टेटमेंट केले असण्याची शक्यता आहे. उपमुख्यमंत्र्यांनी स्टेटमेंट केले त्यावेळी मी सभागृहामध्ये नव्हतो. परंतु गेले दीड तास यासंदर्भात चर्चा उपस्थित करण्यात आली त्याबाबत दोन्ही बाजूच्या सदस्यांचे म्हणणे लक्षात घेतल्यानंतर 1200 कोटी रुपये उभे

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

करण्याकरिता मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे आणि विविध आर्थिक संस्थांकडून हे पैसे उभे करण्याच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्र्यांनी माहिती दिली असेल. या पैशातून आम्ही शेतक-यांचा चुकारा देणार आहोत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, 1200 कोटी रुपये आकस्मिकता निधीतून देण्याचा निर्णय झालेला आहे. आर्थिक संस्थांकडून शासन पैसे उभे करणार आहे. स्टेट को-ऑप बँकेचे संचालक याठिकाणी आहेत. श्री. गडाख साहेब आहेत, श्री. जयंत पाटील आहेत. बँकेच्या एमडीला विचारले असता त्यांनी सांगितले की नाबार्डकडे फाईल गेलेली आहे. तीन महिने झाले तरी परवानगी मिळालेली नाही. 3 दिवसात परवानगी मिळण्याची शासनाला खात्री आहे काय ? मा.सदस्य वेगळी माहिती देत आहेत आणि उपमुख्यमंत्री वेगळी माहिती देत आहेत. आकस्मिकता निधीतून 1200 कोटी रुपये देण्याचे ठरले आहे. वित्तीय संस्थांच्या भरवशावर शासनाला हे पैसे राज्य सहकारी बँकेकडून किंवा स्टेट बँकेकडून तीन दिवसात मिळणार आहेत काय ? ते जर मिळणार नसतील तर या ठरावाचा आत्मा पैसे आहे त्यावर आम्ही काय बोलणार ? उपमुख्यमंत्री महोदयांनी ही गोष्ट क्लीअर करावी. मंत्रीमहोदयांनी ही गोष्ट क्लीअर करावी. तोपर्यंत सभागृह तहकूब करावे अन्यथा याबाबतीत खुलासा झाल्याशिवाय चर्चेला अर्थ राहणार नाही.

यानंतर श्री. सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार : अध्यक्ष महाराज, हे 1200 कोटी रुपये कशा प्रकारे उभे केले जाणार आहेत आणि कशा प्रकारे दिले जाणार आहेत याबाबतची माहिती माननीय पणन मंत्री देऊ इच्छितात तरी सभागृहाने त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे अशी माझी विनंती आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : अध्यक्ष महाराज, 1200 कोटी रुपयांचा प्रश्न येथे उपस्थित करण्यात आलेला आहे आणि त्या संदर्भात या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आणि श्री.गडाख यांनी सांगितले की, अशा पध्दतीने अजूनपर्यंत बँकेने पैसे रिलिज केलेले नाहीत. अध्यक्ष महाराज, मी या संदर्भात एवढ्या पुरतेच आपल्याला सांगू इच्छितो की, 14 मार्च 2005 रोजी हमी देण्याच्या बाबतीतील प्रस्ताव महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत शासनाकडे प्राप्त झाला आहे. त्यावर 1009 कोटी रुपये एमएससी बँक राज्य सरकारने जर डिफॉल्ट गॅरंटी घेतली आणि त्या संबंधातील मार्जिन मनी 252.10 कोटी ..ही दुरावा रक्कम .. या दोन अटी आणि रिझर्व्ह बँकेची मान्यता मिळाल्यानंतर आम्ही ही रक्कम वितरित करू अशा पध्दतीने ....(अडथळा) अध्यक्ष महाराज, माननीय विरोधी पक्षनेत्यांना मी विनंती करतो की, त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत उत्तर मी द्यावे असे त्यांना वाटत असेल तर त्यांनी माझे म्हणणे शांतपणे ऐकून घ्यावे. अध्यक्ष महाराज, या संदर्भात 15 मार्च ला आपण महाराष्ट्र सरकारच्या वतीने 1009 कोटी रुपयांची डिफॉल्ट गॅरंटी अधिक 252 कोटी रुपयांचा मार्जिन मनी देण्याच्या संदर्भातील जी.आर. काढला आहे. त्यानंतर कालच आमच्या विभागाचे सचिव रिझर्व्ह बँकेमध्ये जाऊन आले. नाबार्डमध्ये गेले कारण नाबार्ड मार्फत तो प्रस्ताव रिझर्व्ह बँकेकडे गेलेला आहे आणि रिझर्व्ह बँकेकडून शासनाची थकित हमी अधिक दुरावा रक्कम उपलब्ध झाली असल्यामुळे रिझर्व्ह बँकेची मान्यता आल्यानंतर या बाबतीतील एमएससी बँकेचे वितरण केले जाईल.

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, या प्रस्तावाला आरबीआयने अजून मान्यता दिलेली नाही. लोन कमिटीचे सन्माननीय सदस्य असलेले सन्मान्य श्री.यशवंतरावजी गडाख येथे म्हणत आहेत की, लोन कमिटीमध्ये हा विषय अजून तरी आलेला नाही. अध्यक्ष महाराज, मी एखाद्या बँकेत कर्ज मागितले आणि कागदपत्रे दिली आणि माझ्याकडून स्वीकृती दिली म्हणजे मला लगेच कर्ज मिळाले असे होते का ? तेव्हा मला वाटते बहुधा हे 1200 कोटी रुपये स्टेट बँकेचे असू शकतात. त्यांना आपण याबाबतीत संधी दिली पाहिजे. राज्य सहकारी बँकेच्या बाबतीत आता स्पष्ट झालेले आहे की, रिझर्व्ह बँकेने अजून यासाठी मंजुरी दिलेली नाही. स्टेट बँकेच्या लोन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गडकरी ....

कमिटीमध्ये हा विषय अजून गेलेलाच नाही. त्यामुळे हे 1200 कोटी रुपये येण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मग हे 1200 कोटी स्टेट बँकेचे आहेत काय ? ... 'होय' उत्तर असेल तर मग हा प्रश्न सुटला असे समजून आपण पुढे जाऊ. मात्र तसे आपण स्पष्टपणे 'होय' म्हटले पाहिजे. अन्यथा काल या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी 3 दिवसात 1200 कोटी रुपये वितरित केले जातील असे म्हटले आहे ते 1200 कोटी रुपये कोठून येणार आहेत ? ते आपण स्पष्ट करावे.

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, हा अत्यंत गंभीर प्रश्न आहे. त्याबाबत खुलासा करण्यासाठी आपण माननीय उपमुख्यमंत्र्यांना येथे बोलावणे गरजेचे आहे. ते येईपर्यंत वाटल्यास आपण सभागृह तहकूब करावे अशी माझी आपणास विनंती आहे. महाराष्ट्रातील विदर्भा, मराठवाडा व खानदेशातील जवळपास 10 लाख कुटुंबाचा प्रश्न यावर अवलंबून आहे.

**उपसभापती** : मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना बोलावणे पाठविलेले आहे.

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, त्यांचे हे येणारे 1200 कोटी रुपये स्टेट बँकेचे आहेत हे उत्तर सत्य आहे. असे असेल तर अध्यक्ष महाराज, आपण तसे सांगावे. म्हणजे मग आम्ही ही चर्चा पुढे चालू करतो. पण माननीय उपमुख्यमंत्र्यांनी त्याबाबत खुलासा करण्यासाठी तरी येथे आपण त्यांना बोलावून घ्यावे आणि ते येईपर्यंत आपण सभागृह स्थगित करावे अशी माझी आपणास विनंती आहे.

( यानंतर श्री.जागडे ....एलएल 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( गोंधळ )

श्री. दिवाकर रावते : पाच वेळा या ठिकाणी सांगितले आहे की, उपमुख्यमंत्री या ठिकाणी येत आहेत. यामध्ये आतापर्यन्त 15 मिनिटांचा कालावधी गेला आहे.

( गोंधळ )

**उपसभापती** : मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 4 वाजून 30 मिनिटांनी 15 मिनिटांकरिता स्थगित झाली. )

-

( यानंतर श्री. सरफरे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी मा. उपसभापती)**

**उपसभापती** : सभागृहाची बैठक 5.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

( 4.47 ते 5.00 बैठक स्थगित झाली.)

-----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

**सभापतीस्थानी - मा.उप सभापती**

श्री.आर.आर.पाटील (गृह मंत्री) : सभापती महोदय, . . . .

श्री.दिवाकर रावते(खाली बसून) : माननीय मंत्री महोदय कोणत्या विषयावर बोलण्यासाठी उभे आहेत.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, आपण ज्या गोष्टीवर तास-दीड तास चर्चा केली, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. काल या सदनामध्ये कापसाचे चुकारे देण्याबद्दलचा प्रश्न उपस्थित झाला होता आणि त्यासंदर्भात मी दिलेल्या उत्तरावरुन, अजून राज्य सहकारी बँकेने पैसे मंजूर केलेले नाहीत तर, कशाच्या आधारावर पैसे मंजूर केले आहेत ? यामुळे सदनाची दिशाभूल झ ााली का ? अशा पध्दतीच्या शंका-कुशंका माननीय विरोधी पक्षनेत्यांनी, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि इतर सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार(खाली बसून) : त्या कुशंका नाहीत, तर शंका आहेत.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, साधारणत: अधिवेशन सुरु होण्यापूर्वी राज्यातील सर्व भागातून आपण फिरुन आले पाहिजे म्हणून अकोला, यवतमाळ, नागपूर या परिसरामध्ये मी दौरा आयोजित केला होता. एकंदरीत सर्व कार्यकर्त्यांनी, त्या विभागातील विविध पक्षाच्या लोकांनी जी निवेदने दिली, त्यात प्रामुख्याने एकच मागणी केली होती की, आता लग्नाचा सिझन सुरु होत आहे. शेतक-यांच्या अडीअडचणी सुरु झाल्या आहेत. पुढची मशागतीची कामे आहेत. अशा वेळी कोणत्याही परिस्थितीत शेतक-यांना चुकारा मिळाला नाही तर पुन्हा सावकाराचा दरवाजा ठोठवावा लागेल. यामुळे शासनाने कापसाचा चुकारा दिला पाहिजे अशी सर्वच राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी निवेदने देऊन फार तीव्रतेने मागणी केली होती. त्या भागांचा दौरा करुन आल्याबरोबर, त्याचदिवशी संध्याकाळी मी माननीय मुख्यमंत्र्यांना फोन करुन सांगितले की, याबाबतीत लोकांच्या एवढया तीव्र भावना आहेत की, आपण या प्रश्नावर लवकर मार्ग काढून शेतक-यांना मदत केली नाही, त्यांचा चुकारा दिला नाही तर कदाचित राज्यात लॉ ॲण्ड ऑर्डरचे प्रश्न उपस्थित होऊ शकतील. अडचणी सहन करावयास एक मर्यादा असते अशा मी माझ्या भावना व्यक्त केल्या होत्या. तातडीने दुस-या दिवशी माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात पणन मंत्री, मी आणि त्याचबरोबर कापूस एकाधिकार योजनेच्या फेडरेशनमधील सर्व अधिकारी, सहकार खात्याचे

. . . .2 एन-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

अधिकारी, राज्य सहकारी बँकेचे सर्व लोक म्हणजे चेअरमन, एम.डी. यांची एक बैठक माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात आयोजित केली होती. राज्य सहकारी बँकेने काही अडचणी उपस्थित केल्या होत्या की, डिफॉल्ट गॅरंटी डीड द्यावी, दुराव्याची रक्कम दिली पाहिजे आणि त्याचबरोबर रिझर्व बँकेकडील लिमिट वाढवून मिळाली पाहिजे. या गोष्टी केल्याबरोबर आम्ही राज्य शासनाला आवश्यक असलेले 1200 कोटी रुपये तातडीने देऊ. या बैठकीत मी असा मुद्दा उपस्थित केला होता की, शेवटी या फॉरमॅलिटीज् व्यवस्थित करावयास वेळ लागणार असेल तर लॉ ॲण्ड ऑर्डरचे प्रश्न निर्माण होतील आणि पोलीस व शेतकरी असा संघर्ष निर्माण होईल. त्यामुळे निष्कारण शेतक-यांच्या हालअपेष्टा होता कामा नयेत. एका बाजूला शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत. तेव्हा लॉ ॲण्ड ऑर्डरच्या मुद्यावर राज्य सहकारी बँकेने तातडीने हे पैसे दिले पाहिजेत असा प्रश्न निर्माण केला. त्यावेळी राज्य सहकारी बँकेने सांगितले की, डिफॉल्ट गॅरंटी डीड द्यावी आणि दुराव्याची रक्कम द्यावी, मग आम्ही तातडीने निधी उपलब्ध करुन देऊ असे माननीय मुख्यमंत्र्याकडील बैठकीत सांगण्यात आले. त्यानंतर तीन-चार दिवसांनी मी याबाबतीत पुन्हा चौकशी केली की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या बरोबर झालेल्या बैठकीमध्ये या संदर्भात ज्या बाबी ठरलेल्या होत्या, त्याबाबतीत कारवाई झाली का, असे मी माननीय पणन मंत्र्यांना विचारल्यानंतर अद्याप काही बाबी शिल्लक आहेत असे त्यांनी माझ्या निदर्शनास आणून दिले. त्यानंतर पुन्हा मी माझ्या दालनात संबंधित अधिका-यांची, राज्य सहकारी बँकेचे अधिकारी, सहकार मंत्री, सहकार राज्यमंत्री इत्यादींची पुन्हा एक बैठक आयोजित केली. या सर्व प्रकरणात राजकारणापेक्षा लोकांना मदत व्हावी हीच प्रामुख्याने भावना होती, असा निश्चितपणे हेतू होता. राज्य सहकारी बँकेच्या अधिका-यांनी चेअरमन, एम.डी.यांच्या उपस्थितीत स्पष्टपणे सांगितले की, रिझर्व्ह बँकेकडून लिमिट वाढवून घेण्याची बाब ही रिझर्व्ह बँक आणि आमच्यामध्ये आहे. ती मर्यादा यथावकाश वाढवून घेऊ. पण डिफॉन्ट गॅरंटी डीड करुन दिल्यानंतर, दुराव्याची रक्कम दिल्यानंतर.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील....

आम्ही त्याच दिवशी राज्य सरकारला पैसे उपलब्ध करुन देऊ. आमच्याकडे सुध्दा एक्सेस पैसे आहेत. एका बाजूला बँकेकडे एक्सेस पैसे आहेत आणि दुस-या बाजूला शेतक-यांना पैसे नाहीत. मी त्यांना पुन्हा सगळया वरिष्ठ अधिका-यांसमोर आणि मंत्रिमंडळातील तीन सहका-यांसमोर विचारले की, या दोन गोष्टी केल्या नंतर आपण तातडीने पैसे देणार का? सभापती महोदय,

माझ्या दालनात झालेल्या मिटिंगमध्ये त्यांनी हया गोष्टी मान्य केल्या होत्या. काल आपल्या सदनामध्ये येत असतांना मी पणन मंत्र्यांना विचारले की, ज्या बाबी आपण पूर्ण करावयाच्या होत्या त्यामध्ये डिफॉल्ट गॅरन्टी, राज्य सरकारची हमी आणि दुराव्याची रक्कम याबाबतीत जे निर्णय पणन विभागाने/फायनान्स विभागाने घ्यावयास पाहिजे होते ते आपल्याकडून झाले कां? सन्माननीय सभापती महोदय, खाली माननीय अध्यक्षांच्या दालनात मी, माननीय मुख्यमंत्री आणि पणन मंत्री बसलेलो असतांना आपल्याकडील सगळया बाबींची पूर्तता आपण केलेली आहे, अशी आमची चर्चा इ ााली. आणि ही वस्तुस्थिती आहे की, या सगळया गोष्टींची पूर्तता राज्य सरकारमार्फत करण्यात आलेली आहे. 14 तारखेला जी.आर.काढून ती गॅरन्टी देण्याचा निर्णय सुध्दा राज्य सरकारने घेतला आहे. हा निर्णय राज्य सरकारने घेतल्यानंतर पुन्हा राज्य सहकारी बँकेने लिमिटसाठी ज्यावेळी रिइ ार्व बँकेकडे परवानगी मागितली, त्यावेळी त्यांनी आणखी एक अट टाकली की, जुन्या काळामध्ये विविध कारखान्याच्या विविध गोष्टीसाठी 400 कोटी रुपयाला राज्य सरकारने थक हमी दिली होती, तेही पैसे भरावेत आणि मग पुढचा निर्णय घ्यावा. हा निर्णय राज्य सरकारला काल संध्याकाळी कळला. मी सदनामध्ये उत्तर दिल्या नंतर हा निर्णय राज्य सरकारच्या लक्षात आला. त्याच्या संदर्भातसुध्दा राज्य सरकारने तातडीने कारवाया सुरु केलेल्या आहेत. ही सगळी परिस्थिती बघितल्या नंतर राज्य सहकारी बँकेच्या अध्यक्ष आणि एम.डीं.नी माझ्या आणि माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालतान स्पष्टपणाने दिलेले आश्वासन, लोकांचे प्रश्न सुटावेत हा अतिशय परदर्शीपणा ठेवून राज्य सरकारने केलेली ही कृति, आणि राज्य सरकारच्या या सगळया भावनां, सदनाने सुध्दा विचारात घेण्याची आवश्यकता आहे. येथे कुठेही राजकीय क्रेडीट मिळविण्याचा प्रश्न नव्हता किंवा राजकीय कुरघोडी करण्याचा प्रश्न नव्हता. प्रश्न आहे राज्यातील शेतक-यांना न्याय देण्याचा. हया प्रामाणिक भावना आपण लक्षात घेतल्या पाहिजेत.आज राज्य सहकारी बँकेने एक ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही



16-03-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) OO-2

श्री. आर. आर. पाटील...

नवी अट टाकलेली आहे. याचीही पूर्तता आम्ही लवकरात लवकर करुन घेऊ. शेवटी या सभागृहातील चर्चा या राज्यातील शेतक-यांना फायद्याची ठरली पाहिजे. आर.बी.आय.ने जी अट टाकलेली आहे त्या संदर्भात आर.बी.आय.च्या चेअरमन बरोबर, केंद्रीय वित्त मंत्र्यांबरोबर आणि मुख्यमंत्री तसेच या देशाचे कृषि मंत्री यांच्या मार्फत आम्ही जरुर मध्यस्थी करु. सभापती महोदय, ही गोष्ट होऊ शकेल, एखादा-दुसरा दिवस वाढू शकेल, पण राज्य सरकारचा आणि माझा स्पष्ट इरादा आहे की, शेतक-यांना तातडीने मदत झाली पाहिजे. यात राजकारण नाही. गरीब शेतक-यांना मदत करण्याचा प्रश्न आहे. त्या शेतक-यांचा माल घेतला आहे. ते आपला माल दुसरीकडे विकू शकलेले नाहीत. म्हणून या सरकारच्या या प्रामाणिक भावना आहेत. रिझर्व्ह बँकेने नवी अट टाकली नसती तर आज या प्रश्नाची चर्चा करण्याचा प्रश्न सुध्दा उद्भवला नसता. आता पर्यंत राज्य सहकारी बँकेची भूमिकासुध्दा सरकारला सहकार्य करण्याचीच राहिलेली आहे. रिझर्व्ह बॅंकेच्या नव्या अटीच्या बाबतीत, 400 कोटी रुपयाच्या बाबतीत तर रिझर्व्ह बँकेने काही अडचणी निर्माण केल्या तर बजेटमध्ये तरतुद केली जाईल. राज्य सहकारी बँकेला कमिटमेंट केली जाईल की, इतक्या दिवसात तुमचे हे पैसे सुध्दा राज्य सरकारकडून दिले जातील. पण शेतक-यांसाठी हे 1200 कोटी रुपये मंजूर केले पाहिजेत, अशी आग्रही भावना राज्य सहकारी बँकेकडे व्यक्त केली जाईल. सभापती महोदय, काल दिलेल्या उत्तरात सभागृहाची दिशाभूल करण्याचा किंवा अन्य कुठलीही बाब करण्याचा निश्चित हेतू नव्हता. धन्यवाद.

------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SMT/ KTG/ SBT/ प्रथम सौ. रणदिवे.. 17:05

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मुळामध्ये आताही उपमुख्यमंत्री पुन्हा एकदा या सभागृहाची दिशाभूल करणारे निवेदन करीत आहेत. याचे कारण असे आहे की, जोपर्यंत महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या बोर्डामध्ये मंजुरीचे पत्र सरकारच्या हातात मिळत नाही तोपर्यंत आम्हाला 1200 कोटी रुपये मिळाले आणि तीन दिवसात आम्ही पैशाचे वाटप करु असे त्यांनी सभागृहात रेकॉर्डवर सांगितलेले आहे. त्यांचा प्रामाणिकपणा, त्यांची तळमळ, त्यांचा जिव्हाळा आणि शासनाची तळमळ याबाबतीतील कुठलीही मळमळ मी करीत नाही. कारण त्याच्याबद्दल मला चॅलेंज करायचे नाही. पण मला त्यांना नम्रतेने सांगावेसे वाटते की, कुठलेही शासन आणि इन्स्टिटयुशन या नियमाने चालतात.महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेवर नाबार्डचा एक डायरेक्टर आहे आणि रिझर्व्ह बँकेचा एक डायरेक्टर आहे.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

जोपर्यन्त महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या प्रस्तावाला नाबार्ड स्वीकृती देत नाही आणि नाबार्डच्या स्वीकृतीला रिझर्व बँक एन्डॉर्समेंट करीत नाही तोपर्यन्त तुमच्या कोठल्याही प्रस्तावाला कोणत्याही प्रकारचा अर्थ राहात नाही. तुम्ही तीन बैठका घेतल्या, तुमच्या मनामध्ये कळवळा निर्माण झाला, तुम्ही हे सर्व प्रामाणिकपणे केले. या दीड तासाच्या चर्चेत तुमच्याबद्दल कोणीही संशय व्यक्त केलेला नाही. या ठिकाणी चर्चा याकरिता उपस्थित झाली की, रिझर्व्ह बँकेच्या ॲप्रूव्हलशिवाय तुम्हाला महाराष्ट्र राज्य सहकारी बँक सॅन्क्शन लेटर देऊ शकत नाही. सॅन्क्शन लेटरशिवाय पैसे मिळाले आणि तीन दिवसात वाटप करु असे सरकारने सांगणे बरोबर नाही. तुम्ही मुद्दाम हे सांगितले असे मी म्हणणार नाही. असा आरोप जर मी केला तर असे होईल तुम्ही मुद्दाम हे केले आणि तुमच्यावर ते अन्याय करण्यासारखे होईल. परंतु कळत न कळत याबाबतीत सगळे नियम तुमच्या समोर आणून तुम्हाला जी वस्तुस्थिती सांगितली पाहिजे ती सांगितली गेलेली नाही. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या अध्यक्षांचा सन्मान ठेऊन मी सांगू इच्छितो की, त्यांच्या अधिकारात हा निर्णय नाही. दुसरी गोष्ट अशी की, एवढे मोठे लोन सरकारला देण्याच्या आधी, मला माहीत नाही पण या ठिकाणी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे तीन संचालक आहेत, त्यांना बोर्डाची सुध्दा मंजुरी घ्यावी लागते. तीन महिन्यापूर्वी यांच्या बोर्डाने हा प्रस्ताव मंजूर केलेला आहे परंतु तीन महिन्यापूर्वी मंजूर केलेला प्रस्ताव आहे तसेच सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील साहेबांनी सांगितले, माननीय श्री. अजितदादा पवार यांनी सांगितले की त्यांच्या बँकांजवळ पैसा पडलेला आहे आणि हा पैसा महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत ते तुम्हाला रुट करु इच्छितात. ते देण्यास तयार आहेत. परंतु हे सगळे करण्याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी ॲक्ट प्रमाणे महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटीव्ह बँक, अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक आणि डिस्ट्रीक्ट को-ऑपरेटीव्ह बँकेला कंट्रोलिंग ॲथॉरिटी जसे को-ऑपरेटीव्ह कमिशनर आहे किंवा को-ऑपरेटीव्ह डिपार्टमेंट आहे तसे या सगळया बँकांची मेन कंट्रोलिंग ॲथॉरिटी रिझर्व्ह बँक आहे. ज्या को-ऑपरेटीव्ह बँका आहेत त्यांना केंद्राचे अर्थ मंत्रालय हे नाबार्डच्या मार्फत कंट्रोलिंग करते आणि नाबार्डचे जे मंडळ असते त्यावर रिझर्व बँकेचा अंकुश आहे. सॅन्क्शनच्या बाबतीत रिझर्व्ह बँक ही फायनल ॲथॉरिटी आहे. नाबार्ड सुध्दा फायनल ॲथॉरिटी नाही. काही ठिकाणी नाबार्डच्या अधिकाऱ्यांच्याही मर्यादा

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

आहेत. म्हणून या केसमध्ये जोपर्यन्त तुमच्या प्रस्तावाला नाबार्डची संमती आणि रिझर्व्ह बँकेची संमती मिळत नाही तोपर्यन्त हा प्रस्ताव नल अँड व्हाईड आहे. याला काही अर्थ नाही. महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटीव्ह बँकेच्या अध्यक्षांनी आणि एम.डीं.नी तुमच्यासमोर वस्तुस्थिती ठेवली की नाही हे माहीत नाही परंतु ज्या रीतीने तुमची नोट तयार झालेली आहे त्यामध्ये उद्या जरी श्री. चिदंबरम साहेबांनी सांगितले आणि श्री. पवार साहेबांनी मध्यस्थी केली, ती जरुर करा, तुम्हाला आमच्या शुभेच्छा आहेत, सहकार्य आहे. पाहिजे तर या विषयाकरिता आम्ही तुमच्या बरोबर मागणी करण्यासाठी येऊ, तुमच्या बाजूने उभे राहू. तुम्हाला मदत करु. कारण तुम्ही जी भावना व्यक्त केली की, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मदत झाली पाहिजे, त्या तुमच्या भावनेवर पूर्णपणे विश्वास ठेवून तुम्हाला मदत करण्याची आमची तयारी आहे. सहकार्याची तयारी आहे. तुमच्या मागे उभे राहण्याची तयारी आहे. परंतु वस्तुस्थिती काय आहे ? कायद्याचा विद्यार्थी असल्यामुळे मी सांगतो. आपण माफ करा. आपण राज्याचे उपमुख्यमंत्री आहात. भावना आणि कायदा या वेगळ्या बाबी आहेत. महाराष्ट्रामध्ये जोपर्यन्त एक अंडर सेक्रेटरी, डेस्क ऑफीसर शासनाच्या आदेशानुसार परिपत्रक काढत नाही तोपर्यन्त मुख्यमंत्र्यांच्या म्हणण्यालाही काही अर्थ नसतो. जेव्हा ते पत्रक निघते तेव्हा तो शासनाचा निर्णय होतो. ही सिस्टीम आहे. या सिस्टीमध्ये आपली मशिनरी काम करीत आहे. माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील, आपण माफ करा. आपण काल सभागृहामध्ये जेव्हा घोषणा केली त्यावेळी या प्रस्तावाला रिझर्व्ह बँकेचे ॲप्रूव्हल मिळालेले नव्हते. या प्रस्तावाला नाबार्डचे ॲप्रूव्हल मिळालेले आहे की नाही हे माहीत नाही. नाबार्डचे ॲप्रूव्हल मिळाले असेल तर त्या स्टेजपर्यन्त ते बरोबर आहे. पण रिझर्व्ह बँकेच्या परवानगीशिवाय महाराष्ट्र राज्य सहकारी बँक पैसा सॅन्क्शन करुन तुम्हाला डिसबर्समेंटच करु शकत नाही याचा अर्थ सॅन्क्शनींग ॲथॅरिटी महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटीव्ह बँकेपेक्षाही रिझर्व्ह बँक आहे आणि रिझर्व्ह बँकेच्या सॅन्क्शनशिवाय तुम्हाला अशा प्रकारे कोणताही पैसा मिळणारच नाही. ही वस्तुस्थिती असताना कळत न कळत तुम्ही सभागृहामध्ये सांगितले की तीन दिवसाच्या आत आम्ही 1200 कोटी रुपयाचे वाटप ताबडतोब सुरु करु. तीन दिवसांच्या आत शेतकऱ्यांना पैसे मिळतील. दुर्दैवाने वस्तुस्थिती अशी आहे की, याबाबतीत तुम्हाला अजूनपर्यन्त रिझर्व्ह बँकेचे ॲप्रूव्हल मिळालेले नाही.

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

मी जेव्हा चर्चा सुरु केली तेव्हा आम्ही असे समजलो की, 1200 कोटी रुपये मिळणार आहेत. तुमच्या शब्दांवर विश्वास ठेवला. तुम्ही सभागृहात बोलला. काल तुम्ही प्रसिध्दी माध्यमांना मुलाखत दिली. रात्री आम्ही दूरदर्शनवर ऐकले की, आम्ही तीन दिवसात पैसे देणार आहोत. म्हणून आम्हाला वाटले की, तुमच्या म्हणण्याप्रमाणे तुमच्याकडे सॅन्क्शन पत्र आहे आणि त्याच्या आधारावर तुम्ही हे बोलत आहात. ज्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील हे सभागृहात उभे राहिले त्यावेळी त्यांनी सांगितले की, आज सकाळी ते महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमध्ये गेले होते आणि त्यांनी एम.डी.ला विचारले तेव्हा एम.डी.ने सांगितले की अजूनपर्यन्त सॅन्क्शन झालेले नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KGS/ MHM/ KTG/ श्री.बरवडनंतर 16:55

श्री.नितीन गडकरी...

मग या सभागृहामध्ये महाराष्ट्र राज्य को.ऑप.बँकेचे दुसरे संचालक आदरणीय श्री.यशवंतराव गडाखसाहेब उभे राहिले त्यांनी उभे राहून सांगितले की, मी लोन कमिटयांचा सदस्य आहे. अजूनपर्यंत आमच्याकडे कोणताही प्रस्तावच आलेला नाही. ही इन्कम्प्लीट प्रोसेस आहे. एखाद्या बँकेमध्ये तुम्ही तुमची सगळया गॅरेन्टीज, कागदपत्रे, मॉर्गेज डीड हे सगळे केले तरी तुम्हाला ते लोन डिस्बर्समेंट पूर्ण होत नाही. मी 23 दिवसापासून अनुभव घेत आहे. मी एका राष्ट्रीयकृत बँकेत माझ्या पॉवर प्रोजेक्टच्या संदर्भातील सर्व फॉरमॅलिटीज पूर्ण केल्या आहेत. मी दिवसाला जवळजवळ 70-80 लाख रुपयांचे नुकसान सहन करीत आहे. त्यांनी मला फक्त डिस्बर्समेंट करावयास पाहिजे. 23 दिवस झाले आहेत परंतु तेथील मॅनेजर मला डिस्बर्समेंट करीत नाही. आज एक पत्र मागतो, उद्या दुसरे मागतो. जी सिस्टीम आहे ती आहे. सगळया फॉरमॅलिटिज पूर्ण केल्या म्हणजे मला लोन मिळते असे होत नाही. ज्यादिवशी तेथील अकाऊंटंट वा मॅनेजर डिस्बर्समेंट करुन माझ्या हातामध्ये चेक देतो किंवा सँक्शन लेटर देतो की, तुम्हाला हे पैसे मी दिले आहेत. पण तुमच्याकडे प्रिंसिपल सँक्शनही नाही. अशा केसेसमध्ये ॲडव्हांसमध्ये एक पत्र मिळत असते. ज्याला आपण प्रिंसिपल सँक्शन म्हणतो. तुमचा प्रस्ताव प्रिंसिपली ॲक्सेप्ट केला आहे, ते देखील तुमच्याजवळ नाही. तुमच्याकडे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या मंजुरीचे पत्र नाही, आरबीआयची परवानगी नाही, नाबार्डचे क्लीअरंस नाही. तीन महिन्यापूर्वी बोर्डाच्या झालेल्या निर्णयानंतर पुन्हा नवीन अटी टाकल्या आहेत त्याच्या आधारावर पुन्हा बोर्डाची मंजुरी मिळाली की नाही ते सुध्दा नाही. तुमच्याकडे येऊन त्यांनी सांगितले की, आम्ही तुम्हाला पैसे देत आहोत. तुम्हाला अधिका-यांनी जी माहिती दिली त्याच्या आधारावर तुम्ही सांगितले की, 3 दिवसामध्ये 1200 कोटी रुपयांचे वाटप करु. हे उद्‌गार तुम्ही सभागृहाच्या रेकॉर्डवर काढलेले आहेत. दुर्दैवाने तुमच्या इंटेन्शनबद्दल मी कोणताही आरोप करीत नाही. कारण ग्राऊंड रिॲलिटी आणि वस्तुस्थिती ही आहे की, तुम्ही तीन दिवसच काय कदाचित 15-20 दिवसात सुध्दा पैसे देऊ शकणार नाही. याचे कारण असे की, एखाद्या वेळेस रिझर्व्ह बँकेने जर रिजेक्ट केले तर मग तुम्ही पैसेच देऊ शकणार नाही. ही प्रोसेस अपूर्ण आहे. प्रशासनाच्या दृष्टीने ही संपूर्ण प्रोसेस अजूनपर्यंत पूर्ण झालेली नाही. तुमच्या हातामध्ये एकही मंजुरीचे पत्र नाही. काल तुम्ही

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..

सभागृहामध्ये जी घोषणा केली आहे ती चांगल्या भावनेतून केली असेल , आम्ही तुमच्या इंटेशनला कधीही चॅलेंज केलेले नाही. पण ग्राऊंड रिॲलिटी ही आहे की, तुम्ही केलेली घोषणा आणि वस्तुस्थिती यामध्ये फार मोठी तफावत आहे. सभागृहातील सदस्य भाषण करीत असताना 1200 कोटी रुपये आज मिळाले आहेत असे समजून बोलत होते. ही आमची आणि सभागृहाची आपल्याकडून कळत नकळत दिशाभूल झालेली आहे. हा ग्राऊंट रिॲलिटीचा पुरावा आहे. तुमचे इंटेशन चांगले आहे, तुमच्या भावना चांगल्या आहेत, तुमचा कळवळा चांगला आहे. त्यामुळे मी मळमळ ओकत नाही, मी राजकारण करीत नाही. मी या विषयावर तुमच्याविरुध्द हक्कभंग आणू शकतो. परंतु तो मला आणावयाचा नाही. कारण तुमच्या हेतूबद्दल मला आदर आहे. मला राजकारणही करावयाचे नाही. परंतु ग्राऊंट रिॲलिटी ही आहे की, तुमच्याजवळ सँक्शन लेटर नाही. तुमच्याजवळ आरबीआयचे क्लीअरंस नाही. एमएससी बँकेच्या बोर्डाची मंजुरी नाही. एकटा एमडी किंवा अध्यक्ष मंजुरी देऊ शकत नाही कारण त्याला तसा अधिकारच नाही. 3 महिन्यापूर्वी यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाला त्यांनी अतिरिक्त अट घातली आहे. ती अट एमएससी बँकेची आहे की रिझर्व्ह बँकेची आहे हे मला माहीत नाही. खरे म्हणजे एमएससी बँकेने अट घातली असेल तर ती काढता येईल. कारण त्यांची ही अट असेल तर अडचणीच्या वेळी सरकारला ब्लॅकमेलिंग करण्याचा हा प्रकार आहे. एमएससी बँकेची अट असेल तर त्या बँकेला दरडवा, बँकेचेही जरा नाक दाबा. रिझर्व्ह बँकेची अट असेल तर ती काढता येणार नाही, कारण ती आपल्या कंट्रोलमध्ये नाही. पण एमएससी बँकेला सांगा की, ही राज्याची बँक आहे आणि आम्ही तुम्हाला वेळोवेळी मदत करतो तुम्ही कशाची अट घालता, बोर्डाला ही अट काढून टाकण्यास सांगा. सरकार पळून जात नाही, तुमचे पैसे देईल, आम्ही गॅरेंटी घेतलेली आहे, तुम्ही भलत्याच अटी घालून अडचणीच्या वेळी सरकारला ब्लॅकमेल करु नका असे सांगा. हया बँकेने ब्लॅकमेलिंग करणे बरोबर नाही. एमएससी बँकेने नाबार्ड आणि रिझर्व्ह बँकेची मंजुरी घेऊन सरकारकडून हमी घेऊन लगेच पैसे दिले पाहिजेत. या पैशाबद्दल सांगेन की, 2400 कोटीचे देणे आहे आणि 1600 कोटीचा कापूस आहे. म्हणजे 1200 कोटी किंवा 800 कोटीचे नुकसान असेल त्याबाबत शासन जबाबदारी

3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..

घेऊन, हमी घेऊन तुम्हाला देणार आहे. या गॅरेंटीच्या अनुषंगाने रिझर्व्ह बँक आणि नाबार्डची मंजुरी घेऊन एमएससी बँकेने पैसे दिले पाहिजे. जोपर्यंत नाबार्ड आणि रिझर्व्ह बँक मंजुरी देत नाही तोपर्यंत तुम्ही केलेली घोषणा वस्तुस्थितीला धरुन नव्हती, तुम्ही काढलेले उद्‌गार वस्तुस्थितीला धरुन नाहीत, तुमच्याजवळ मंजुरी नाही, मंडळाची मंजुरी नाही, रिझर्व्ह बँकेची मंजुरी नाही आणि तुम्ही 3 दिवसामध्ये 1200 कोटी रुपये देऊ अशी घोषणा केली आहे, तरीही तुमच्या इंटेशनला मी चॅलेंज करीत नाही, राजकारण करीत नाही, हक्कभंग आणत नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, कळत नकळतपणे अधिका-यांनी तुम्हाला जी माहिती पुरविली आहे ती बरोबर नसल्यामुळे प्रामाणिकपणे तुमच्या तोंडून उद्‌गार निघाले असतील त्यामुळे सभागृहाची दिशाभूल झालेली आहे. ते 1200 कोटी रुपये मिळालेले नाहीत.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी......)

माझी एवढीच विनंती आहे की, या प्रकाराबद्दल माननीय उप मुख्यमंत्र्यांनी दिलगिरी व्यक्त केली पाहिजे. कापूस उत्पादक शेतक-यांच्या कापसाचे पैसे देण्याच्या कामात तुम्हाला जे काही सहकार्य लागेल ते देण्याची आमची तयारी आहे. आम्ही तसे पत्र द्यायला तयार आहोत. महाराष्ट्रातर्फे एकमुखी मागणी करायला आम्ही तयार आहोत. We are never challenging your intention and integrity. परंतु ग्राऊंड रियालिटी वेगळी आहे. त्याबद्दल आपण दिलगिरी व्यक्त करावी. सभागृहाच्या प्रतिष्ठेकरिता आणि सन्मानाकरिता या सभागृहाचे नेते म्हणून तुम्ही सांगितलेली माहिती वस्तुनिष्ठतेला धरुन नाही. कालचे जे रेकॉर्ड आहे ते देखील रेकॉर्ड माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या संमतीने दुरुस्त करणे आवश्यक आहे. तेव्हा माननीय उपमुख्यमंत्र्यांनी दिलगिरी व्यक्त करुन हा विषय संपवावा अशी माझी त्यांना नम्रतापूर्वक विनंती आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ( पाटबंधारे (कृष्णाखोरे पाटबंधारे महामंडळ वगळता) लाभक्षेत्र विकास मंत्री) : सभापती महोदय, कापसाच्या संदर्भात काल आणि आज जवळ जवळ अडीच-तीन तास चर्चा झाली. या संदर्भात माननीय उपमुख्यमंत्र्यांनी शासनाची भूमिका देखील मांडली. शेतक-यांना कापसाचे चुकारे मिळाले पाहिजेत, पैसे मिळाले पाहिजेत याबद्दल कुणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. कॅबिनेटमध्ये निर्णय घेत असताना या प्रश्नासंबंधी मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री आणि मा. पणन मंत्री हे तिघेही मनापासून प्रयत्न करीत आहेत. कालच सहकार विभागाचे सचिव कापसाचे चुकारे देण्याकरिता, शेतक-यांचे पैसे देण्याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची लिमिट वाढविण्याच्या संदर्भात रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटी गव्हर्नरकडे गेले होते. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक श्री. शिंदे यांच्याकडून रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटी गव्हर्नरने संपूर्ण माहिती घेतली, तसेच आमच्या सचिवांकडूनही सर्व माहिती घेतली. आताची परिस्थती काय आहे हे समजून घेतल्यानंतर त्यांनी एक सूचना केली की, पाठिमागच्या काळामध्ये काही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि काही अर्बन को-ऑप बँकेच्या फेडरेशनने ठेवी घेतल्या होत्या त्या ठेवींची मुदत संपल्यानंतर पैसे परत करायला पाहिजे होते. साधारणत: 400 कोटी रु.च्या त्या ठेवी होत्या आणि ते पैसे फेडरेशन देऊ शकत नाही. कारण कापसाच्या व्यवहारामध्ये त्या ठेवींच्या रकमा वापरात आल्या. आणखी दोन-तीन वेळा त्या संदर्भामध्ये चर्चा झाली की, हे पैसे दिले गेले पाहिजेत. ही गोष्ट रिझर्व्ह बँकेच्या लक्षात आली आणि त्यांनी कळविले होते की, हे 400 कोटी रुपये तोबडतोबीने द्यावेत. यासंदर्भात पणन मंत्री, अर्थमंत्री यांनी चर्चा केली. लिमिट वाढवून देण्यास रिझर्व्ह बँक तयार आहे. दुराव्याची रक्कम भरण्याकरिता राज्य शासन तयार झालेले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्बन को-ऑप. बॅकांचे ठेवीच्या स्वरुपातील 400 कोटी रु. परत केल्यानंतर महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला ताबडतोबीने लिमिट वाढवून दिले जाईल. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, एमएससी बँक काही अटी घालत आहे. एमएससी बँकेने कोणत्याही अटी घातलेल्या नाहीत. एमएससी बँकेकडे मोठ्या प्रमाणावर निधी आहे. जेव्हा जेव्हा राज्यकर्त्यांना कापूस शेतक-यांचे तसेच कांदा पिकविणा-या शेतक-यांचे पैसे द्यावे लागले त्या त्या वेळी राज्य शासनाने हमी घेतल्यानंतर एमएससी बँकेने पैसे दिलेले आहेत आणि राज्य शासनाने एमएससी बँकेचे पैसे व्याजासहित परत केलेले आहेत. मा. विरोधी पक्षनेत्यांनी याठिकाणी सांगितले की...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : एमएससी बँकने अटी टाकल्या नसतील तर मी माझे शब्द मागे घेतो. परंतु रिझर्व्ह बँकेने अटी टाकलेल्या आहेत. त्याबाबतीत सांगावे.

श्री. अजित पवार : रिझर्व्ह बँकेने सांगितले की, 400 कोटी रुपये दिल्यानंतर कोणताही आक्षेप घेतला जाणार नाही आणि लिमिट वाढवून देण्याला मान्यता देऊ.

...नंतर श्री. गिते...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

सभापती महोदय, तशा पध्दतीने राज्य शासनाने निर्णय घेतला तर काहीही अडचण येणार नाही. या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री, पणन मंत्री, वित्त मंत्री मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा करतील. राज्यातील कापूस उत्पादक शेतक-यांना पैसे मिळाले पाहिजे म्हणून राज्य शासनास काही तरी मार्ग काढावाच लागेल. राज्य शासनाने आर.बी.आय.च्या अटीच्या संदर्भात मार्ग काढला तर एम.एस.सी.बॅंकेच्या बोर्डाची मिटींग घेण्याची काहीही गरज भासणार नाही. एम.एस.सी.बॅंकेच्या बोर्डाच्या पूर्वीच्या मिटींगमध्ये या विषयीच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. मान्यता म्हणजे तसा ठराव केलेला आहे. त्यामुळे एम.एस.सी. बॅंकेकडून कोणतीही अडचण येणार नाही. एम.एस.सी. बॅंकेशी निगडीत काही अडचण निर्माण झाली तर बोर्डाची तातडीची बैठक घेऊन यासंदर्भातील निर्णय घेऊ. शासनास एक दिवस देखील थांबण्याची वेळ एम.एस.सी.बॅंक येऊ देणार नाही अशी मी या सभागृहात ग्वाही देऊ इच्छितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, या सभागृहात माझ्या नावाचा उल्लेख झाला म्हणून मी खुलासा करु इच्छितो. या सभागृहात सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे कापसाच्या संदर्भात भाषण करीत होते त्यांच्या भाषणाचा शेवटी मी सभागृहात उपस्थित होऊ शकलो. त्यांनी आपल्या भाषणात एम.एस.सी. बँकेचा उल्लेख केला. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, एस.एस.सी. बँकेची लोन कमिटीची बैठक आज सकाळी झाली. कापसाच्या विषयावर काल सभागृहात चर्चा झालेली आहे. सन्माननीय श्री.अजित पवार यांनी अतिशय चांगल्या भावनेने सभागृहात सांगितले की, राज्यात सरकार कुठल्याही पक्षाचे असो, सरकारला ज्या ज्या वेळी अडचणी येतात, त्या त्या वेळी एम.एस.सी. बँक मदत करीत असते. बँकांचे 400 कोटी रुपये अडकले आहेत यासंबंधी सभागृहात चर्चा केली गेली, रिझर्व्ह बँकेने पैसे देण्याच्या संदर्भात जी अट घालून दिलेली आहे त्याही संदर्भात चर्चा करण्यात आलेली आहे. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, माननीय उप मुख्यमंत्री हे संपूर्ण विदर्भात फिरले. तेथील कापूस उत्पादक शेतक-यांची परिस्थिती जाणून घेऊन ती माननीय मुख्यमंत्र्यांच्या समोर मांडली. कापूस उत्पादक शेतक-यांना त्यांच्या कापसाचे पैसे मिळावेत म्हणून आर.बी.आय. तसेच एम.एस.सी.बँक यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. कापूस उत्पादक शेतक-यांना पैसे मिळवून देण्यासंबंधीची त्यांची जी तीव्रता होती ती त्यांनी काल सभागृहात सांगितली. माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या इन्टेन्शन बाबतीत आपले दुमत नाही, त्यांचे इन्टेन्शन बरोबर आहे असे आपण मान्य केले आहे. कापूस उत्पादक शेतक-यांना त्यांच्या कापसाचे पैसे दिले गेले पाहिजेत असे सर्वांचे मत आहे. या बाबतीत कोणाचेही दुमत नाही. या संदर्भात शासनाकडून काही त्रुटी राहून गेल्या आहेत त्या त्रुटी शासन पूर्ण करीत आहे. एम.एस.सी. बँकेकडून शासनास पैसे उपलब्ध करुन देण्याबाबतीत कोणाचेही दुमत नाही. आर.बी.आय.ने अट टाकून दिल्यामुळे शासनाची अडचण आलेली आहे. एम.एस.सी.बँकेकडून कोणत्याही प्रकारची अडचण आलेली नाही. माझी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना विनंती आहे की, माननीय उप मुख्यमंत्र्यांचे इन्टेन्शन बरोबर आहे, त्यांच्या इन्टेन्शच्या बाबतीत दुमत नाही असे आपण प्रामाणिकपणे मान्य केले असेल तर या प्रकरणावर आपण पडदा पाडावा. एवढया लहानशा गोष्टीबद्दल माननीय उप मुख्यमंत्र्यांना दिलगिरी व्यक्त करावयास लावणे बरोबर नाही असे मला वाटते. कापूस उत्पादक शेतक-यांना कापसाचे चुकारे तात्काळ मिळावेत

3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख...

म्हणून मा.उप मुख्यमंत्री यांनी खूप रस घेतला आहे. या विषयाच्या बाबतीत तातडीने उपाय कसा काढावा असा उद्देश माननीय उप मुख्यमंत्र्यांचा होता असे गृहीत धरावे व हा विषय संपवावा अशी माझी पुन्हा सभागृहाला विनंती आहे.

-------------

4...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, राज्यातील शेतक-यांकडून खरेदी करण्यात आलेल्या कापसाचे पैसे शेतक-यांना त्वरीत मिळावेत म्हणून म.वि.प.नियम 289 चा आधार घेऊन काल सभागृहात प्रस्ताव मांडला होता. प्रश्नोत्तराचा तास तसेच सभागृहापुढील सारे कामकाज बाजूला सारुन या विषयावर चर्चा घ्यावी अशी मागणी केली होती. सभागृहात या विषयाची मागणी करीत असताना माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित होते. शेतक-यांना लवकरात लवकर पैसे मिळावेत असा आमचा मागणी मागचा उद्देश होता. ही मागणी कालच सभागृहात केली अशी परिस्थिती नाही. नागपूरच्या अधिवेशनात देखील मी अशा प्रकारची मागणी केलेली होती. ही चर्चा आजच सभागृहात होत आहे अशी देखील परिस्थिती नाही. यापूर्वी देखील या विषयावर चर्चा झालेली आहे. आमचा माननीय उप मुख्यमंत्र्यांना वा संबंधित मंत्र्यांना अडचणीत आणण्याचा मुळीच उद्देश नाही. आम्हाला आमच्या भावना माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून सरकारसमोर ठेवावयाच्या होत्या म्हणून आम्ही नियम 289 अन्वये प्रस्ताव सभागृहात आणला होता. या प्रस्तावावर सभागृहात चर्चा करावयाची की नाही या संदर्भात चर्चा चालली असताना माननीय उप मुख्यमंत्री आपल्या जागेवर उभे राहीले व त्यांनी निवेदन करण्यास सुरुवात केली. निवेदन करुन शासनाची जबाबदारी संपली अशा थाटात त्यांनी आपले मनोगत रेकॉर्डवर आणले. या गोष्टीस अति उत्साहीपणा असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. सर्व सदस्यांचा रोष एवढाच आहे की, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी कोणत्या अधिकाराचा वापर करुन निवेदन केले ही गोष्ट तपासून पाहिली पाहिजे. माननीय मुख्यमंत्र्यांचे काम माननीय उप मुख्यमंत्र्यांनी करावयास हरकत नाही. पण शक्य असेल तरच त्यांनी ते काम करावे..

यानंतर श्री.उपरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.मधुकर सरपोतदार)

तसे होऊ शकत असेल तर. केवळ याच निवेदनामुळे आपल्याला खालच्या सदनामध्येसुध्दा तोंड द्यावे लागले. आपण केवळ या ठिकाणी निवेदन करून थांबला नाहीत तर आपण माध्यमासमोर गेलात. माध्यमासमोर हे सर्व मांडले. त्याचा परिणाम काय झाला ? महाराष्ट्राभर अशा प्रकारचा मेसेज गेला की, आपल्याला दोन-तीन दिवसांमध्ये हे सगळे पैसे मिळणार आहेत. ही वस्तुस्थिती आहे का ? आजच्या आपल्या निवेदनावरून हे स्पष्ट होते की, ही वस्तुस्थिती नाही. अद्यापही अडथळ्यांची शर्यत पार करून आपल्या हातामध्ये पैसे यावयाचे आहेत. एवढी मोठी अडथळ्यांची शर्यत असताना आपण काल बिनधास्तपणे सांगून टाकले की, 1200 कोटी दोन-तीन दिवसांमध्ये लोकांना मिळतील. आपल्या हातामध्ये पे ऑर्डर नाही, सँक्शन लेटर नाही. ह्या सगळ्या गोष्टी आता आपण सांगितल्या. पण काल आपण थोडा धीर धरून ही चर्चा होऊ दिली असती तर आपल्यालाही वेळ मिळाला असता. माहिती घेऊन चर्चा करून सगळ्या गोष्टींचे निवेदन आपल्यालाही करता आले असते. पण अतिउत्साह आपल्याला काल नडला. हा अतिउत्साह कशासाठी ? तर सन्माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील हे आपल्या मदतीला होते. आपण दोघांनी मिळून ही चर्चा आमच्यावर उलटविण्याचा प्रयत्न केला. हसून या सगळ्या विरोधी पक्षाची धार बोथट करून टाकायची या उद्देशाने आपण निवेदन केले हे बरोबर नाही. शेवटी विरोधी पक्ष हासुध्दा येथील कामकाजाचा एक भाग आहे. त्यामुळे त्यांनी जर एखादा प्रश्न उपस्थित केला तर त्याला समाधानकारक उत्तर देणे हेही महत्वाचे आहे. पण त्यांच्यावर कुरघोडी करणे हा उद्देश कधीही असू नये असे माझे मत आहे. काल ज्या पध्दतीने आपण निवेदन केले त्या पध्दतीला आमचा विरोध होता. काल आम्ही हे मांडण्याचा प्रयत्न केला. पण आम्हांला संधी मिळाली नाही. म्हणून हा विषय आज सकाळी आम्ही पुन्हा उपस्थित केला. काल खरे म्हणजे मा.सभापतींनी हा विषय मान्य केला नव्हता. ही चर्चा काल बंद केली होती. आम्ही आज परत हा विषय उपस्थित केला त्याच्या पाठिमागे उद्देश असा होता की, आमच्या गरीब शेतक-यांना त्यांचे पैसे मिळावेत. आपण दौरा करून शेतक-यांची परिस्थिती तपासून आलात. आमचेही प्रतिनिधी त्या भागात फिरून शेतक-यांची परिस्थिती तपासून पहात आहेत. असे नाही की, आम्ही येथे मुंबईत बसून निवेदन करतो आणि तुम्ही मात्र प्रत्यक्ष सगळी परिस्थिती पाहून आलात आणि तुम्हांला वस्तुस्थिती कळली. त्यामुळे तुम्हांला शेतक-यांचा कळवळा आला, म्हणून काल तुम्ही निवेदन केले. विरोधकसुध्दा हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SDU/ RJW/ SBT.

(श्री. मधुकर सरपोतदार)

सगळे पहात आहेत. शेतक-यांकडे जात आहेत आणि त्यांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करीत आहेत. शासनाला सहकार्य करण्याचा प्रयत्न करीत आहेत. शासनावर कुरघोडी करणे हा त्यामध्ये आमचा उद्देश नाही. गरीब शेतक-यांना पैसे मिळावेत अशी तुमची भावना आहे. तशीच भावना आमचीही आहे. शासन शेतक-यांवर मेहेरबानी करीत आहे असे नाही. ज्यावेळी तुम्ही कापूस घेता त्यावेळी त्यांचे पैसे 24 तासात कायद्याने दिले पाहिजेत. पण आपण तेही केले नाही आणि आज पैसे देण्याचा प्रश्न आल्यावर दिशाभूल करण्याचे निवेदन आपण केले. त्या निवेदनाबद्दल साधी दिलगिरीसुध्दा आपण व्यक्त केली नाही. तुमच्या हातात पैसे नव्हते तर मग कोणत्या आधारावर असे निवेदन केले ? हे सभागृह सार्वभौम आहे आणि या सभागृहाला काही दर्जा आहे. या सभागृहाची सायंटिटी आहे. या सभागृहाची काही इभ्रत आहे. या सभागृहामध्ये आपण अशा प्रकारचे निवेदन करणे हे या सभागृहाच्या इभ्रतीला योग्य नाही. आपण स्वत:हून खुलासा करून सगळे सांगितले असते तर बरे झाले असते. माझ्या हातून काल अशा प्रकारचे निवेदन झालेले आहे पण माझ्या हातात पैसे आलेले नाहीत. त्यामुळे मी त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो असे सांगितले असते तर ही सगळी चर्चा टळली असती. आपण असे केले नाही. काल चूक केली आणि शेतक-यांबद्दल सगळी दया, माया, प्रेम दाखवून काल मिडीयाला असे दाखविले की, मी जे केले ते बरोबर होते. पण ते काही बरोबर नाही. मिडीयाव्दारे संपूर्ण महाराष्ट्रभर मेसेज गेला तो योग्य नाही. पैसे तुमच्या हातात नाहीत. तरी तुम्ही आश्वासन देता ? केवळ इंडेन्ट लेटर तुमच्याकडे आहे त्याने काय होणार ? अशा पध्दतीने तुम्ही बाहेर जाऊन निवेदन करणे , मिडीयाला सांगणे म्हणजे ही महाराष्ट्रातील सर्व शेतक-यांची दिशाभूल करण्यासारखे आहे. शेतक-यांची ही क्रूर चेष्टा आहे असे माझे मत आहे. याला क्रूर थट्टा नाही तर दुसरे काय म्हणावे. गरजू शेतकरी आहेत. त्यांच्या घरात लग्नकार्ये आहेत. त्यांची अडचणी आहे. तुमच्या मंत्रालयाच्या दरवाजापर्यंत शेतक-यांची आत्महत्त्या येऊन पोहोचली आहे. या शेतक-यांबद्दल तुमला थोडेसे प्रेम असेल तर ते चांगल्या शब्दात व्यक्त करा. आज नाही तर 15 दिवसांमध्ये आम्ही देऊ असे म्हणा. जो निर्णय घ्यावयाचा आहे तो धाडसाने घ्या. पण सांगण्याचे धाडस तुमच्यामध्ये असू द्या. करावयाला जायचे एक आणि सांगायचे दुसरे ही पध्दती या शासनाची आहे ती योग्य नाही.

(यानंतर श्री.गायकवाड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ....

तुम्ही जर कापूस एकाधिकार खरेदीची योजना राबवू शकत नसाल तर काल आपण निवेदन करीत असतांना सांगितले की, जे आश्वासन दिले ते पुढच्या पाच वर्षात हळूहळू क्रमाक्रमाने पूर्ण करणार आहे. तेव्हा हे स्टेटमेन्ट आपण कशाच्या आधारावर केलेले आह ?. या कापूस उत्पादक शेतक-यांचे पैसे देण्याकरता आज आपल्याकडे पैसे नाहीत. या योजनेमध्ये 3500 कोटी रुपयाचा लॉस आलेला आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात म्हणणे मांडावे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी थोडक्यातच माझे म्हणणे मांडतो. मी पुनरावृत्ती करीत नाही. यामध्ये शासनाने जी भूमिका मांडली त्यामध्ये आम्ही सर्वजण दोषी ठरतो. यामध्ये आमचा काय दोष आहे ? शेतक-यांच्या दृष्टीने ज्वलंत असलेला प्रश्न या ठिकाणी मांडणे यामध्ये विरोधी पक्षाचा दोष आहे काय ? ज्या पध्दतीने काल सदनामध्ये आमच्या बाबतीत माननीय उप मुख्यमंत्री बोलले ती पध्दत सुध्दा योग्य नाही. सत्ताधारी याचा अर्थ असा आहे की, सेवची संधी मिळालेला पक्ष. विरोधी पक्ष याचा अर्थ असा नाही की जनतेने त्यांना फेकून दिले म्हणून ते तुमच्यासमोर येथे आले आहेत. शेवटी विरोधी पक्षालासुध्दा जनतेमध्ये स्थान असते.सत्ताधारी पक्ष असो वा विरोधी पक्ष असो या दोन पक्षातील जी सीमा रेषा आहे ती अतिशय अस्पष्ट आहे. आज हे सत्तेवर आहेत तर उद्या ते सत्तेवर आहेत असे चित्र महाराष्ट्रात आणि देशात आज उभे राहिलेले आहे. एका पक्षाचे 400 सभासद निवडून आलेले आहेत असे चित्र आता राहिलेले नाही. ते दिवस आता गेले आहेत. 300 सदस्यांपैकी 250 सदस्य एका पक्षाचे आहेत आणि 50 सदस्य विरोधी पक्षाचे अशी स्थिती आज येथे राहिलेली नाही. आता दिवस बदलत चालले आहे अतिशय जबाबदारीने आपण वागले पाहिजे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री नितीन गडकरी यांनी सागितल्याप्रमाणे आमची कोणतीही अपेक्षा नाही. तसेच आम्ही कोणताही आग्रह धरलेला नाही.आपला अवमान व्हावा यासाठी आम्ही काहीही मांडत नाही.परंतु हजारो शेतक-यांच्या बाबतीत आपण येथे विषय मांडला होता. हा विषय केवळ येथेच मांडून आपण थांबला नाहीत तर मिडियासमोर जाऊन सुध्दा सांगितले होते. तेव्हा ज्या गरीब शेतक-यांनी या बातम्या ऐकल्या असतील त्या शेतक-यांच्या मनात काय विचार आले असतील हा एक मुद्दा आहे आणि दुसरा मुद्दा असा आहे की, जे काही झालेले आहे ते दुरुस्त कसे करता येईल. या दृष्टीकोनातून माननीय ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ...

उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्याकडून माझी अशी अपेक्षा आहे की,त्यांनी काल केलेल्या वक्तव्याबद्दल प्रथम दिलगिरी व्यक्त करावी. काल माननीय उप मुख्यमंत्री आमच्या चर्चेला उत्तर देण्यासाठी उभे राहिलेले नव्हते.हा प्रस्ताव स्वीकारावा की स्वीकारु नये याबाबतीत काल सदनामध्ये चर्चा चालू होती.माननीय उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन करावे अशी आम्ही विनंतीसुध्दा केलेली नव्हती.परंतु त्या चर्चेत सहभागी होत असतांना निवेदनाच्या स्वरुपात उत्तर देऊन मंत्री महोदय हात झटकून मोकळे होण्याच्या तयारीमध्ये होते.त्याला आमचा आक्षेप होता. तेव्हा कृपा करुन येथून पुढे अशा प्रकारे आपण काही करु नका.आम्ही सभागृहापुढील दिवसाचे कामकाज स्थगित करण्यात यावे असा प्रस्ताव काल आणला होता.त्यामध्ये प्रश्नोत्तरेसुध्दा होती. . विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांचे प्रश्न जास्त असतात. सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांचे प्रश्न कमी असतात. विरोधी पक्षाच्या दृष्टीने विचार केला तर प्रश्नोत्तराचा तास हा अतिशय महत्वाचा तास असतो.काल हा प्रस्ताव आणत असतांना आमच्यातील काही सन्माननीय सदस्य आमच्यावर चिडले होते.परंतु शेतकरी हा महाराष्ट्राचा आधारस्तंभ आहे.त्याला आधार दिला पाहिजे या भावनेतून काल हा प्रस्ताव मांडण्यात आला होता. आज सुध्दा तोच प्रस्ताव मांडण्यात आला आहे. काल पासून हेच काम चालले आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना एक विनंती करावयाची आहे. तुम्ही काल दिशाभूल केली किंवा या प्रकरणाला दुसरी दिशा दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या प्रयत्नाबद्दल आमची काहीही तक्रार नाही.तुम्ही जे प्रयत्न केलेले आहेत ते तर तुम्ही करावयास पाहिजेत. प्रयत्न करणे हे तुमचे कर्तव्य आहे. तुम्ही प्रयत्न करीत आहात ही चांगली गोष्ट आहे. कर्तव्य बजवावयाचे हेच पहिले काम जो मंत्रीपद स्वीकारतो त्याचे असते..तेव्हा आपण आपले कर्तव्य चोखपणे बजवावे आणि शेतक-यांना लवकरात लवकर पैसे मिळवून द्यावेत परंतु जर दोन तीन दिवसात पैसे देऊ शकत नसाल तर किती दिवसात पैसे देऊ शकता या बाबतीत नीट अंदाज घेऊन आणि सगळया अधिका-यांना विश्वासात घेऊन आपण येथे माहिती द्यावी. केवळ अधिका-यांच्याकडून चिठ्ठी आली म्हणून त्या आधारावर येथे स्टेटमेन्ट करण्याचा आपण प्रयत्न केला तर अशा प्रकारे तोंडघशी पडण्याची शक्यता असते.एवढेच मला या निमित्ताने आपल्याला सांगावयाचे आहे. आपण या सदनाची आणि महाराष्ट्रातील जनतेची माफी मागण्याची,दिलगिरी व्यक्त करण्याची आवश्यकता आहे एवढेच मला सांगावयाचे आहे.

----

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील ( पणन मंत्री ) : सभापती महोदय, या बाबतीत मी फक्त एवढाच खुलासा करतो की,राज्य सहकारी बॅन्केने महाराष्ट्र शासनाकडे एक हजार नऊ कोटी रुपये आम्ही उपलब्ध करुन देऊ व यासाठी आम्हाला राज्य सरकारने हमी द्यावी तसेच त्यासाठी 252 कोटी रुपयाची दुरावा रक्कम द्यावी अशा प्रकारचा प्रस्ताव दिल्यानंतर राज्य शासनाने 14 तारखेला त्याला हमी दिली आणि 15 तारखेला दुरावा रक्कम उपलब्ध करुन दिली. त्यानंतर सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे हा प्रस्ताव रिझर्व्ह बॅन्क ऑफ इंडियाकडे गेला होता.त्या संदर्भात अर्बन बॅन्केचे आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅन्केचे 400 कोटी रुपये सरकारने त्वरित देण्याच्या दृष्टीने रिझर्व्ह बॅन्केकडून सरकारला विचारणा करण्यात आलेली आहे. त्यामुळे रिझर्व्ह बॅन्केकडून या संदर्भातील अट आल्यानंतर यासंबंधी पुढचा जो कार्यवाहीचा भाग आहे तो निश्चितपणे केला जाईल.आपल्या माहितीसाठी मी हे आपणाला सांगितलेले आहे.

----

नंतर श्री.कानडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ RJW/ SBT/ पूर्वी श्री. गायकवाड 17:40

नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. चांगल्या भावनेने आणि उपमुख्यमंत्र्यांबद्दल उपहास किंवा अपमान न करता मी अतिशय स्वच्छपणाने भूमिका मांडली आहे. काल सभागृहामध्ये तीन दिवसात 1200 कोटी रुपये शासन देईल असे कोण बोलले ? उपमुख्यमंत्र्यांनी जे स्टेटमेंट काल याठिकाणी केले ते रेकॉर्डवर आहे. उपमुख्यमंत्र्यांनी जे विधान केले त्यावेळी त्यांच्याकडे आरबीआयचे किंवा राज्य सहकारी बँकेचे 1200 कोटी रुपये मिळाल्याचे मंजुरी पत्र होते काय ? मग कशाच्या आधारावर त्यांनी याठिकाणी हे विधान केले ? काल सभागृहात दिलेली माहिती आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिती यामध्ये तफावत आहे. मा. उपमुख्यमंत्री महोदयांबद्दलची इंटीग्रिटी आणि त्यांचे इंटेन्शन याबद्दल मी येथे बोलणार नाही. स्टेट को-ऑप. बँकेची अट आहे त्याबद्दल मी बोललो असताना ना. श्री. अजित पवार यांनी खुलासा केला आहे आरबीआय ची अट आहे असे सांगितले. मी माझे शब्द परत घेतले. उपमुख्यमंत्री महोदयांनी याठिकाणी काल जे स्टेटमेंट केले आणि आज जी माहिती समोर आली आहे त्यामध्ये तफावत आहे आणि त्यातून सभागृहाची दिशाभूल झालेली आहे. मी उपमुख्यमंत्री महोदयांविरुध्द हक्कभंगाची सूचना देऊ शकतो. मी त्यांना एवढीच विनंती केली की, यासंदर्भात आपण सभागृहामध्ये दिलगीरी व्यक्त करा आणि हा विषय येथे संपवून टाका. 1200 कोटी रुपयांचे मंजुरी पत्र आहे आणि 3 दिवसात शेतक-यांना पैसे वाटप होईल या कालच्या भूमिकेवर आपण कायम आहात. उपमुख्यमंत्री महोदयांनी काल याठिकाणी केलेले निवेदन आणि आजची वस्तुस्थिती यामध्ये अंतर असल्यामुळे सभागृहामध्ये साधी दिलगीरी व्यक्त करावयास पाहिजे होती. सामोपचाराने हा विषय संपविण्याबाबत मी विनंती केली. दिलगिरी व्यक्त करा अशी विरोधी पक्षनेता म्हणून मी आपणांस विनंती केली. स्टेट को-ऑप बँकेबाबत मी भूमिका घेतली त्यावेळी श्री. अजित पवार यांनी उभे राहून भूमिका स्पष्ट केली आणि तफावत आहे असे दिसून आल्यावर मी माझे स्टेट को-ऑप बॅंकेबाबत काढलेले उद्‌गार वापस घेतले. याबाबत माझी आग्रहाची विनंती आहे की, सभागृहाची प्रतिष्ठा आणि सन्मानाकरिता आपण दिलगिरी व्यक्त करावी. उपमुख्यमंत्र्यांनी केवळ सभागृहातच स्टेटमेंट केले नाही तर सगळ्या मिडियासमोर त्यांनी याबाबत माहिती दिली. वस्तुस्थिती तशी नाही. चुकीने झालेले आहे,कळत नकळत घडले आहे म्हणून उपमुख्यमंत्रीमहोदयांनी दिलगीरी व्यक्त करावी. त्यांनी काल केलेले स्टेटमेंट आणि आजची वस्तुस्थिती यामध्ये तफावत आहे. म्हणून दिलगिरी व्यक्त करुन विषय संपवावा आणि त्याप्रमाणे रेकॉर्ड दुरुस्त करावे.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, याठिकाणी दोन प्रश्न उपस्थित झालेले आहेत. दोन्ही प्रश्न महत्वाचे आहेत. काल मा. उपमुख्यमंत्र्यांनी याठिकाणी जे निवेदन केले त्यात त्यांनी दोन वेळा जे शब्द वापरले आणि आज पहिल्यांदा काय शब्द वापरले आणि नंतर काय शब्द वापरले हे सर्व रेकॉर्डवर आहे. ज्या हेतूने त्यांनी शब्द वापरले त्याबाबतचा तपशील त्यांनी सांगितला. कापूस पिकणा-या भागामध्ये ते फिरले आहेत आणि तेथील शेतक-यांशी ते बोलले आहेत. लोकांचे म्हणणे त्यांनी जाणून घेतले आणि त्याबाबतीत काय केले याचे निवेदन त्यांनी केलेले आहे. विरोधी पक्षनेते म्हणाले त्याप्रमाणे उपमुख्यमंत्र्यांच्या इंटेन्शनबद्दल कोणाच्या मनात शंका असण्याचे कारण नाही. तीन दिवसांचा क्रम त्यांनी सांगितले. काल सभागृहामध्ये पहिल्यांदा त्यांनी हेच वाक्य वापरले आणि पुढे आग्रहामुळे त्यांनी त्यात बदल केला. यामध्ये दोन बाबी आहेत. संसदीय कामकाज उपमुख्यमंत्री महोदयांनी उत्तम रीतीने केलेले आहे. मला एक भीती अशी वाटते की, एका शब्दामुळे उठून दिलगिरी व्यक्त केली असती. परंतु संसदीय कामकाजामध्ये बोलण्याबोलण्यामध्ये काही गोष्टी घडून जातात. राज्य सहकारी बँकेबद्दल विरोधी पक्षनेते बोलले आणि नंतर त्यात त्यांनी दुरुस्ती केली तो बोलण्याचा एक भाग होता.

यानंतर श्री. सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बी.टी.देशमुख..

ते त्यांनी दुरुस्त केले. ते दुरुस्त करण्याचा भाग हा वेगळा आहे. मला या संदर्भात काय वाटते ते मी सांगतो. आपण दोन तीन दिवसात पैसे देणार आहात असे म्हटले होते हे तर खरे आहे. अध्यक्ष महाराज, एखादी लक्षवेधी सूचना दिली आणि शासनाकडून त्याबाबत लगेच काही स्टेटमेंट केले गेले तर आम्हा लोकांना त्याचे वाईट वाटते. कारण आपण लक्षवेधी सूचना दिली असताना त्यावर निवेदन येण्या ऐवजी त्या विषयी अन्य मार्गाने नियम 46 ने वा अन्य कोठल्याही नियमाने निवेदन झ ााले तर साहजिकच सदस्यांचाही विरस होतो. काल या ठिकाणी हा प्रयत्न होत असताना एक पार्लमेंटरी डिव्हाईस म्हणून जेव्हा ही चर्चा होऊन गेली त्यावर उत्तर आले असते तर आणखी आनंद झाला असता. व्यक्तीशः मला तरीही शासनाकडून निवेदन झाल्याचा आनंद झाला हेही मी येथे नमूद करू इच्छितो. कारण शेवटी तो प्रश्न महत्त्वाचा होता. आणि मग डिव्हाईस वापरावा की वापरू नये या चर्चेमध्ये जर रिझल्ट मिळाला तर मला स्वत:ला तरी त्याबाबतीत आनंदच झाला. बहुमत आहे म्हणून बेपर्वाई नको आणि अल्पमत आहे म्हणून दांडगाई नको. शेवटी तो प्रश्न सुटणे हे महत्त्वाचे आहे. म्हणून मला वाटते की, या दोन्ही प्रश्नांच्या बाबतीत दुर्लक्ष होऊ नये. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी काल येथे दिलेले आश्वासन त्यांनी म्हटल्याप्रमाणे 2-3 दिवसात पूर्ण होत नाही असे दिसते आहे. त्यात काही थोडीशी अडचण आली. काल संध्याकाळी त्या गोष्टी त्यांच्याकडे आल्या. त्यांनी ज्या सिन्सिअरली काम केलेले आहे त्या विषयी दोन्ही बाजूच्या सदस्यांच्या मनात शंका नाही. डिव्हाईसेस वापरण्याच्या बाबतीतील हे जे भाग आहेत ते आपल्या प्रोसिजरचे भाग आहेत. मात्र त्यातील रिझल्ट हा महत्त्वाचाच आहे. दुसरा मुद्दा म्हणजे '2-4-5 दिवसात' ... या सबंध चर्चेमध्ये दुर्लक्षित होऊ नये एवढेच माझे या संबंधातील प्रतिपादन आहे.

श्री. आर.आर.पाटील : अध्यक्ष महाराज, या बाबतीत मी पहिल्यांदाही स्पष्ट केलेले आहे. मी या संदर्भात जी माहिती काल येथे सांगितली होती ती केवळ ऐकिव माहितीवर आधारित नव्हती तर प्रत्यक्ष माझ्या दालनामध्ये संबंधित बँकेच्या एम.डी.ना आणि चेअरमनना, सगळ्या वरिष्ठ सचिवांसमोर, मंत्र्यांच्या समोर बोलावून घेऊन बैठक घेतली होती त्यामध्ये केलेल्या चर्चेच्या आधारेच मी उत्तर दिले होते. ...

.... डब्ल्यूडब्ल्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : Unless any action is complete, the Hon. Minister is not suppose to make any authentic statement on the floor of the House.
As a Deputy Chief Minister, you cannot do this.

श्री. आर.आर.पाटील : अध्यक्ष महाराज, रिझर्व्ह बँकेने ऑब्जेक्शन घेतल्याचे पत्र काल संध्याकाळी मिळाले आहे. पण मला आठवते आहे की, माझ्या दालनामध्ये जेव्हा या संदर्भात बैठक झाली होती त्यावेळी रिझर्व्ह बँकेची यासाठी मान्यता घ्यावी लागेल का ? आणि रिझर्व्ह बँकेने मान्यता दिली नाही तर महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांची परिस्थिती इतकी अडचणीची झाली असताना राज्य सहकारी बँकेची भूमिका काय राहील ? इतक्या स्पष्टपणे सर्वांसमोर मोठ्याने मी प्रश्न विचारला होता आणि त्याचेही उत्तर देण्यात आले होते. तर राज्य सरकारच्या सूचनेप्रमाणे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या पाठीमागे राज्य सहकारी बँक राहील. त्यासाठी निधी उपलब्ध करून देऊ हे बँकांच्या चेअरमनने, एम.डी.नी माझ्यासमोर सांगितले असेल आणि आज कुणी अडचणी सांगणार असतील तर सदनामध्ये मी आपल्याला सांगितले आहे की, 3 दिवसात पैसे दिले जातील..

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ....

श्री. आर.आर.पाटील : अध्यक्ष महाराज, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आता माझेही ऐकून घ्यावे, इतका वेळ मी त्यांचे म्हणणे ऐकून घेतलेले आहे. ...

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, तुमचे बँकेचे अध्यक्ष वा एम.डी. यांना आम्ही काहीच म्हणू शकत नाही. परंतु तुम्ही येथे जे काही बोलता ते शासनातर्फे बोलत असता. तुम्ही काल येथे जे काही सांगितले ते सारे रेकॉर्डवर आहे आणि प्रत्यक्षात वस्तुस्थिती मात्र वेगळी आहे. ...

श्री. आर.आर.पाटील : अध्यक्ष महाराज, जर व्यवहारामध्ये येणारी ऑर्डरच खरी असेल, आलेली ऑर्डरच अंतिम आदेश असेल तर अनेक मंत्र्यांच्या दालनामध्ये होणाऱ्या बैठका या शून्य समजाव्या लागतील, बिनकामाच्या समजाव्या लागतील आणि आज पर्यंत तरी महाराष्ट्राच्या प्रशासनामध्ये माझा तरी तसा अनुभव नाही. मी नेहमीच चांगले अनुभवले आहे. शेतकऱ्यांच्या पाठीमागे उभे राहण्याची भावना त्यांनी माझ्या दालनामध्ये येऊन माझ्याकडे व्यक्त केलेली आहे. मी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील .....

तीन दिवसांचे आश्वासन आपल्याला दिले आहे. रात्री आलेले पत्र आज माझ्या लक्षात आणून देण्यात आले आहे. अध्यक्ष महाराज, मी उद्या राज्य सहकारी बँकेशी तसेच रिझर्व्ह बँकेशी देखील या बाबत चर्चा करीन. आपण माझ्याबरोबर झालेल्या बैठकीत येऊन दिलेल्या आश्वासनामुळे, स्पष्ट भूमिकेमुळे राज्य सरकारने तीन दिवसांचे आश्वासन दिलेले आहे. आणि राज्य सरकारचा शब्द कायम राहिला पाहिजे त्यासाठी आपण काय करणार याची विचारणा मी त्यांना करणार आहे आणि परवाच्या दिवशी, तिसऱ्या दिवशी जर त्यांनी हे पैसे दिले नाहीत तर बिनदिक्कतपणे मी माफी मागेन ....

( यानंतर श्री.जागडे ....एक्सएक्स 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ RJW/ MHM/ SBT/ 17.50

श्री. आर. आर. पाटील...

त्याचबरोबर, मा. देशमुख यांनी एक प्रश्न उपस्थित केला होता की, अशा प्रक्रिया पूर्ण केल्यामुळे कदाचित संसदीय प्रक्रिया पूर्ण होईल. याची मलाही तितकीच माहिती आहे. आयुष्यातील अनेक तास मी लायब्ररीमध्ये घालविले आहेत. त्यामुळे या सदनाचे महत्व तसेच परंपरा आणि सदनाचा मान मी नक्कीच ठेवीन. या सदनाइतकेच या राज्यातील शेतकरी आणि कापूस उत्पादक शेतकरी महत्वाचा आहे. त्यांना लवकर पैसे मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाची भूमिका ही प्रामाणिक आहे. या सदनातील शाब्दिक लढाईला महत्व नाही. या राज्यातील शेतकरी मात्र पराभूत होता कामा नये. त्यांना लवकर पैसे मिळाले पाहिजे. या दृष्टीने माझ्या दालनात जो शब्द त्यांनी मला दिला आहे, त्यांना त्याप्रमाणे काम करण्यास भाग पाडण्याचा मी प्रयत्न करेन. उपमुख्यमंत्र्याचे दालन म्हणजे पोरचेष्टा नाही. कोणीही येऊन काहीही शब्द द्यावेत, पुन्हा काही पाहू नये, हे बरोबर नाही. याचाही चोख जाब विचारण्याची भूमिका घेतली जाईल. त्यामुळे परवाच्या दिवशीपर्यन्तची मुदत आहे. तेव्हा दिलेले आश्वासन पाळले नाही, असा निष्कर्ष प्रिमॅच्युअर अवस्थेत आपण काढू नका. या संदर्भातील माझी भूमिका मी परवा दिवशी कामकाज संपण्यापूर्वी स्पष्ट करेन.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हसावे की रडावे हेच मला कळत नाही. माझा पहिला प्रश्न असा आहे की, तीन दिवसात 1200 कोटी रुपये देण्याचे ओव्हरऑल कमिटमेंट आहे. Whether the Government has received sanctioned letter from MSCB? Whether MSCB is capable to give letter without the sanction of RBI?

श्री.आर. आर. पाटील : मी बैठकीत स्प्ष्टपणाने असे विचारले होते की, रिझर्व्ह बँकेने मान्यता दिली नाही, असे स्पष्टपणाने विचारल्यानंतर पैसे दिले जातील असे मला सांगण्यात आले. आता यामध्ये जर त्यांनी पैसे दिले नाहीत काही अडचणी सांगितल्या, ॲबनॉर्मल पिरियड वाढला, दिलगिरी व्यक्त केली तर मी या प्रश्नाचे उत्तर परवाच्या दिवशी देतो असे मी आपणाला सांगितले आहे.

श्री. नितीन गडकरी : सँक्शन लेटर नसताना अशा प्रकारची घोषणा करणे बरोबर नाही. मी म्हणतो ते बरोबर आहे, हे म्हणणे बरोबर नाही. मा. उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहाची दिशाभूल केलेली आहे.

( गोंधळ )

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील : राज्य सहकारी बँकेने कर्ज मंजूर करण्याचा ठराव केला आहे. राज्य सहकारी बॅकेंच्या चेअरमनने मला हे सांगितले आहे. त्यांच्यावर मला विश्वास ठेवावा लागेल.

( गोंधळ )

श्री. आर. आर. पाटील : संसदीय शब्दात पकडण्याचा आपला विचार असेल तर...

( गोंधळ )

श्री. नितीन गडकरी : मा. उपमुख्यमंत्रीमहोदय सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. मी त्यांचा निषेध करतो. त्याबाबत माननीय उपमुख्यमंत्र्यांनी राजिनामा द्यावा, अशी मागणी मी करीत आहे.

( गोंधळ )

**उपसभापती** : मा. उपमुख्यमंत्र्यांनी उपस्थित झालेल्या मुद्यांना उत्तर दिले आहे. मला वाटते की, ही चर्चा येथेच थांबवावी. आता आपण पुढील विषयाकडे जाऊ.

( गोंधळ )

श्री. नितीन गडकरी : मा. उपमुख्यमंत्रीमहोदयांनी सभागृहाची दिशाभूल केली आहे.

( गोंधळ )

श्री. आर. आर. पाटील : मी कोणत्याही प्रकारची दिशाभूल केलेली नाही.

( गोंधळ )

श्री. नितीन गडकरी : मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी सभागृहाची दिशाभूल केली आहे, त्यामुळे त्यांचा निषेध करुन आम्ही सभात्याग करतो.

( विरोधी पक्षाच्या सर्व माननीय सदस्यांनी सभात्याग केला.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ RJW/ MHM/ SBT/ 17.50

**पृ.शी.**: राज्यातील विजेचे भार नियमन संपविणे व वीज निर्मिती क्षेत्रात गुंतवणूकीस प्रोत्साहन देणे.

**मु.शी.**: राज्यातील विजेचे भार नियमन संपविणे व वीज निर्मिती क्षेत्रात गुंतवणूकीस प्रोत्साहन देणे या संबंधी माननीय उर्जामंत्र्यांचे निवेदन.

श्री. दिलीप वळसे -पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे. )

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: □ा□दपत्रे सभा□ृहासमोर ठेव□**

श्री. आर. आर पाटील (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अ□ुमती□ "श्री. सुरेशदादा जैन, तत्कालीन मंत्री, अन्न व नागरी पुरवठा, डॉ. पद्मसिंह पाटील, तत्कालीन मंत्री, पाटबंधारे, श्री. नवाब मलिक, तत्कालीन राज्यमंत्री, गृहनिर्माण, डॉ. विजयकुमार गावित, तत्कालीन राज्यमंत्री, सामान्य प्रशासन, माहिती व जनसंपर्क व समाजसेवक श्री. अण्णा हजारे यांच्यावरील भ्रष्टाचाराच्या व कुप्रशासनाच्या आरोपातील तथ्य शोधण्यासाठी व त्यासंबंधी चौकशी करण्यासाठी राज्य शासनाने नेमलेल्या सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री. पी.बी. सावंत यांच्या चौकशी आयोगाचा अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : "श्री. सुरेशदादा जैन, तत्कालीन मंत्री, अन्न व नागरी पुरवठा, डॉ. पद्मसिंह पाटील, तत्कालीन मंत्री, पाटबंधारे, श्री. नवाब मलिक, तत्कालीन राज्यमंत्री, गृहनिर्माण, डॉ. विजयकुमार गावित, तत्कालीन राज्यमंत्री, सामान्य प्रशासन, माहिती व जनसंपर्क व समाजसेवक श्री. अण्णा हजारे यांच्यावरील भ्रष्टाचाराच्या व कुप्रशासनाच्या आरोपातील तथ्य शोधण्यासाठी व त्यासंबंधी चौकशी करण्यासाठी राज्य शासनाने नेमलेल्या सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री. पी.बी. सावंत यांच्या चौकशी आयोगाचा अहवाल" सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार (पाटबंधारे मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचा (ठाणे) सन 1999-2000 व 2000-2001 चा लेख्यांवरील महालेखापालांचा लेखा परिक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : महालेखापालांचा लेखा परिक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.राणा जगजितसिंह पाटील (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सन 2002-2003 चे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

. . . .2झेड-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विधेयकांना संमती व अधिसंमती

**उप सभापती** : विधान परिषदेने पारित केलेल्या पुढील विधेयकांना विधानसभेकडून संमती मिळाल्याची आणि दोन्ही सभागृहाव्दारे पारित केलेल्या विधेयकांना राज्यपाल व राष्ट्रपती यांची अधिसंमती मिळाल्याची यादी सचिव वाचून दाखवतील.

**सचिव** : **(अ) खालील विधेयके विधानसभेने कोणत्याही सुधारणेशिवाय संमत केली**.

(1) सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 16 - श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) विधेयक, 2004 .

(2) सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 18 - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधेयक 2004.

(3) सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 13 - महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, 2004.

(4) सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 15 - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) विधेयक, 2004.

(5) सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 14 - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती(सुधारणा) विधेयक, 2004.

(6) सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 19 - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूका आणि इतर विवक्षित निवडणूका यांच्यामुळे विवक्षित जिल्हापरिषदांचे अध्यक्ष,उपाध्यक्ष आणि त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायतसमित्यांचे सभापती व उपसभापती या पदांसाठीच्या) निवडणूका तात्पुरत्या लांबणी-वर टाकणे विधेयक, 2004.

(7) सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 17 - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, 2004.

**(ब) खालील विधेयकाला राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाली**.

सन 2004 चे वि.स.वि.क्रमांक 47 - फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2004.

. . . .2 झेड-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(क) खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली**.

(1) सन 2004 चे वि.स.वि.क्रमांक 22 - राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग विधेयक, 2004 .

(2) सन 2004 चे वि.स.वि.क्रमांक 44 - मुंबई न्यायालय - फी (सुधारणा) विधेयक, 2004.

(3) सन 2004 चे वि.स.वि.क्रमांक 45 - महाराष्ट्र महानगरपालिका (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुका आणि इतर विवक्षित निवडणुका यांच्यामुळे महापौर व उप महापौर पदांसाठीच्या) निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे विधेयक, 2004.

(4) सन 2004 चे वि.स.वि.क्रमांक 53 - महाराष्ट्र कृष्णा खोरे आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळे( सुधारणा व विधीग्राहयीकरण) विधेयक, 2004.

(5) सन 2004 चे वि.स.वि.क्रमांक 55 - मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर - पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, 2004.

(6) सन 2004 चे वि.स.वि.क्रमांक 56 - महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, 2004.

(7) सन 2004 चे वि.स.वि.क्रमांक 57 - मुंबई विक्रीकर (सुधारणा) विधेयक, 2004.

(8) सन 2004 चे वि.स.वि.क्रमांक 63 - महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील कर (सुधारणा) विधेयक, 2004.

(9) सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 13 - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर-पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, 2004.

(10) सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 14 - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, 2004.

. . . .2झेड-4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(11) सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 15 - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) विधेयक, 2004.

(12) सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 16 - श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त-व्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) विधेयक, 2004.

(13) सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 17 - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, 2004.

(14) सन 2004 चे वि.प.वि. क्रमांक 18 - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधेयक, 2004.

(15) सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 19 - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुका आणि इतर विवक्षित निवडणुका यांच्यामुळे विवक्षित जिल्हापरिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती या पदां-साठीच्या) निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे विधेयक.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . .2 झेड-5



पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री. अनंत तरे व इतर यांनी "दिनांक 13-3-2005 रोजी पांझरा, ता.पालघर, जि.ठाणे येथील एकाच कुटुंबातील दोन बालकांसह चौधा-जणांची केलेली निघृण हत्या." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होऊ शकत नाही. मात्र शासनाने निवेदन करावे. मी सूचनेस अनुमती नाकारतो.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी "दिनांक 15-3-2005 रोजी जामगाव, जि.सोलापूर येथे एका तरुणाची डॉ.आंबेडकरांची प्रतिमा व भगवान बुध्दाची मुर्ती असलेली अधिकृत टपरी तेथील पोलीस उप अधिक्षकाने तोडल्यामुळे निर्माण झालेला जातीय तणाव व पोलीसांनी केलेला लाठीमार." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होऊ शकत नाही. शासनाने यामध्ये लक्ष घालावे. मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे व सर्वश्री.अरविंद सावंत व इतर यांनी "दिनांक 14 व 15 मार्च, 2005 रोजी राज्यातील मुंबई,पुणे,कोल्हापूर,सांगली,सातारा इ.ठिकाणी बसलेले भुकंपाचे धक्के" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होऊ शकत नाही. मात्र शासनाने तातडीने निवेदन करावे. मी सूचनेस अनुमती नाकारतो.

सन्माननीय सदस्य सर्वश्री.मधु चव्हाण व इतर यांनी "सुमारे एक वर्षापासून नागपूर मध्ये नक्षलवाद्यांनी शस्त्र व दारुगोळा तयार करण्याचा कारखाना चालविला असल्याचे नुकतेच उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होऊ शकत नाही. तरी शासनाने यामध्ये लक्ष घालावे. मी सूचनेस अनुमती नाकारतो.

सन्माननीय सदस्य सर्वश्री.व्ही.यू.डायगव्हाणे व इतर यांनी "उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या +2 स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रमाकडील विदर्भ विभागातील शिक्षक/निदेशक शिक्षकेतर कर्मचा-यांना नोव्हेंबर, 2004 पासून वेतन न मिळाल्याने कर्मचारी महासंघाने दिनांक 5 फेब्रुवारी, 1005 पासून सुरु केलेले धरणे आंदोलन" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. शासनाने तातडीने लक्ष घालावे . . . .

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, संबंधित कर्मचारी 5 फेब्रुवारी 2005 पासून उपोषणाला बसलेले आहेत. त्यामुळे शासनाला निवेदन करण्यास सांगावे.

**उप सभापती** : ठीक आहे. शासनाने निवेदन करावे.मी सूचनेस अनुमती नाकारतो.

. . . .2 झेड-6



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्य सर्वश्री. विनोद तावडे व इतर यांनी "सिंधुदूर्ग जिल्हयातील मस्टर असिस्टंट व मिस्त्री संघटना महाराष्ट्र यांच्यावतीने सिंधुदूर्ग जिल्हयातील रोहयो खंडीत बेरोजगार हजेरी सहाय्यकांना जिल्हाधिकासरी सिंधुदूर्ग कार्यालयासमोर सुरु केलेले उपोषण व दिलेला आत्मदहनाचा इशारा." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नाही. मात्र शासनाने तातडीने लक्ष घालावे. मी सूचनेस अनुमती नाकारतो.

सन्माननीय सदस्य कन्हैयालाल गिडवाणी यांनी "दिनांक 1 एप्रिल, 2005 पासून मुल्यवर्धित कर प्रणाली लागू होत असताना राज्यात पेट्रोल व डिझेल वरील कराचा यामध्ये समावेश नसल्याने राज्यातील ग्राहकांना पेट्रोल, डिझेलसाठी जास्त दर मोजावे लागण्याची निर्माण झालेली शक्यता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नाही. मात्र शासनाने निवेदन करावे. मी सूचनेस अनुमती नाकारतो.

-----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचनांबाबत**

**उपसभापती** :आजच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविलेल्या लक्षवेधी सूचना अनुक्रमांक 1 ते 4 नंतर चर्चेला घेण्यात येतील.

सभागृहाच्या संमतीने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा उद्या सकाळी 10 ते 12.30 या कालावधीत घेण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. गुरुवार दिनांक 17 मार्च, 2005 रोजी सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10 ते 12.30 या कालावधीत घेण्यात येईल. त्यामध्ये माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा होईल आणि त्यानंतर दुपारी 1.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6.00 वाजून 06 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 17 मार्च 2005 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही